CMYK

सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, २४ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १३५ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



विवेकानंद केंद्र ही एक जिवंत संस्था आहे. नाती ही कायद्याने निर्माण केलेली नाती नव्हेत तर नैतिक आणि आध्यात्मिक नाते असलेली संघटना आहे. आपण एकमेकांशी कायद्याने नव्हे तर नैतिकतेने बांधले गेलो आहोत. हे आपण स्वखुशीने पत्करलेले नाते आहे. ते यांत्रिक नाते नाही.

**- पद्मविभूषण स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र, पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

## विनम्र अभिवादन



**राष्ट्र सेविका समितीच्या संस्थापिका वं. मावशी केळकर यांचा आज (तिथीप्रमाणे) जन्मदिन. हा दिवस संकल्पदिन म्हणून पाळला जातो.**

# तरुणांच्या भविष्यापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही : पंतप्रधान

## पेपरफुटीच्या प्रकरणांसाठी जलदगती न्यायालयांची घोषणा



**नवी दिल्ली, २३ जुलै**

पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये सहभागी असलेल्यांवर जलदगतीने खटला चालवून त्यांना कठोर शिक्षा देण्यासाठी केंद्र सरकार जलदगती न्यायालये (फास्ट-ट्रॅक कोर्ट) न्यायालये स्थापन करेल, अशी घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केली. तरुणांच्या भविष्यापेक्षा काहीही महत्त्वाचे नसून त्यांचे हित जपणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमध्ये सहभागी असलेल्यांना त्वरित आणि कठोर शिक्षा मिळावी, यासाठी 'फास्ट-ट्रॅक' न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. यासंदर्भात आवश्यक ती सर्व पावले उचलण्याचा निर्देश संबंधित प्राधिकारी आणि अधिकाऱ्यांना दिला आहे. विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी आम्ही उचललेल्या पावलांच्या मालिकेतील हे आणखी एक पाऊल आहे, असे 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये नरेंद्र मोदी म्हणाले. जे कोणी आपल्या तरुणांच्या भविष्याला हानी पोहोचवण्याचा प्रयत्न करतील, त्यांना सोडले जाणार नाही, त्यांनी पुढे म्हटले. नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकारावरून दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थ्यांचे दीर्घकाळ आंदोलन सुरू असतानाच ही घोषणा करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### पेपरफूट घोर पाप

पंतप्रधान मोदींनी प्रश्नपत्रिका फुटण्याच्या प्रकाराला 'घोर पाप' असे संबोधून, तरुणांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा संकल्प केल्यानंतर काही दिवसांतच केंद्र सरकारची ही घोषणा आली आहे. रालोआच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत हे भाष्य करण्यात आले आणि नंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ते कळवले. नीट परीक्षेचे पेपर फुटल्याचा मुद्दा पक्षीय राजकारणाचा बनू नये. कारण, हा एक राष्ट्रीय मुद्दा आहे आणि तो केवळ एका राज्याचा किंवा केवळ केंद्राचा विषय नाही, असे किरण रिजिजू यांनी सांगितले.

### या संकटासाठी मोदीच जबाबदार : राहुल गांधी



या संकटासाठी पंतप्रधान मोदीच जबाबदार आहेत, असा आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. तरुणांच्या भविष्याचे सर्वाधिक नुकसान तुम्हीच केले आहे. तुम्ही आपल्या शिक्षण व्यवस्थेवर पूर्ण ताबा मिळवण्याला आणि तिचा विध्वंस करण्याला केवळ परवानगीच दिली नाही तर, त्याला प्रोत्साहनही दिले आणि यासाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला संरक्षण दिले, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांचाही पुनरुच्चार करताना धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवा, विद्यार्थ्यांची माफी मागा आणि विद्यार्थ्यांवर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई करा, अशा तीन मागण्या त्यांनी केल्या.

# ठाकरेंच्या काळातच 'टीईटी' महाघोटाळा

## ठाकरे बंधूंवर मुख्यमंत्र्यांचा घणाघात



**मुंबई, २३ जुलै**

नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ २६ जुलै रोजी रस्त्यावर उतरण्याची घोषणा करणाऱ्या ठाकरे बंधूंवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडकून टीका केली आहे. ठाकरे बंधूंचा हा आगामी मोर्चा विद्यार्थ्यांच्या हितासाठी नसून, केवळ स्वतःची गमावलेली राजकीय जमीन आणि अस्तित्व पुन्हा मिळवण्यासाठी चाललेला हा एक केविलवाणा खटाटोप आहे, असा जोरदार पलटवार मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे. ज्यांच्या स्वतःच्या काळात राज्याच्या इतिहासातील 'टीईटी'चा सर्वात मोठा शैक्षणिक घोटाळा झाला, त्यांनी आता विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या गप्पा मारणे हा निव्वळ राजकीय जुमला असल्याची घणाघाती टीका त्यांनी केली.

उद्धव ठाकरे यांना त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातील काळ्या इतिहासाची आठवण करून देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) घोटाळा हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाच झाला होता. या महाघोटाळ्यात थेट आयएएस अधिकाऱ्यांपासून ते त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांपर्यंत अनेकांचा सहभाग होता. केवळ पेपरच फुटले नाहीत, तर नापास झालेल्या उमेदवारांकडून पैसे घेऊन निकाल बदलून त्यांना पास करण्याचे मोठे पाप त्याच काळात झाले, असा सणसणीत टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला.

**राज ठाकरेंना सर्वत्र जंतरमंतरच दिसते**

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. राज ठाकरे यांनी नुकत्याच केलेल्या 'जंतरमंतर' या वक्तव्याचा संदर्भ घेत मुख्यमंत्र्यांनी त्यांना चिमटा काढला. (तभा वृत्तसेवा)



देशभरात शुक्रवारी आयोजित केलेल्या बंदच्या पृष्ठभूमीवर नवी दिल्लीतील जंतर मंतर परिसरात शीघ्र कृती दल तैनात करण्यात आले

# कॉक्रोच पार्टीचे आज देशव्यापी आंदोलन



**नवी दिल्ली, २३ जुलै**

नीट पेपरफुटीवरुन कॉक्रोच पार्टीकडून राजधानी नवी दिल्लीत जंतर मंतरवर सुरु आहे. आंदोलक केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर ठाम आहे. दरम्यान, २० जुलैला या आंदोलनाला हिंसक वळण लागले. आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीमार करण्यात आला होता. त्या विरोधात कॉक्रोच पार्टीने २४ जुलैला देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. हे आंदोलन शांततापूर्ण मार्गानेच करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

कॉक्रोच पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी शुक्रवारी देशभरात होणारे आंदोलन प्रत्येक जिल्ह्यात व्हावे, संपूर्ण देशभरात एकाच वेळी आंदोलन करण्यात यावे. या आंदोलनात विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक संघटनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.या आंदोलनासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या घ्याव्यात, आंदोलनस्थळी इन्कलाब जिंदाबाद आणि भारत माता की जय अशा घोषणा द्याव्यात, असेही सांगण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

### हिंमत असल्यास संसदेत चर्चा करावी

वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील (नीट) गोंधळाच्या मुद्द्यावरून रस्त्यावर उतरून राजकारण करणाऱ्या विरोधकांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरपूस समाचार घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राजकारण करणे थांबवा आणि खरोखरच विद्यार्थ्यांचा कळवळा असेल, संविधानावर विश्वास असेल, तर पळपुटेपणा सोडून संसदेत या विषयावर चर्चा करण्याची हिंमत दाखवा, असे थेट आणि खुले आव्हान फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि संपूर्ण विरोधी पक्षाला दिले आहे. लोकशाहीत चर्चा आणि निर्णय घेण्याची सर्वोच्च जागा ही संसद आहे, रस्त्यावर गोंधळ घालून प्रश्न सुटत नाहीत, असे त्यांनी सुनावले.

## महत्त्वाचे

### सलग चौथ्या दिवशी बाजारात घसरण

**मुंबई :** मध्य पूर्वेतील वाढत्या भू-राजकीय तणावामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत. याचा थेट फटका भारतीय शेअर बाजाराला बसला असून, गुरुवारी सलग चौथ्या सत्रात निर्देशांकांमध्ये घसरण नोंदवली गेली. या तणावामुळे गुंतवणूकदारांमधील चिंतेचे वातावरण अधिक गडद झाले आहे. जागतिक बाजारातून मिळालेल्या संमिश्र संकेतांच्या पार्श्वभूमीवर भारतीय शेअर बाजाराची सुरुवात घसरणीने झाली. पहिल्या सत्रात बाजाराने सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र दुसऱ्या सत्रात विक्रीचा दबाव अचानक वाढला. बिकट परिस्थितीमुळे निफ्टीने इंट्राडेमध्ये २३,८०७.२० ची खालील पातळी गाठली. ऑटो आणि मीडिया क्षेत्र वगळता बहुतांश सर्वच क्षेत्रांमध्ये मोठी घसरण झाली.

# इथेनॉल-मिश्रित पेट्रोल सुरक्षित, कार्यक्षम

## केंद्र सरकारने अधोरेखित केले राष्ट्रीय लाभ



**नवी दिल्ली, २३ जुलै**

पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त वाढवण्याबाबत केंद्र सरकारने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. भविष्यात इथेनॉल अधिक प्रमाणात मिसळण्याबाबत कोणताही निर्णय हा सविस्तर वैज्ञानिक व तांत्रिक अभ्यास करून आणि वाहन उत्पादक, तेल विपणन कंपन्या व संशोधन संस्था यांसारख्या सर्व संबंधित घटकांशी सल्लामसलत केल्यानंतरच घेतला जाईल. इथेनॉल मिश्रित पेट्रोल सुरक्षित आणि कार्यक्षम असल्याचे स्पष्ट करीत केंद्र सरकारने त्याचे राष्ट्रीय लाभ अधोरेखीत केले.

मात्र , ई-८५ इंधन (ज्यामध्ये ८५ टक्के इथेनॉल आणि १५ टक्के पेट्रोल असते) हे केवळ अशा 'फ्लेक्स फ्युएल वाहनां'साठी आणले, जी अशा प्रकारच्या इंधनासाठी खास डिझाईन आणि प्रमाणित केली आहेत. याचा अर्थ देशभरात पेट्रोलमधील इथेनॉल मिश्रणाच्या मूळ पातळीत वाढ झाली आहे, असा होत नसल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी गुरुवारी लोकसभेत एका लेखी उत्तराद्वारे दिली. इथेनॉल हे काही नवीन इंधन नाही. जगभरात एक शतकाहून अधिक काळापासून याचा वापर केला जात आहे. भारतात, 'इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रम' टप्प्याटप्प्याने, वैज्ञानिकदृष्ट्या प्रमाणित आणि सर्व संबंधित घटकांशी सल्लामसलत करून लागू केला आहे. या प्रक्रियेत नीती आयोग, वाहन उत्पादक कंपन्या, तेल विपणन कंपन्या, ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया, सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोलियम आणि इतर तांत्रिक संस्थांचा सहभाग आहे. (वृत्तसंस्था)

### १.९७ लाख कोटींची बचत

ई-२० कडे झालेल्या स्थित्यंतरामुळे लक्षणीय राष्ट्रीय लाभ झाले आहेत. इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रमामुळे १.९७ लाख कोटी रुपयांची परकीय गंगाजळी वाचली आहे, सुमारे ३१६ लाख टन कच्च्या तेलाच्या वापराला पर्याय मिळाला, ९५२ लाख टन कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले.

# बाजीराव विहीर येथे पार पडले उभे आणि गोल रिंगण



### पालखी सोहळा वाखरी मुक्कामी विसावला

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील सोलापूर जिल्ह्यातील दुसरे उभे रिंगण, तर चौथे गोल रिंगण बाजीराव विहीर येथे पार पडले. पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर असलेल्या वाखरी पालखी तळ येथे विसावला. शुक्रवार, दि.२४ वाखरी येथून दुपारी पालखी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. वारकरी भाविकांसाठी वाखरी पालखी तळावर शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सुलभ शौचालय, आरोग्य सुविधा, आपत्कालीन कक्ष, स्नानगृह, मसाज सुविधा, हिरकणी कक्ष, जर्मन हँगर, मुख्यमंत्री आरोग्य रथ, मोबाईल चार्जिंग सुविधा, सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ जुलै-**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील रिंगण बाजीराव विहीर (ता. पंढरपूर) येथे लाखो वैष्णवांच्या उपस्थितीत गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडले. माउलींच्या पालखी सोहळ्यातील चौथे आणि शेवटचे गोल रिंगण आणि उभे रिंगण बाजीराव विहिरीजवळ उत्साहात पार पडले.रिंगण सोहळ्याने भाविकांच्या डोळ्याचे पारणे फेडले. रिंगण पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकरी आनंदाने विठुनामाच्या जयघोषात तल्लीन झाले होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी राज्यातील विविध भागांतून निघालेल्या संतांच्या पालख्या गुरुवारी वाखरीत दाखल झाल्या. दरम्यान, दुपारी भंडीशेगाव येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळा पंढरीच्या दिशेने निघाला होता. संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा उभ्या रिंगणासाठी बाजीराव विहिरीसमोर आला. उड्डाणपुलाच्या शेजारील सर्व्हिस रस्त्यालगत लागलेले रिंगण पाहण्यासाठी वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

दुपारी साडेतीन वाजता उभे रिंगण पूर्ण झाले. त्यानंतर माऊलीचा सोहळा गोल रिंगणासाठी शेजारील मोकळ्या रानात दाखल झाला. पालखी सोहळ्यातील शेवटचे गोल रिंगण पाहण्यासाठी वाखरीच्या पालखी तळावर दाखल झालेल्या विविध संतांच्या दिंडी सोहळ्यातील हजारो वारकरी बाजीराव विहीर परिसरात दाखल झाले होते. सायंकाळी ५.३० वाजता माऊलींचा सोहळा रिंगणस्थळी आला.

सेवेकऱ्यांनी टाळ-मृदंगांच्या तालावर खांद्यावरून पालखी नाचवत रिंगण पाहण्यासाठी थांबलेल्या वारकऱ्यांच्या भोवतीने रिंगण घातले.म ानाच्या दिंड्यांनी झेंडा घेऊन रिंगणात प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर अश्वस्वार रिंगणाला सुरुवात झाली. यावेळी उपस्थित वारकऱ्यांनी माऊली... माऊलीचा गजर केला.



# दादर-पंढरपूर-दादर रेल्वे सुरु करुन चंद्रभागा एक्सप्रेस नाव द्या

## पंढरपूर-देहू मेमू रेल्वे सेवा सुरू करा; धैर्यशील मोहिते-पाटील यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जुलै-**

आषाढी वारी, कार्तिकी वारी तसेच वर्षभर पंढरपूरला येणाऱ्या लाखो वारकरी व भाविकांच्या प्रवासाची गैरसोय दूर करण्यासाठी दादर-पंढरपूर-दादर दैनिक रेल्वे सेवा सुरू करून तिला 'चंद्रभागा एक्सप्रेस' असे नाव द्यावे, तसेच पंढरपूर-देहू मेमू रेल्वे सेवा सुरू करावी, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केली.

या मागणीला अधिक बळ देण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्रातील सर्वपक्षीय ४२ खासदारांच्या सह्या घेऊन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना निवेदन सादर केले.

तसेच सोलापूर जिल्ह्याच्या वाहतूक, व्यापार, शेती आणि दळणवळणाच्या विकासाला गती देण्यासाठी विविध प्रलंबित रेल्वे प्रश्नांबाबत चर्चा केली.



यात प्रामुख्याने पंढरपूर-लोणंद रेल्वेमार्गाच्या सर्वेक्षण व भूमी अधिग्रहणाबाबत वरिष्ठ स्तरावर तातडीची बैठक आयोजित करून प्रकल्पाला गती देण्याची मागणी करण्यात आली. माढा तालुक्यातील मोडनिंब येथे 'गतीशक्ती मल्टी-मॉडेल कार्गो टर्मिनल' उभारणीचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली आणि सध्या बंद असलेली दिल्ली-कोलकत्ता-मुजफ्फरनगर-शालिमार 'किसान रेल्वे' सेवा पुन्हा सुरू करण्याची विनंती करण्यात आली. तसेच लातूर-कुर्डूवाडी-सोलापूर आणि मिरज-कुर्डूवाडी-दौंड कॉर्ड लाईन प्रकल्पांना गती देण्याची मागणी करण्यात आली. मिरज-कुर्डूवाडी-लातूर रोड या सुमारे ३७५ कि.मी. लांबीच्या रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण पूर्ण करून प्रकल्पाला वेग देण्याचीही मागणी करण्यात आली.

सोलापूर रेल्वे विभागातील वाढती लोकसंख्या आणि पंढरपूरकडे येणाऱ्या लाखो वारकऱ्यांचा विचार करून सांगोला तालुक्यातील जवळा व बामणी, पंढरपूर तालुक्यातील बाभुळगाव तसेच माढा तालुक्यातील म्हैसगाव व लऊळ येथे नवीन रेल्वे स्थानके मंजूर करण्याची मागणीही खासदार मोहिते-पाटील यांनी केली. याशिवाय कुर्डूवाडी-पंढरपूर मार्गावरील वापरात नसलेल्या जुन्या मीटरगेज रेल्वे मार्गालगतची रिक्त जमीन विकासासाठी वापरून तेथे व्यापारी संकुले उभारण्याचा प्रस्ताव केंद्रीय मंत्र्यांसमोर मांडण्यात आला. या सर्व मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांना दिले.

## महत्वाचे...



### जिल्हा परिषद अंत्रोळी शाळेत माता पालक सहविचार सभा

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंत्रोळी येथे इयत्ता पहिली ते सातवी मधील सर्व माता पालकांच्या सहविचार सभा पार पडली. प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे, यांनी उपस्थित माता पालकांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक नागनाथ म्हमाने यांनी केले. सूत्रसंचालन श्रीरंग बनसोडे यांनी केले. कीर्ती जाधव यांनी आभार मानले.



### पालिकेच्या वतीने माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

माजी उपमुख्यमंत्री कै.अजितदादा अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर महानगरपालिकेच्या कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक वैभव हत्तूरे,अतिरिक्त आयुक्त विणा पवार, इरफान शेख, महेश देवकर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, अल्ताफ कुरेशी, चंद्रकांत दोतुल, शेखर सकट उपस्थित होते.



### सांगोला महाविद्यालयात बापूसाहेब झपके यांना अभिवादन

**सांगोला, दि. २३ जुलै-**

कर्मवीर गुरुवर्य कै.बापूसाहेब झपके यांच्या १०४ व्या जयंती निमित्त सांगोला महाविद्यालयात प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी मनोगतात डॉ.सुरेश भोसले यांनी सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाच्या स्थापनेतील बापूसाहेब झपके यांचे योगदान अधोरेखित केले. तसेच संगणक विभागातील प्रा.गणेश पैलवान यांनी भारतीय स्वातंत्र्य लढा आणि त्यातील बापूसाहेब झपके यांचे योगदान याबद्दल माहिती दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्र.कार्यालयीन अधीक्षक विलास माने यांच्या मार्गदर्शनाखाली जयंती, पुण्यतिथी उपक्रम आयोजन समितीचे प्रमुख डॉ. जमीर तांबोळी, प्रशासकीय कर्मचारी बाबासो इंगोले, शंकर माने यांनी परिश्रम घेतले.



### आदर्श विद्यालयात अजितदादा पवार यांची जयंती साजरी

**सांगोला, दि.२३ जुलै-**

वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालय, सांगोला येथे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण मुख्याध्यापक विठ्ठलपंत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मनोगतात संस्था सचिव निलकंठ शिंदे यांनी अजितदादा यांच्या कार्याची पद्धत, वक्तशीरपणा व परखड व्यक्तिमत्वाचे पैलू विद्यार्थ्यांना सांगितले. सूत्रसंचालन शिक्षक सुयोग बनसोडे यांनी केले.



### अजितदादा पवार यांना बी. टी. माने संकुलाच्या वतीने अभिवादन

**अक्कलकोट, दि. २३ जुलै-**

फत्तेसिंह शिक्षण संस्था संचलित माजी आमदार स्व. बी. टी. माने शॉपिंग सेंटर येथील व्यापारी मित्रपरिवाराच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवनिंगप्पा संगापुरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर जिल्हा सरचिटणीस प्रा. प्रकाश सुरवसे यांनी अजित पवारांच्या जीवनकार्याची माहिती देत अजितदादा पवार यांनी राज्याच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव करत त्यांना अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष माणिकराव बिराजदार, प्रवीणकुमार मगदूम, महेश लोकांपुरे, श्रीनिवास दळवी, स्वामीनाथ पारखे, श्रीकांत जाधव, रोहित कोळी, कदम डेरीवाले, सोनू शिंदे, भास्कर सुरवसे, अनिस शेख उपस्थित होते.

# अभिनेत्री हेमा मालिनी यांच्या भेटीतून इस्कॉनला मेकॅनिकल हत्ती

## नगराध्यक्षा भालके यांच्या हस्ते उद्घाटन

**तसा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. २३ जुलै-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील इस्कॉन मंदिराच्या वैभवात आणखी भर पडली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री व खासदार हेमा मालिनी यांनी इस्कॉन मंदिराला आकर्षक मेकॅनिकल हत्ती भेट दिला असून त्याचे उद्घाटन पंढरपूरच्या नगराध्यक्षा डॉ. प्रणिता भालके व लोकनाथ स्वामी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.



मेकॅनिकल हत्तीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी उत्सुकता दर्शविली. पारंपरिक हत्तीच्या स्वरूपात तयार करण्यात आलेला हा मेकॅनिकल हत्ती वास्तवदर्शी हालचाली करतो. त्यामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी तो विशेष आकर्षण ठरणार आहे. इस्कॉनच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की अभिनेत्री हेमा मालिनी यांनी भक्तिभावातून ही भेट दिली असून यामुळे मंदिराच्या सौंदर्यात आणि वैभवात भर पडणार आहे. देश-विदेशातून पंढरपूरला येणाऱ्या भाविकांसाठी हा मेकॅनिकल हत्ती आकर्षणाचे केंद्र ठरेल असा विश्वास लोकनाथ स्वामी महाराज व्यक्त करण्यात आला आहे.



### बाल बुध्दिबळ स्पर्धेत अनिता कोळी, विशाल शिरुर प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २३ जुलै-**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या ६४व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या बुद्धिबळ स्पर्धेत मुलींमध्ये इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी अनिता शिवानंद कोळी व मुलांमध्ये इयत्ता सातवीतील विशाल सुधाकर शिरूर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसह मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षक वृंद यामध्ये स्वतः सक्रियपणे सहभागी झाले होते. शिक्षकांनी स्वतः बुद्धिबळाच्या पटावर उतरून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या उपक्रमाचे केंद्रशाळा स्तरावर आणि सोलापूर जिल्हा शैक्षणिक वतुर्ळातून प्रचंड कौतुक होत आहे. वर्धापन दिनाचा हा रचनात्मक आणि विद्यार्थ्यांच्या हिताचा उपक्रम इतर शाळांसाठीही मार्गदर्शक ठरेल, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या. स्पर्धेतील यशस्वी बाल खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# मार्जिन न मिळाल्यास आज काळी फित लावून धान्य वाटप

## सोलापूर ग्रामीण रास्त भाव धान्य दुकानदार महासंघाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जुलै-**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदारांना फेब्रुवारी २०२६ पासून शासनाकडून देय असलेले मार्जिन अद्यापही मिळाले नसल्याने दुकानदारांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत मुख्यमंत्री यांना निवेदन देत, येत्या चार ते पाच दिवसांत किमान दोन महिन्यांचे मार्जिन संबंधित दुकानदारांच्या खात्यावर जमा न झाल्यास २४ जुलै २०२६ रोजी सर्व धान्य दुकानदार काळी फित बांधून शासनाच्या विरोधात निषेध आंदोलन करत धान्य वाटप करतील, असा इशारा सोलापूर ग्रामीण रास्त भाव धान्य दुकानदार संघटना महासंघाने दिला आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फेब्रुवारी २०२६ पासूनचे मार्जिन प्रलंबित असून याबाबत जिल्हा पुरवठा कार्यालय तसेच विभागीय कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला. मात्र, 'दोन दिवसांत मिळेल', 'चार दिवसांत मिळेल' अशी आश्वासने मिळाली; प्रत्यक्षात आजपर्यंत कोणतीही रक्कम जमा झालेली नाही.

मार्जिन न मिळाल्यामुळे धान्य दुकानदारांपुढे कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, दुकानाचे भाडे, वीजबिल आणि कर्मचाऱ्यांचे पगार देण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून अनेक दुकानदार आर्थिक संकटात सापडल्याचे संघटनेने म्हटले आहे. विशेष म्हणजे, राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांतील दुकानदारांच्या खात्यावर मागील काही दिवसांत मार्जिन जमा झाले असताना सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील दुकानदारांना मात्र एक रुपयाही मिळालेला नाही, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.



### बार्शी वकील संघातर्फे आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार

**तसा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

बार्शी वकील संघाच्यावतीने सोलापूर स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवड झाल्याबद्दल आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात बार असोसिएशन हॉल येथे संपन्न झाला. यावेळी बार्शी वकील संघाच्यावतीने आ. राजेंद्र राऊत यांना भारतीय संविधानाची प्रत भेट स्वरूपात प्रदान करण्यात आली. संविधानातील लोकशाही मूल्ये, न्याय, समता आणि बंधुता या तत्त्वांप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा हा सन्मान विशेष लक्षवेधी ठरला. उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. राजेंद्र राऊत यांनी आपल्या मनोगतात बार्शीच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच न्यायव्यवस्था, वकिली व्यवसाय आणि जनसामान्यांच्या हितासाठी सातत्याने कार्य करण्याची ग्वाही दिली. बार्शी वकील संघाने व्यक्त केलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी सर्व पदाधिकारी व सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमास बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड, उपाध्यक्ष ॲड. अक्षय पाटील, सचिव ॲड. प्रकाश साखरे, खजिनदार ॲड. सुरज राऊत, लायब्ररी चेअरमन ॲड. अमोल अलाट उपस्थित होते.

# उजनी धरणातून बार्शी उपसा सिंचनच्या उजव्या कालव्यात पाणी आले

## आमदार राजेंद्र राऊत यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून व आमदार राजाभाऊ राऊत यांनी शासनदरबारी सतत पाठपुरावा करुन बार्शी तालुक्यासाठी महत्त्वाकांक्षी असणाऱ्या बार्शी उपसा सिंचनला उजनी धरणातून उजवा कालवामधून पाणी सोडण्यात आले आहे.

शासन दरबारी आमदार राजाभाऊ राऊत यांची जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासोबत अधिकाऱ्यांसमवेत बैठक संपन्न झाली होती. जलसंपदा विभागाच्यावतीने बार्शी उपसासिंचनसाठी या पाण्याच्या विसर्ग सुरु करण्यात आला आहे. या माध्यमातून बार्शी शहरातील राऊत तलाव व गणेश तलाव पूर्ण भरुन घेण्यात येणार आहेत.



यामुळे बार्शी शहरातील विहीर, कूपनलिका, बोअर यांची पाणी पातळी देखील वाढणार आहे. धसपिंपळगाव रोड बार्शी बायपास येथे बार्शी उपसा सिंचन कालवा आउटलेट येथे पाणी आले असता पाण्याचे पूजन आमदार राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, दिपक रोंगे, पाणी पुरवठा सभापती भैय्या बारंगुळे, दादासाहेब गायकवाड, पृथ्वीराज राजपूत, प्रकाश माने, अमोल सुरवसे, मल्लिनाथ गाढवे उपस्थित होते.

## नवले सिंहगड महाविद्यालयात सोमवारपासून आंतरराष्ट्रीय परिषद

**सोलापूर, दि. २२ जुलै-**

एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे २७ व २८ जुलै २०२६ रोजी International Conference on AI-Driven Materials, Energy and Smart Technologies (AIMEST२०२६) या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे प्राचार्य डॉ शंकर नवले यांनी सांगितले.या परिषदेच्या अध्यक्षस्थानी सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर तथा संस्थेचे सचिव संजय नवले हे राहणार असून, माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक डॉ. एस. एच. पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ. अजय कुमार द्विवेदी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना संबोधित करणार आहेत. परिषदेत सादर होणाऱ्या उत्कृष्ट संशोधन निबंधांना Best Paer Award प्रदान करण्यात येणार असून, सर्व सहभागी संशोधकांना प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य समन्वयक डॉ. एस. एस. शिरगण हे असून, परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व विभागांचे प्राध्यापक व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

SINHGAD INSTITUTES
SPSPM
|| ज्ञान दान पवित्र दान ||

## कला शिरोमणी पुरस्काराने बाळासाहेब नरारे सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२३ जुलै-**

श्री श्री राजाहुआ सत्र यांच्या वतीने गुवाहाटी येथे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय दहाव्या आंतरराष्ट्रीय संगम महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात संगीत व योग क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे बाळासाहेब नरारे यांना त्यांच्या दीर्घकालीन कार्याची दखल घेत कला शिरोमणी' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री. बाळासाहेब नरारे यांनी गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून संगीत क्षेत्रात अविरतपणे कार्य केले असून, हा मानाचा पुरस्कार गुवाहाटी मध्य मतदारसंघाचे आमदार विजय गुप्ता यांच्या हस्ते नरारे यांना प्रदान करण्यात आला. या महोत्सवात भव्य सांस्कृतिक दिंडीचेही आयोजन



करण्यात आले होते. या दिंडीचे नेतृत्व प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी केले. या पुरस्कार सोहळ्यास भाजप नेते प्रभात हजारिका, प्रेसिडेंट सनातन बाप, व्हाईस प्रेसिडेंट विश्वज्योती डे, ॲडव्हायझर पंकज देवरा, प्राचार्य मिलिंद फंड, आदर्श व्यापारी संतोष शियाळ, नवनाथ थोरात, महोत्सवाचे सर्वेसर्वा हलीराम बोरा, मंजूमनी बोरा यांच्यासह संगीत क्षेत्रातील मान्यवर, संगीत रसिक, देश विदेशातील कलाकार आणि विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेले स्पर्धक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वारकऱ्यांसाठी नांदेड, नगरसोल येथून सहा अतिरिक्त विशेष रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

पंढरपूर येथे आषाढी वारीला उपस्थित राहणाऱ्या यात्रेकरूंना सोयीस्कर प्रवास करण्यासाठी भारतीय रेल्वेने आधीच आषाढी विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. नांदेड आणि नगरसोल येथून पंढरपूरसाठी ६ जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.

गाडी क्रमांक ०७६४५ स्पेशल नांदेडहून २६ जुलै आणि २ ऑगस्ट रोजी २०:०० वाजता निघेल आणि पंढरपूरला दुसऱ्या दिवशी ७ वाजता पोहोचेल. या गाडीच्या दोन फेऱ्या होतील. गाडी क्रमांक ०७६४६ विशेष पंढरपूर येथून २७ जुलै आणि ०३ ऑगस्ट रोजी सकाळी ८:०० वाजता निघेल आणि नांदेडला दुसऱ्या दिवशी २०:३० वाजता पोहोचेल. या गाडीच्या दोन फेऱ्या होतील. पूर्णा, परभणी, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बारसी टाऊन, कुर्डुवाडी आणि मोडलिंब असे थांबे असतील तर ३ एसी २ टियर, ५ एसी ३ टियर, १० स्लीपर क्लास, २ लगेज कम गार्डच्या ब्रेक व्हॅनसह ६ सामान्य द्वितीय श्रेणी असे २४ डब्यांची रचना असेल.

ट्रेन क्रमांक ०७६३७ स्पेशल २३ जुलै रोजी नगरसोल येथून २३:०० वाजता निघेल आणि पंढरपूरला दुसऱ्या दिवशी १९:०० वाजता पोहोचेल. या गाडीची एक फेरी होईल. गाडी क्रमांक ०७६३८ विशेष ही गाडी २४ जुलै रोजी २०:०० वाजता पंढरपूर येथून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ११:३५ वाजता नगरसोल येथे पोहोचेल. या गाडीची एक फेरी होईल. रोटेगाव, लासूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परतूर, सेलू, मानवत रोड, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन आणि कुर्डुवाडी असे थांबे असतील तर ४ एसी-३ टियर, १४ स्लीपर क्लास, ६ जनरल सेकंड क्लास (ज्यामध्ये २ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅनचा समावेश आहे) अशी २४ डब्यांची रचना असेल.



आपण माणसे राहिलो नाही. झोंबी झालो आहोत. हा कोणता उन्माद आपल्या डोक्यात भरला आहे. विद्यार्थ्यांची डोकी फुटतानाचे व्हिडीओ पाहून जर कोणाला आनंद होत असेल किंवा अशा क्लिप्स पाहून समाधान वाटत असेल, तर हा समाज गंभीर आजाराने ग्रासल्यासारखा आहे.
**- समीर चौगुले**, अभिनेता


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
. शुक्रवार २४ जुलै २०२६





हे मुंबई पोलिस आहेत. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गाडीत घालून धमकी काय देत आहेत बघा. तो पोलिस अधिकारी धमकी देतो की, पुन्हा या ठिकाणी दिसायचं नाही, दिसला तर तुमच्या खिशामध्ये ५०-५० ग्रॅम ड्रग्सच्या पुड्या टाकेन. यावर सरकारचे काय म्हणणे आहे? **- सुषमा अंधारे**, उपनेत्या, उबाठा

# दहशतवादाचे समर्थन थांबविल्यानंतर मिळेल पाणी

## संयुक्त राष्ट्रसंघात भारताचा पाकिस्तानवर घणाघात




**न्यू यॉर्क, २३ जुलै**

सीमापार दहशतवादाचा वापर सरकारी धोरणाचे साधन म्हणून केला जात असताना सिंधू जलकराराच्या अंतर्गत सहकार्याची अपेक्षा करता येणार नाही, असे स्पष्ट करीत भारताने संयुक्त राष्ट्रसंघात पाकिस्तानी वक्तव्याचा समाचार घेत या देशावर घणाघात केला.

जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील, याचा ठाम पुनरुच्चार भारताने केला. 'नैसर्गिक संसाधनांचे प्रशासनः शांतता, सुरक्षा आणि समृद्धीचा पाया' या विषयावर संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत झालेल्या उच्चस्तरीय खुल्या चर्चेदरम्यान, संयुक्त राष्ट्रसंघातील भारताचे कायम प्रतिनिधी पर्वथनेनी हरीश यांनी बुधवारी ही टिप्पणी केली. इस्लामाबादने एका खोटे विमर्श तयार करण्यासाठी चर्चेचा गैरवापर केल्यामुळे भारताला उत्तर देणे भाग पडले, असे पर्वथनेनी यांनी पाकिस्तानला प्रत्युत्तर देताना सांगितले.

सिंधू जल कराराबाबतची आमची भूमिका स्पष्ट आणि सुसंगत राहिली आहे. सीमापार दहशतवादाचा वापर नियमितपणे राज्याच्या धोरणाचे एक साधन म्हणून केला जात असताना परस्पर विश्वास आणि सदिच्छेवर आधारित सहकाऱ्याची अपेक्षा करता येत नाही, असे पर्वथनेनी म्हणाले. संयुक्त राष्ट्रांमधील पाकिस्तानचे कायम प्रतिनिधी आसिम इफ्तिखार अहमद यांनी, सिंधू जल कराराला स्थगिती देऊन भारताने पाण्याचा शस्त्र म्हणून वापर केल्याचा आरोप केला तसेच ही कृती बेकायदेशीर असल्याचे आणि त्यामुळे २४ कोटींपेक्षा जास्त पाकिस्तान्यांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाल्याचे म्हटले होते. या आरोपांना भारताने चोख प्रत्युत्तर दिले.

जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाबाबत सांगायचे तर, तो भारताचा नेहमीच अविभाज्य आणि अतूट भाग राहिला आहे, आहे आणि यापुढेही राहील. ही अशी घटनात्मक आणि कायदेशीर वस्तुस्थिती आहे, ज्याकडे पाकिस्तान जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतो, असे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील खुल्या चर्चेदरम्यान भारताचा प्रत्युत्तर देण्याचा अधिकार बजावताना पर्वथनेनी यांनी सांगितले.

जम्मू-काश्मीरबाबतचा एकमेव प्रलंबित मुद्दा म्हणजे पाकिस्तानने भारताच्या सार्वभौम भूभागावर केलेली उघड आक्रमकता आणि केलेला बेकायदेशीर ताबा हा आहे. भारतावर दोषारोप करण्याऐवजी, पाकिस्तानने स्वतःच्या कारभारात सुधारणा केल्यास ते त्यांच्यासाठी आणि त्यांच्या जनतेसाठी अधिक हिताचे ठरेल, असे त्यांनी नमूद केले. ◂ (वृत्तसंस्था)

### नैसर्गिक संसाधने विकासाचे साधन असावीत

नैसर्गिक संसाधनांचे बेकायदेशीर शोषण आणि त्यांची तस्करी काही विशिष्ट परिस्थितींमध्ये सशस्त्र गटांना वित्तपुरवठा करण्यास आणि संघर्ष दीर्घकाळ चालण्यास कारणीभूत ठरू शकते, असे पर्वथनेनी यांनी सांगितले. नैसर्गिक संसाधने ही प्रामुख्याने सार्वभौम राष्ट्रांच्या विकासाचे आणि समृद्धीचे साधन असायला हवीत, यावर त्यांनी भर दिला. ■

## बनारस-मुंबई रेल्वेला घातपात घडवण्याचा प्रयत्न



**प्रयागराज, २३ जुलै**


बनारस-मुंबई एलटीटी एक्सप्रेसला अपघात घडवण्याचा प्रयत्न अपयशी ठरला आहे. उत्तरप्रदेशातील इरादतगंज आणि लिंक स्टेशन दरम्यानच्या रेल्वे मार्गावर लोखंडी पाईप दिसल्यामुळे लोको पायलटला आपत्कालीन ब्रेक लावावे लागले आणि यामुळे एक मोठा अपघात टळला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली.

वाराणसीहून मुंबईकडे जाणारी ट्रेन मंगळवारी रात्री ९ च्या सुमारास, रुळावर अडथळा दिसून आल्यानंतर थांबवण्यात आली. लोको पायलटनी त्वरित रेल्वे अधिकाऱ्यांना याची सूचना दिली. पाईप रुळांवर फेकला गेल्याचे दिसून आले. तो पोकळ आणि गंजलेला होता, असे उत्तर मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी शिवम शर्मा यांनी सांगितले. रेल्वे सुरक्षा दलाने अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या घटनेचा तपास सुरू केला आहे. रुळावरून पाईप हटवण्यात आला आणि त्यानंतर काही मिनिटांतच ट्रेनने मुंबईच्या दिशेने आपला प्रवास पुन्हा सुरू केला. ◂ (वृत्तसंस्था)

# आंदोलकांच्या हल्ल्यात अनेक पोलिस जखमी

## गुरुवारी पहाटेपर्यंत दिल्लीच्या रस्त्यांवर हिंसाचार, गोंधळ





पोलिसांसोबत झटापट करताना आंदोलक आणि जंतर मंतरजवळ आंदोलकांच्या हल्ल्यात जखमी झालेले पोलिस निरीक्षक

**नवी दिल्ली, २३ जुलै**

कर्तव्यावर जात असताना जंतर मंतरजवळ आंदोलकांच्या एका गटाने केलेल्या हल्ल्यात एक पोलिस निरीक्षक जखमी झाले आहेत. बुधवारी रात्री त्यांनी आपले वाहन हनुमान मंदिराजवळ पार्क केले होते. त्यानंतर ते जंतर मंतरकडे आपल्या कर्तव्यावर पायी असताना हा हल्ला करण्यात आला, अशी माहिती स्वतः पोलिस अधिकारी नंद किशोर सिंग यांनी गुरुवारी दिली. बुधवारी दिवसा आणि गुरुवारी पहाटे एकवाजेपर्यंत दिल्लीच्या रस्त्यांवर आंदोलकांचा गोंधळ सुरू होता.

पोलिसांनुसार, जंतर मंतरवर जात असताना पोलिस निरीक्षकाला पार्लमेंट स्ट्रीट जंक्शनजवळ एक मोठी गर्दी दिसली. तिथे सुमारे ४,००० ते ५,००० लोक जमले होते. ते पोलिस आणि सरकारविरोधी घोषणा देत होते. त्यावेळी मी कर्तव्य बजावण्यासाठी त्या भागातून जाण्याचा प्रयत्न करत असताना सुमारे १०० ते १५० लोकांनी त्यांना घेरले व माझ्यावर हल्ला केला, असेही सिंग यांनी सांगितले. जंतरमंतर आणि आसपासच्या परिसरात असलेले पोलिस बूथ आणि बॅरिकेड्सवर आंदोलकांनी ताबा मिळविला होता. पोलिसांच्या वाहनांची तोडफोड करीत पोलिस कर्मचाऱ्यांवर दगडफेक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

**लाठ्या, काठ्या, दगडांनी केली मारहाण**

सिंग पुढे म्हणाले, त्यांनी मला लाठ्या, काठ्या, दगड आणि त्यांच्या हातात असलेल्या सर्व धारदार वस्तूंनी मारहाण केली. मी जखमी झालो आणि कसाबसा तिथून निसटण्यात यशस्वी झालो. जेव्हा त्यांनी माझ्यावर हल्ला केला, तेव्हा मी गणवेशात होतो. जंतर मंतर परिसरात विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान ही घटना घडली. तिथे आंदोलक आणि पोलिस कर्मचाऱ्यांमध्ये संघर्ष झाला. या हिंसाचारात अनेक कर्मचारी जखमी झाल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ताहीरच्या शिक्षेची सुनावणी पुढे ढकलली



**नवी दिल्ली, २३ जुलै**

इंटेलिजन्स ब्युरोचे अधिकारी अंकित शर्मा यांच्या हत्येप्रकरणी दोषी ठरवण्यात आलेला आपचा माजी नगरसेवक ताहीर हुसैन आणि इतर चौघांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेच्या प्रमाणाबाबतची सुनावणी बचाव पक्षाने वेळ मागितल्याने येथील न्यायालयाने २७ एप्रिलपर्यंत पुढे ढकलली. अतिरिक्त वेळेसाठी वारंवार विनंती केल्यानंतर, अतिरिक्त सत्र न्यायाधीश प्रवीण सिंह यांनी कामकाज तहकूब केले. शिक्षा जाहीर करण्याबाबत दोषी व्यक्तीला दीर्घकाळ आहेत, असे न्यायाधीश म्हणाले.

हुसेन यांच्या वतीने बाजू मांडताना वकील राजीव मोहन आणि तारा नरुला यांनी आपले म्हणणे मांडण्याची तयारी करण्यासाठी वेळ मागितला. ही कायदेशीर प्रक्रिया आता शिक्षा सुनावण्याच्या टप्प्यावर पोहोचली आहे आणि या टप्प्यावर आरोपीसाठी त्याचे परिणाम अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहेत, असा युक्तिवाद त्यांनी केला. न्यायाधीशांनी सुरुवातीला ती विनंती फेटाळून लावली आणि संबंधित पक्षांना युक्तिवाद पुढे चालू ठेवण्यास सांगितले. मात्र, सरकारी पक्षाने आपली बाजू मांडण्यास सुरुवात करण्याच्या अगदी काही क्षण आधीच त्यांनी आपल्या निर्णयाचा फेरविचार केला. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### ऑगस्टमध्ये सुरू होईल 'किंग'चे चित्रीकरण




**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानचा बहुचर्चित चित्रपट 'किंग' आता त्याच्या अंतिम चित्रीकरणाच्या टप्प्यात पोहोचला आहे. चित्रपटाचे शेवटचे आंतरराष्ट्रीय शेड्यूल ऑगस्टमध्ये अमेरिकेत चित्रीत केले जाईल. यासाठी निर्माते अनेक ठिकाणांवर तयारी करत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंद करत आहेत. आता शूटिंग अंतिम टप्प्यात आहे आणि ऑगस्टमध्ये प्रस्तावित अमेरिका शेड्यूल पूर्ण होताच चित्रपटाचे मुख्य चित्रीकरण संपेल. यापूर्वी चित्रपटाचे एक महत्त्वाचे शेड्यूल जॉर्जियामध्ये पूर्ण करण्यात आले होते. चित्रपटाचे बहुतेक चित्रीकरण पूर्ण झाले आहे आणि आता केवळ क्लायमॅक्सचा मोठा ॲक्शन सीक्वेंस चित्रित करणे बाकी आहे. या चित्रपटात शाहरुखसोबत त्याची मुलगी सुहाना खान मुख्य भूमिकेत दिसणार आहे. ■

### 'द ओडिसी' ने सहा दिवसांत कमावले ८० कोटी



**मुंबई :** हॉलिवूडचे प्रसिद्ध दिग्दर्शक ख्रिस्तोफर नोलन यांचा बहुप्रतीक्षित चित्रपट 'द ओडिसी' ला भारतात जबरदस्त प्रतिसाद लाभला आहे. या चित्रपटाची प्रदर्शनाच्या सहाव्या दिवशीच भारतातील कमाई ८०.६५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. 'द ओडिसी'ने भारतात आयमॅक्स प्रदर्शनाच्या बाबतीतही मोठी कामगिरी केली आहे. चित्रपटाने भारतातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या 'आयमॅक्स ओपनर्स'पैकी एक म्हणून नोंद केली असून, त्याने 'मिशनः इम्पॉसिबल - द फायनल रेकनिंग'ला मागे टाकले आहे. जगभरात नोलनचा एक प्रेक्षकवर्ग तयार झाला आहे. ग्रीक कवी होमर याच्या 'द ओडिसी' या महाकाव्यावर आधारीत हा चित्रपट असून ट्रॉयच्या युद्धानंतर ओडिसियसचा पुन्हा घरी परतण्याचा प्रवास यात दाखवला आहे. चित्रपटात मॅट डेमन मुख्य भूमिकेत असून त्याच्या अदाकारीचे कौतूक होत आहे. चित्रपटात टॉम हालॅंड, ॲने हाथवे, झेंडाया, रॉबर्ट पॅटिन्सन, चार्लिज थेरॉन अशी मोठी स्टारकास्ट आहे. ■

### 'बटाट्याची चाळ' नव्या संगीतिकेच्या रूपात




**मुंबई :** मराठी साहित्यविश्वातील पु. ल. देशपांडे लिखित 'बटाट्याची चाळ' या अजरामर साहित्यकृतीतील 'एक संगीतक' म्हणजेच संगीत नाट्य स्वरुपात ही संकल्पना नव्या रंगमंचीय रूपात येणार आहे. 'या इथे चाळ बटाट्याची' या दोन अंकी आणि २१ कलाकारांसह गद्य संवाद विरहित मराठी संगीतिका सादर होणार आहे. कार्यक्रमाची निर्मिती कपीश जोशी यांची असून दिग्दर्शन देवेंद्र भोमे, योगेश सप्रे यांचे आहे. संगीत दिग्दर्शन देवेंद्र भोमे यांचे आहे, तर नाट्यरूपांतर योगेश सप्रे यांचे आहे. पंढरीनाथ कांबळे, अजित परब, मिलिंद जोशी, आशुतोष मुंगळे, अंजली मराठे, शमिका भिडे, स्वरांगी मराठे, केतन पवार, वज्रांग आफळे, मधुरा आफळे, तन्वी परांजपे, इशिता सावळे, साक्षी देशपांडे अशी दमदार कलाकारांची फळी या कार्यक्रमातून भेटीस येणार आहे. नेपथ्य संदेश बेंद्रे, प्रकाशयोजना सुजय भडकमकर, वेशभूषा गायत्री चक्रदेव, नृत्य रचना मधुरा आफळे, निर्मिती सूत्रधार नितीन नाईक, पराग पब्लिसिटी तर सूत्रधार मयूर वैद्य आहेत. ■

# मुख्य आरोपी संजीवला क्लीन चीट

## नीट-यूजी २०२४ पेपरफूट प्रकरण | सीबीआयने पुराव्याअभावी ठरविले निर्दोष



**पाटणा, २३ जुलै**

केंद्रीय अन्वेषण ब्युरोने (सीबीआय) नीट-यूजी २०२४ पेपरफुटी प्रकरणातील आरोपी संजीव कुमार उर्फ संजीव मुखियाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. एजन्सीने म्हटले आहे की, सखोल आणि संपूर्ण तपासणीदरम्यान नीटची प्रश्नपत्रिका फुटण्यात किंवा वितरित करण्यात सामील असलेल्या संजीव मुखियाच्या विरोधात कोणताही पुरावा आढळला नाही. त्यामुळे, या प्रकरणात कोणतेही आरोपपत्र दाखल करण्यात आले नाही.

२०२४ मध्ये बिहार पोलिसांनी नीट-यूजी २०२४ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेची चोरी उघडकीस आणली आणि या संदर्भात गुन्हा दाखल केला. प्राथमिक तपासात संजीव मुखियावर संशय निर्माण झाला होता. कारण तो यापूर्वी अनेक परीक्षा प्रश्नपत्रिका चोरी आणि पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये सामील असल्याचे आढळले होते. या आधारावर, बिहार पोलिसांनी एफआयआरमध्ये त्याचे नाव आरोपी म्हणून नोंदवले. या प्रकरणाचा तपास नंतर सीबीआयकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान प्रश्नपत्रिकेची चोरी, वितरण आणि त्यातून नफा कमावण्यात सामील असलेल्या प्रत्येकाला ओळखण्यात आले. त्यानंतर, सीबीआयने पाटणा येथील सक्षम न्यायालयात एकूण ४५ आरोपींविरुद्ध अनेक आरोपपत्रे दाखल केली. प्रश्नपत्रिका चोरण्याच्या किंवा वितरित करण्याच्या कटात संजीव मुखिया सामील होता हे सिद्ध करण्यासाठी कोणताही पुरावा आढळला नाही. ◂ (वृत्तसंस्था)

### सीबीआयने दिला जामीन

तपासादरम्यान संजीव मुखिया फरार होता. नंतर बिहार पोलिसांनी त्याला इतर प्रकरणांमध्ये अटक केली. नीट-यूजी २०२४ प्रकरणाशी संबंधित एफआयआरमध्येही त्याचे नाव होते. त्यामुळे सीबीआयने त्याला या प्रकरणात चौकशीसाठी पोलिस कोठडीत घेतले. मात्र, चौकशी आणि तपासानंतर त्याच्याविरुद्ध कोणताही पुरावा न आढळल्याने सीबीआयने या प्रकरणात त्याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल केले नाही. त्याला या प्रकरणात जामीन मंजूर करण्यात आला. ■

## दोन तस्करांना अटक; शस्त्रे जप्त

**चंदीगड, २३ जुलै**

सीमापार अवैध शस्त्र आणि अमली पदार्थांच्या तस्करीच्या टोळीचा पंजाब पोलिसांनी भंडाफोड केला. या प्रकरणात दोन तस्करांना अमृतसरमध्ये अटक करण्यात आली. आरोपींकडून सहा अत्याधुनिक पिस्तूल, १ किलो हेरॉईन, १ किलो अफू आणि १०,००० रुपये रोख रक्कमही जप्त करण्यात आली, अशी माहिती पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी गुरुवारी दिली. आरोपी एका परदेशी सूत्रधाराच्या थेट संपर्कात होते, जो गुन्हेगारी टोळ्यांना वितरणासाठी आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडे अवैध शस्त्रे आणि अमली पदार्थांची तस्करी सुलभ करत होता, असेही त्यांनी सांगितले. ◂ (वृत्तसंस्था)



हिमालयीन क्षेत्रात सुरू असलेल्या संततधारेमुळे गंगा-यमुनेसह उपनद्या दुथडी भरून वाहत आहेत. पाण्याची पातळी वाढल्याने शेकडो बोटींनी नांगर टाकल्याचे प्रयागराज येथील दृश्य

# रथयात्रेच्या विधींसाठी गुंडीचा मंदिरात प्रवेश बंदी

**पुरी, २३ जुलै**

भगवान जगन्नाथ आणि त्यांच्या बंधू-भगिनींच्या परतीच्या यात्रेच्या, म्हणजेच 'बाहुडा यात्रे'च्या तयारीचा भाग म्हणून, ओडिशाच्या पुरी येथील गुंडीचा मंदिरात गुरुवार संध्याकाळी ६ वाजल्यापासून सार्वजनिक प्रवेश बंद राहील.

बाहुडा यात्रेपूर्वी मंदिराचे शुद्धीकरण आणि इतर विधी सुलभ करण्यासाठी हे मंदिर बंद ठेवणे आवश्यक आहे. या कालावधीत, महत्त्वाचे धार्मिक विधी मंदिराच्या आवारातच पार पाडले जातील. हे विधी सुरळीतपणे पार पडावेत यासाठी भाविकांनी मंदिर प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंती करण्यात आली आहे, असे श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाने निवेदनात सांगितले.

विधी पार पाडण्यात सहकार्य आणि समन्वय साधल्याबद्दल मंदिर प्रशासनाने सेवकांचे आभारही मानले. रथयात्रेपासून ज्या 'अडपा मंडपा'त हे बंधू-भगिनी राहत आहेत, तेथे भाविकांसाठी देवतांचे 'दर्शन' घेण्याचा हा शेवटचा दिवस होता.

सकाळपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा दिसत होत्या, कारण देवतांच्या परतीच्या प्रवासाला निघण्यापूर्वी त्यांचा आशीर्वाद घेण्याची अंतिम संधी मानल्या जाणाऱ्या 'संध्या दर्शना'साठीही हा दिवस महत्त्वाचा आहे. ◂ (वृत्तसंस्था)

## सोनम रघुवंशीचा जामीन रद्द




**नवी दिल्ली, २३ जुलै**

मधुचंद्राला गेले असताना २०२५ मध्ये पतीची हत्या करणाऱ्या सोनम रघुवंशीला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दणका दिला असून, तिचा जामीन रद्दबातल केला आहे. सोनम रघुवंशीला दिलेल्या जामिनाला आव्हान देत मेघालय सरकारने दाखल केलेली याचिका न्यायालयाने मंजूर केली.

तीन आठवड्यांत पोलिसांना शरण जा, असा आदेश न्या. एम. एम. सुंदरेश आणि न्या. प्रसन्न वराळे यांच्या न्यायासनाने सोनम रघुवंशीला दिला. खटला सहा महिन्यांत पुढे सरकला नाही आणि त्याचा निकाल न लागल्यास सोनम नवीन जामीन अर्ज दाखल करू शकते. ■

# चुंबकीय शक्तीमुळे रक्तवाहिन्यांची वाढ शक्य

## वैद्यकीय प्रत्यारोपणासाठी पर्यायी अवयव | उती तयार करण्याचा मार्ग मोकळा



**वॉशिंग्टन, २३ जुलै**

शास्त्रज्ञांनी चुंबकीय शक्तींचा वापर करून प्रयोगशाळेत तयार केलेल्या रक्तवाहिन्यांच्या वाढीला नियंत्रीत करण्याची पद्धत संशोधकांनी विकसित केली आहे. मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील संशोधकांच्या नेतृत्वाखालील संघाने हे नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. वैद्यकीय प्रत्यारोपणासाठी आवश्यक पर्यायी अवयव आणि उती तयार करण्याचा मार्ग यामुळे मोकळा होऊ शकतो.

प्रयोगशाळेच्या वातावरणात केशवाहिन्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सूक्ष्म रक्तवाहिन्यांची पुनर्रचना करणे, हे जैववैद्यकीय अभियंत्यांसाठी मोठे आव्हान होते. केशिका सूक्ष्म असून त्यांचा व्यास ०.००५ मिलिमीटर इतका पातळ असतो, परंतु त्या सजीवांच्या पेशींना ऑक्सिजन आणि महत्त्वाची पोषक तत्वे पुरवण्यासाठी अत्यावश्यक असतात. रासायनिक वाढ घटक किंवा ३-डी प्रिंटिंगवर अवलंबून असलेल्या पूर्वीच्या पद्धतींमध्ये वास्तववादी, संघटित रक्तवाहिनी जाळे तयार करण्यात अचूकतेचा अभाव होता.

ही नवीन पद्धत, रक्तवाहिन्यांच्या अस्तराचे मूलभूत घटक असलेल्या 'एंडोथेलियल' पेशींनी भरलेल्या आणि 'कोलेजन जेल'मध्ये सोडलेल्या एका लहान चिपवर अवलंबून आहे. संशोधकांनी चिपच्या आत एक सूक्ष्म चुंबक ठेवले आणि बाह्य चुंबकीय क्षेत्रांचा वापर करून जेलला हळुवारपणे त्रिमितीय दिशेने ताणले. चुंबकीय ताणाची वारंवारता आणि तीव्रता समायोजित करून, वाढणाऱ्या केशवाहिन्यांची दिशा, लांबी आणि संख्या अचूकपणे निश्चित करता येते, असे संशोधकांना आढळले. निरोगी मानवी ऊती पूर्णपणे संघटित रक्तवाहिनी जाळ्यांवर अवलंबून असतात, असे संशोधक रितू रमण यांनी स्पष्ट केले. रक्तवाहिनीच्या पेशींना पुढे-मागे ताणल्याने नवीन केशवाहिन्यांच्या निर्मितीला लक्षणीय चालना मिळाली, ज्यामुळे भौतिक नियंत्रण प्राप्त झाले. हे केवळ रासायनिक संकेतांद्वारे कधीही साध्य होऊ शकले नसते, असे संशोधकांना आढळून आले. संघाने या प्रक्रियेमागील जैविक यंत्रणा देखील उघडकीस आणली. पेशींमधील दाब-संवेदनशील वाहिन्यांचे व्यवस्थापन करणारे पीईझेडओ-१ नावाचे जनुक यात महत्त्वाची भूमिका बजावते, असे प्रयोगांमधून दिसून आले. ◂ (वृत्तसंस्था)

### संशोधन अजून प्राथमिक टप्प्यात

हे जनुक निष्क्रिय केले गेले, तेव्हा रक्तवाहिन्यांची वाढ झपाट्याने कमी झाली. यावरून यांत्रिक ताणामुळे रक्तवाहिन्यांचे जाळे तयार करण्यासाठी विशिष्ट जैविक मार्ग कार्यान्वित होतात, हे सिद्ध होते. हे संशोधन अजून प्राथमिक टप्प्यात असले तरी, चुंबकाच्या साहाय्याने चालणाऱ्या या रक्तवाहिन्यांमधून रक्त किती प्रभावीपणे वाहते याची चाचणी घ्यावी आणि स्नायूंच्या ऊतींपासून सुरुवात करून, त्यांना प्रयोगशाळेत वाढवलेल्या मोठ्या ऊतींमध्ये समाविष्ट करावे, अशी योजना शास्त्रज्ञांची आहे. ■

## अग्रलेख

# ...तशीच नोंद व्हावी

जंतर-मंतर मैदानावरील आंदोलनात गेल्या दोन-तीन दिवसांत जे काही घडले, त्यावरून ते प्रश्न सोडविण्याच्या प्रामाणिक उद्देशाने उभे राहिल्याचे वाटत असले, तरी काही प्रश्न निर्माण करणारे घटक तेथे आंदोलकांचा मुखवटा पांघरून वावरत असावेत, अशी शंका घेण्यास वाव आहे. परकीय शक्ती आणि भारतात अस्थिरता निर्माण करणारी तत्त्वे सक्रिय झाल्याची चर्चाही सुरू झाली आहे. राज्यघटनेने प्रत्येक नागरिकास आपल्या हक्कांसाठी संघर्ष करण्याचा, व्यवस्थेस जाब विचारण्याचा आणि न्याय मिळविण्यासाठी संघटित होण्याचा अधिकार दिलेला आहेच; त्यामुळे हे आंदोलन न्यायासाठीचा संघर्ष ठरले पाहिजे अशी अपेक्षा असताना, त्याआडून सुरू झालेल्या राजकारणाकडे आणि डावपेचांकडे सजगतेने पाहण्याची आवश्यकता आहे. अशा आंदोलनांत राजकारणाचा शिरकाव झाला, तर ती केवळ समस्यांचा संघर्ष न राहता राजकीय हेतूने प्रेरित नियोजनबद्ध मोहीम ठरते. समस्या सुटण्याऐवजी त्या जटिल होतातच; पण त्यामध्ये नव्या समस्यांचीही भर पडते, असे आसपासच्या देशांमध्ये घडलेल्या 'जेन-झी'च्या आंदोलनांतून व त्यानंतर घडलेल्या सत्तांतरातून उघड झालेले आहे. आता देशात सुरू असलेल्या या आंदोलनाच्या निमित्ताने, अन्य देशांतील सत्तापालटानंतरच्या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक ठरते.

जगभरातील तरुणाईच्या मनात खदखदत असलेले काही प्रश्न भारतातील तरुणांसमोर असून त्यांची दखल घेऊन तरुणांना प्रश्नमुक्तीचा प्रशस्त मार्ग दाखविण्याची गरज जंतर-मंतरवरील आंदोलनामुळे अधोरेखित झाली, हे नाकारता येत नाही. नव्या सहस्रकात जन्मलेली 'जेन-झी' पिढी समाजासमोरील समस्या, तरुण पिढीपुढील प्रश्न आणि सत्ताकारणाकडे जागरूकपणे पाहणारी शक्ती म्हणून ती उदयास येऊ लागली आहे. महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने, पर्यावरण, सामाजिक न्याय आदी अनेक प्रश्नांवर देशातील यंत्रणांना प्रश्न विचारण्याची ताकद या पिढीने प्राप्त केलेली आहे. आंदोलनाचा हेतू, आंदोलकांच्या मागण्या आणि त्यावरील उपाययोजना यांकडे गांभीर्याने पाहून त्यावर ठोस तोडगा काढण्याची गरज अधोरेखित झाली आहे. पण, त्याची दुसरी बाजूही तेवढीच महत्त्वाची आहे. अन्य काही देशांत जेन-झीच्या आंदोलनांनी तेथील प्रस्थापित सत्तांना हादरे दिले आणि काही ठिकाणी सत्तापालटही घडून आला. कोणतेही आंदोलन हे समस्या निर्माण करण्यासाठी नव्हे, तर सोडविण्यासाठी उभारले गेले तरच त्यास समाजाचा व्यापक पाठिंबा मिळत असतो. या अनुषंगाने अशा आंदोलनांचे जगातील वास्तव पाहिले तर उत्तर फारसे आशादायक नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. अशा आंदोलनांनी सत्तापालट घडवून आणले हे खरे. पण ज्या असंतोषाच्या उद्रेकातून सत्तांतर घडले, त्या असंतोषाची कारणे दूर करणे अत्यंत कठीण झाले असल्याचे दिसते आहे. अशा आंदोलनांमधून प्रकट होणारा तरुणांचा असंतोष संपूर्ण आर्थिक-सामाजिक व्यवस्थेविरुद्ध असेल, तर तो समस्या सोडविण्यास साह्यभूत ठरतो. तो व्यक्तिविरोधी असेल तर मूळ मुद्याचाही संकोच होतो. व्यवस्था बदलण्यासाठी व्यक्तीविरुद्ध दिल्या जाणाऱ्या घोषणांपेक्षा, व्यापक संस्थात्मक सुधारणा आवश्यक असतात, हा अन्य देशांतील आंदोलनांनंतरच्या परिस्थितीने जगाला शिकविलेला धडा आहे. बांगला देशात विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी उभारलेल्या आरक्षणविरोधी व भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाचे उदाहरण ताजे आहे. या आंदोलनानंतर सत्तेवर आलेल्या नव्या राज्यकर्त्यांनी डिजिटल स्वातंत्र्य, रोजगारनिर्मिती आणि शिक्षण सुधारणा यांची वारेमाप आश्वासने तरुणांना दिली. काही प्रमाणात पोलिस कारवाईवरील नियंत्रण, ऑनलाईन अभिव्यक्तीवरील निर्बंध कमी करणे आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन अशी पावले उचलली गेली. मात्र, या देशाची वस्त्रोद्योगावर अवलंबून असलेली अर्थव्यवस्था सत्तांतरानंतरही मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करू शकलेली नाही. श्रीलंकेतील स्थिती फारशी वेगळी नाही. चार वर्षांपूर्वी उभ्या जगाचे लक्ष या देशातील तरुणाईच्या आंदोलनाने वेधले होते. इंधन टंचाई, महागाई आणि आर्थिक संकटातून देश सावरण्याचे आलेल्या अपयशामुळे संतापलेल्या तरुणांनी राष्ट्राध्यक्षांना पदत्यागास भाग पाडले. ही आंदोलने जगाला एक नवी शिकवण देऊन गेली आहेत. ती म्हणजे, रस्त्यावरची क्रांती सरकार बदलू शकते; पण कर्जबाजारी अर्थव्यवस्था आणि निर्ढावलेली यंत्रणा यांमध्ये तातडीचे बदल घडविणे सोपे नसते. लोकांच्या अपेक्षा आणि त्या पूर्ण करणाऱ्या व्यवस्थेचा वेग यांमध्ये अंतर पडले, तर आंदोलनांतील आदर्शवाद आणि सत्तेतील व्यवहारवाद यांच्यात मोठा संघर्ष निर्माण होऊ शकतो. परिणामी तो सातत्यपूर्ण अस्थिरता निर्माण करण्यास कारणीभूतही ठरू शकतो, हे चिली नामक देशात जेन झीच्या आंदोलनानंतर घडलेल्या सत्तांतरावरून स्पष्ट झाले. त्या देशात शिक्षणावरील वारेमाप खर्च, आर्थिक विषमता आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या आंदोलनातूनच तरुण नेतृत्व सत्तेत आले. नव्या सरकारने किमान वेतनवाढ, सामाजिक सुरक्षा, महिलांचे अधिकार आणि पर्यावरणीय धोरणांवर भर दिला. पण आर्थिक मंदी, संसदीय विरोध आणि लोकांच्या अतिउच्च अपेक्षा यामुळे बदलांचा वेग कमी पडला. ट्युनिशिया, इजिप्त, लिबिया यांसारख्या देशांतही तरुणांनी सत्तेविरुद्ध उठाव केले, पण त्यानंतरही अनेक ठिकाणी लष्करी नियंत्रण, यादवी संघर्ष किंवा आर्थिक अस्थिरता कायमच राहिल्याने, व्यवस्थेविरुद्धचा असंतोष आणि अपेक्षाभंगाचे दुःख कायमच आहेत. आजच्या तरुणांचा असंतोष बहुआयामी आहे. त्यांना फक्त नोकरी नको. त्यांना सन्मान, मानसिक आरोग्य, स्वातंत्र्य, पर्यावरणीय सुरक्षा आणि गुणवत्तापूर्ण जीवन हवे आहे. पारंपरिक राजकारणाने ही अपेक्षा समजून घेतली, तर संवादाच्या मार्गाने अपेक्षित बदल घडणे अवघड नसते. मात्र, तसे न झाल्यास, कोणत्याही आंदोलनाचे भविष्यकालीन परिणाम दीर्घकाळ झेलावे लागतात. भारतात सुरू असलेल्या आंदोलनाच्या संयोजकांना याचे भान राखावे लागेल. सत्तापालटाच्या अपेक्षेने आंदोलनांचा राजकीय आखाडा घडवू पाहणाऱ्यांचे पाठबळ मिळविण्याऐवजी, संस्थात्मक बदलाचा व्यापक आराखडा तयार करण्याकरिता सामाजिक सहकार्याचा एल्गार आवश्यक आहे. असा आराखडाच संस्थात्मक पारदर्शकता वाढवू शकतो, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यांमधील दुवा म्हणून काम करू शकतो आणि तरुणांना केवळ मतदार म्हणून नव्हे, तर धोरण निर्मितीचा भागीदार म्हणून सहभागी करून घेऊ शकतो. अन्यथा, अपरिपक्व असंतोषातून जन्माला येणारे जे काही असेल, ते देखील अपरिपक्व असते. सध्या केवळ एका परीक्षेतील कथित गैरव्यवहार एवढाच तरुणांमधील असंतोषाचा केंद्रबिंदू राहिलेला नाही.

ढासळती शिक्षण व्यवस्था, रोजगारांच्या संधी, स्पर्धा परीक्षा, व्यवस्थांवरील विश्वास आणि सामाजिक गतिशीलता असे अनेक व्यापक मुद्दे या निमित्ताने जोडले गेले आहेत. ज्या देशांत जेन झीची आंदोलने झाली, त्याहून भारताचे राजकीय आणि सामाजिक वास्तव वेगळे आहे. सरकारवर धोरणात्मक बदलांचा दबाव वाढविण्याचा विधायक मार्ग असेच आंदोलनाचे स्वरूप असावयास हवे. रस्त्यावर उतरून सत्तेला हादरा देण्यापेक्षा, सत्तेला कामाला लावण्यात हे आंदोलन यशस्वी झाले, तर भविष्यातील अस्थैर्याची भीती राहणार नाही आणि एका नव्या, पारदर्शक पर्वाचा शिल्पकार म्हणून तरुण पिढीच्या आंदोलनाची इतिहासात नोंद होईल. या आंदोलनाची नोंद तशीच व्हावी, हीच कुठल्याही राष्ट्रभक्ताची इच्छा असेल. अस्थिरतेच्या अनिष्ट परिणामांची पुनरुक्ती करण्याचे कारण नाही. ■

## अर्थविशेष

**ॲड. हितेश पारसे**

# एआयएसमध्ये आता परदेशी मालमत्तेची माहिती

आजच्या जागतिक युगात शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि गुंतवणुकीसाठी लाखो भारतीय नागरिक परदेशाशी आर्थिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. अनेकांकडे अमेरिकेत, कॅनडा, यूके, ऑस्ट्रेलिया, दुबई किंवा सिंगापूरसारख्या देशांमध्ये बँक खाती, शेअर्स, म्युच्युअल फंड, निवृत्ती निधी किंवा स्थावर मालमत्ता आहे. काही जणांना परदेशातून पगार, व्याज, लाभांश किंवा भाडे उत्पन्न मिळते. यापूर्वी याची माहिती केवळ आयकर विभागाकडे उपलब्ध होती. आता आयकर विभागाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून भारतीय करदात्यांच्या परदेशातील आर्थिक मालमत्ता, उत्पन्नाची माहिती त्यांच्या वार्षिक माहिती विवरणपत्रमध्ये दिसणार आहे. हा बदल केवळ तांत्रिक नाही, तर भारतीय करप्रणालीतील पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे.

**एआयएस म्हणजे नेमके काय?** : वार्षिक माहिती विवरणपत्र (एआयएस) म्हणजे करदात्याच्या आर्थिक व्यवहारांचा एक डिजिटल आरसा आहे. यामध्ये बँक व्याज, शेअर व्यवहार, म्युच्युअल फंड व्यवहार, टीडीएस, टीसीएस, मालमत्ता खरेदी-विक्री, उच्च मूल्याचे आर्थिक व्यवहार आदी माहिती याआधी दिसत होती. आता या यादीत परदेशातील आर्थिक माहितीची भर पडणार आहे.

**भारताला ही माहिती मिळते तरी कशी?** : अनेकांना प्रश्न पडतो की, 'मी परदेशात खाते उघडले, तर भारत सरकारला त्याची माहिती कशी मिळेल?' याचे उत्तर आहे माहितीची स्वयंचलित देवाणघेवाण. ही ओईसीडीच्या सामान्य अहवाल मानक अंतर्गत सुरू करण्यात आलेली आंतरराष्ट्रीय माहिती देवाणघेवाण प्रणाली आहे. आज १०० पेक्षा अधिक देश या व्यवस्थेत सहभागी आहेत. प्रत्येक सहभागी देश दरवर्षी आपल्या देशातील परदेशी नागरिकांच्या आर्थिक व्यवहारांची माहिती त्यांच्या मूळ देशाला पाठवतो. उदा. जर एखाद्या भारतीयाने अमेरिकेत खाते उघडले असेल तर अमेरिकेतील वित्तीय संस्था ती माहिती अमेरिकन कर प्राधिकरणाला देते; ती भारताच्या आयकर विभागाकडे पाठविली जाते.

एआयएसमध्ये खालील माहिती भारताला दिसण्याची शक्यता आहे- परदेशातील बँक खात्याचा तपशील, खात्यातील शिल्लक, व्याज उत्पन्न, लाभांश, शेअर्स व सिक्युरिटीजमधील गुंतवणूक, म्युच्युअल फंड, विमा पॉलिसी, आर्थिक मालमत्ता; काही परिस्थितीत स्थावर मालमत्तेची माहिती. आतापर्यंत ही माहिती आयकर विभागाकडे उपलब्ध असली तरी करदात्याला ती दिसत नव्हती. आता हीच माहिती एआयएसमध्ये उपलब्ध झाल्यामुळे करदाता स्वतः आधी तपासू शकेल आणि आवश्यक असल्यास दुरुस्तीही करू शकेल. ही बाब करदात्यांसाठी निश्चितच सकारात्मक आहे.

आयकर विभागाने माहिती अपलोड करण्यासाठी वेळापत्रक निश्चित केले आहे. २०२२ ते २०२४ या कालावधीतील माहिती ८ जुलै २०२६ पासून पुढील ९० दिवसांत एआयएसमध्ये उपलब्ध केली जाईल. २०२५ मधील माहिती प्राप्त झालेल्या महिन्याच्या अखेरीपासून ९० दिवसांच्या आत एआयएसमध्ये दिसेल. २०२६ पासून पुढे दरवर्षी माहिती प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत ती एआयएसमध्ये उपलब्ध होईल.

आजपर्यंत अनेक करदाते असे समजत होते की, परदेशातील मालमत्ता भारताला कळणार नाही. परंतु आता आयकर विभागाकडे उपलब्ध असलेली माहिती आणि आपण आयकर विवरणपत्रात दिलेली माहिती यांची थेट तुलना होणार आहे. जर दोन्ही माहितीमध्ये तफावत आढळली तर करदात्याला स्पष्टीकरण द्यावे लागू शकते. म्हणूनच आता 'माहिती उघड करणे हेच सर्वोत्तम धोरण आहे.' हे तत्त्व अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

**कोणत्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी?** : खालील करदात्यांनी आपल्या आर्थिक नोंदी तातडीने तपासाव्यात- परदेशात नोकरी केलेले भारतीय, अनिवासी भारतीय वरून निवासी बनलेले नागरिक, दुहेरी निवासस्थान असलेले करदाता, परदेशातील बँक खातेधारक, विदेशी शेअर्समध्ये गुंतवणूक करणारे, अमेरिकन ईएसओपी प्राप्त कर्मचारी, परदेशात घर किंवा फ्लॅट असलेले नागरिक, विदेशी लाभांश किंवा व्याज मिळविणारे, ऑनलाईन आंतरराष्ट्रीय गुंतवणूक प्लॅटफॉर्म वापरणारे गुंतवणूकदार. सरकारकडून एकवेळ माहिती जाहीर करण्याची संधी. सरकारने एका विशेष एकवेळच्या प्रकटीकरणाची योजनाची रूपरेषा जाहीर केली आहे. यात दोन प्रकारच्या प्रकरणांचा विचार करण्यात आला.

१. न जाहीर केलेले विदेशी उत्पन्न किंवा मालमत्ता- जर एकूण न जाहीर केलेली रक्कम ₹ १ कोटींपेक्षा कमी असेल तर. ३० टक्के कर; त्या कराच्या १०० टक्के इतका दंड भरून माहिती जाहीर करण्याची संधी मिळू शकते.

२. वैध उत्पन्नातून खरेदी केलेली, पण जाहीर न केलेली विदेशी मालमत्ता- जर विदेशी मालमत्तेचे मूल्य ₹ ५ कोटींपेक्षा कमी असेल तर. ₹ १ लाख निश्चित शुल्क भरून माहिती जाहीर करता येऊ शकते.

या योजनेतून खालील प्रकरणे या सवलतीपासून वगळली जाऊ शकतात- गुन्हेगारी उत्पन्नातून मिळालेली मालमत्ता, काळा पैसा कायद्यांतर्गत आधीच तपास पूर्ण झालेली प्रकरणे, कायद्याने अपात्र घोषित केलेली प्रकरणे. हा बदल लक्षात घेता खालील कृती तातडीने करणे आवश्यक आहे- आपल्या एआयएसची नियमित तपासणी करा. परदेशातील सर्व बँक खाती आणि गुंतवणुकीची यादी तयार ठेवा. मागील काही वर्षांचे आयटीआर आणि अनुसूची एफए पुन्हा तपासा. विदेशी उत्पन्न भारतात करपात्र आहे का, याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घ्या. दुहेरी कर टाळण्याचा करार (डी.टी.ए.ए.) चा लाभ मिळत असल्यास योग्य अंमलबजावणी करा. एआयएस आणि आयटीआरमधील माहितीमध्ये तफावत दुरुस्ती करा.

कधी कधी वित्तीय संस्थेकडून चुकीची माहिती पाठविली जाऊ शकते. उदा. चुकीचा पॅन जोडला जाणे, व्यवहाराची दुप्पट नोंद, चुकीची रक्कम, चुकीची व्यक्ती. अशा परिस्थितीत घाबरण्याचे कारण नाही. एआयएसमध्ये उपलब्ध असलेल्या प्रतिक्रिया सुविधेद्वारे संबंधित माहितीबाबत हरकत नोंदविता येते आणि आवश्यक पुरावे सादर करून दुरुस्ती मागता येते.

**निष्कर्ष** : भारतीय करप्रणाली जागतिक पारदर्शकतेच्या नव्या टप्प्यात प्रवेश करीत आहे. परदेशातील आर्थिक व्यवहार, बँक खाती, गुंतवणूक व मालमत्तेची माहिती आयकर विभागापर्यंत पोहोचत असल्याने ती योग्य प्रकारे आयकर विवरणपत्रात जाहीर करणे ही प्रत्येक करदात्याची जबाबदारी आहे. तज्ज्ञ करसल्ल्याच्या आधारे आपण भविष्यातील कर-विवाद, दंडात्मक कारवाई व अनावश्यक चौकशी सहज टाळू शकतो. कर पालनातील पारदर्शकता हीच जागतिक अर्थव्यवस्थेतील सुरक्षितता आहे. ■

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# जगण्याचा 'फायर' ट्रेंड!

सोशल मीडियाच्या काळात दररोज जगण्याचे नवनवे ट्रेंड व्हायरल होतात आणि चर्चा सुरू होते. उद्याचा दिवस कोणी पाहिला? म्हणून आजचा दिवस तुमच्या हातात आहे तो भरभरून जगून घ्या, हा विचार समाजात विशेषतः कोरोनानंतर जास्त स्थिरावला. 'सातच्या आत घरात'चा ट्रेंड कालबाह्य ठरून, 'वर्क हार्ड, पार्टी हार्डर' स्वीकारून वेगळाच ट्रेंड आपण रुजवला. त्यात खाण्यापिण्यापासून गॅझेट्सपर्यंत अनेक गोष्टींचे ट्रेंड येत-जात राहिले आणि एन्जॉयमेंटच्या साच्यात आपण त्यांना घडवत राहिलो. 'श्यामच्या आई'ची काटकसर तर 'जेन झी'ने पुस्तकातही कदाचितच वाचली असेल. मुळात आपण भविष्याची तरतूद करून ठेवणाऱ्या कष्टाळू मुंग्यांना आदर्श मानणारे! पोटाला चिमटा काढून उद्याची सोय करून ठेवायची, उत्पन्नातून लहानशी का होईना पण बचत करण्याची आपली संस्कृती! पण, पाश्चिमात्यांनी सांगितल्याशिवाय कुठलीच गोष्ट आपल्या गळ्याखाली उतरत नाही. या न्यायाने सध्याच्या 'फायर ट्रेंड'चा वेध घेऊ या!

'फायनान्शियली इंडिपेन्डन्ट, रिटायर अर्ली' एफआयआरई म्हणजे फायर! प्रचंड कष्ट, वेळप्रसंगी दोन-तीन ठिकाणी कामं करून पैसा कमवायचा. मात्र, 'पार्टी हार्डर' न करता उत्पन्नाचा जास्तीत जास्त भाग निवृत्तीनंतरची तरतूद म्हणून गुंतवायचा. यासाठी, कल्पनेपलीकडची काटकसर करायची. आपल्या निवृत्तीची सोय झाली, असं वाटण्याइतके पैसे गुंतवले की निवृत्ती घ्यायची. समाधानकारक जीवनमान असलेल्या लहान देशांमध्ये स्थलांतरित व्हायचं, शेती करायची, गाई-म्हशी पाळायच्या आणि शांत जीवन आनंदाने जगायचं. मात्र, ही निवृत्ती साधारण चाळिशीतच घेण्याची तयारी ठेवायची. हा आहे सध्याचा 'फायर ट्रेंड'! मागच्या शतकात जन्मलेल्या आणि आज ज्यांना 'मिलेनियल' म्हटलं जातं त्या पिढीला कदाचित यात काहीच नवीन वाटणार नाही. कारण खूप कष्ट आणि काटकसर करून जीवन जगायचं, उधळपट्टी हा गुन्हा आहे, खूपच आवश्यक असेल तरच खर्च करायचे हे तर त्यांच्या जीवनाचे मूलभूत नियम होते आणि आहेत.

युरोपियन देशांमध्ये गेल्या दशकभरात सुरू झालेल्या फायर ट्रेंडचे लोण आपल्यापर्यंत येऊन पोहोचले आहे. हॉटेलिंग करायचे नाही, घरी स्वयंपाक करून कामावर जाताना सोबत डबा न्यायचा, विविध डिस्काऊंट कुपन्सचा कल्पकतेने वापर करायचा आणि हे सगळे उपाय करून उरणारी रक्कम गुंतवायची. गुंतवणुकीच्या पैशांवर उरलेले आयुष्य निवांत घालवायचे. असा हिशेब मांडताना आजारपण, अपघात आणि महागाईची संकल्पना लक्षात ठेवून नियोजन करण्याचा संदेश फायर चळवळीतील जाणते देतात.

ही एक जागतिक चळवळ असून ठिकठिकाणी या चळवळीच्या समर्थकांचे गट आहेत. नव्याने फायर अंमलात आणणाऱ्यांना, आधीपासून कार्यरत मंडळी उपयोगी टिप्स देतात. त्यात बचतीचे नवनवे पर्याय, चांगला परतावा देणारी गुंतवणूक, शेती-घर खरेदीतील बारकावे यांचा समावेश होतो. काही वित्तीय कंपन्या तर दरमहा मार्गदर्शिकाही प्रकाशित करतात. दुसरीकडे, उशिरा लग्न आणि अपत्यांचे संगोपन, महागाई, घरांच्या वाढत्या किमती आणि कर्जाच्या बोझ्यामुळे भविष्यासाठीच्या गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले आहे. निवृत्तीचे वयही पुरुषांमध्ये ६४.८ आणि त्यापेक्षा जास्त तर महिलांमध्ये ६३.३ पेक्षा जास्त नोंदविण्यात आलं आहे. वाढीव गुंतवणूक करून, लवकर निवृत्ती घेण्याचा विचारही करणे शक्य नाही. उत्पन्न मर्यादित असल्याने गुंतवणुकीवर बंधने आहेत. वित्तीय कंपन्यांच्या मते, बहुतांश ग्राहकांचं लक्ष काम आणि वैयक्तिक आयुष्यात अधिक चांगला समतोल साधण्यावर असतं. त्यामुळे निवृत्ती घेण्याची घाई करण्याऐवजी अर्थपूर्ण व्यावसायिक कारकीर्द आणि आपल्या आर्थिक क्षमतेनुसार जीवनशैलीचा समतोल साधण्यावर ते भर देतात. तुम्ही लवकर निवृत्त झालात पण, तुमचं सामाजिक वर्तुळ, चांगलं आरोग्य किंवा अर्थपूर्ण ध्येय नसेल, तर केवळ लवकर निवृत्तीचं ध्येय खरंच योग्य ठरतं का? निवृत्तीचं उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न करतानाच आयुष्याचाही आनंद कसा घेता घेईल, असा सुवर्णमध्य युवा शोधत आहेत. चळवळीचे समर्थक आजही पराकोटीच्या काटकसरीलाच लवकर निवृत्तीचा मुख्य मार्ग मानतात.

चळवळीतील काही तत्त्वं खरोखर उपयुक्त आहेत आणि त्यांचा अवलंब केल्यास अगदी चाळिशीत नाही तरी पन्नाशीत निवृत्ती घेणं शक्य होऊ शकतं. लहान वयापासून बचत सुरू करणं आणि प्रत्येक वेतनवाढीनंतर निवृत्तीसाठीची बचत वाढवणं, असा लवचीक मार्ग अवलंबिता येईल. समतोल दृष्टिकोन स्वीकारल्यास मनावर अनावश्यक ताण न घेता, तुम्हाला हवी तशी आणि हवी त्या वेळी निवृत्ती घेणं शक्य होतं. त्यासाठी कोणत्याही ट्रेंडची नाही तर अधिक संतुलित आणि वास्तववादी दृष्टिकोनाची गरज आहे. ■

९२२३७००२७७

## प्रासंगिक

**वैजयंती वडनेरकर**

# असिधाराव्रत स्वीकारणाऱ्या युगप्रवर्तक

**राष्ट्र सेविका समितीच्या आद्य प्रमुख संचालिका वंदनीय मावशी उपाख्य लक्ष्मीबाई केळकर यांचा आषाढ शुद्ध दशमी (२४ जुलै २०२६) हा जन्मदिवस. समितीमध्ये तो दिवस 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जातो. तसेच राष्ट्र सेविका समितीच्या वाटचालीला यावर्षी ९० वर्षे झाली आहेत. त्यानिमित्त...**

युगप्रवर्तक म्हणजे, समाजातील अराजक वृत्तीतून निर्माण झालेल्या अस्थिर अशांत परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजाच्या, मानवी मनाच्या शक्तीमध्ये सकारात्मक, विचारात्मक, संस्कारात्मक राष्ट्रीय हिताचे ध्येय समोर ठेवून, परिवर्तन घडवून आणून एक समर्थ, समक्ष वैचारिकदृष्ट्या परिपूर्ण समाज घडविण्यासाठी प्रतिकूल परिस्थितीतही संकल्प सिद्ध होऊन धर्माधिष्ठित कार्यासाठी आजीवन असिधाराव्रत स्वीकारून युग परिवर्तनाचे कार्य करणारे व्यक्तिमत्त्व. वंदनीय मावशींचा जन्मदिवस समितीमध्ये 'संकल्प दिन' म्हणून साजरा केला जातो.

पारतंत्र्याच्या आधीपासूनच अनेक आक्रमणांनी भारतीय अर्थ, राज्य व जीवन व्यवस्थेवर अनेक आघात केले. भारत सतत संघर्षरतच होता. स्त्रीशक्तीवर अन्याय-अत्याचार होत होते. अशा परिस्थितीत देश-धर्म-संस्कृतीच्या विचार, राष्ट्रभक्तीच्या संस्काराच्या मुशीतच ज्या परिवाराची जडणघडण झाली होती अशा दाते परिवारात जन्माला आलेल्या वंदनीय मावशी उपाख्य लक्ष्मीबाई केळकर यांच्या जीवनावर वेगळे संस्कार असणे शक्यच नव्हते. वंदनीय मावशींनी स्वातंत्र्यपूर्व काळातील आजूबाजूच्या समाजाचे बारकाईने अभ्यासपूर्ण निरीक्षण केल्यावर त्यांना स्त्रियांनी संघटित होऊन समाज घडणीच्या व राष्ट्र उभारणीच्या कार्यात संघटित शक्तीच्या रूपात मदत करणे काळाची गरज वाटू लागली. या साक्षात्कारातूनच त्यांनी राष्ट्रसेविका समितीची स्थापना २५ ऑक्टोबर १९३६ साली केली. तत्पूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प.पू. डॉ. हेडगेवार यांचे मार्गदर्शनातून हे विश्वव्यापी पाऊल उचलले. राष्ट्रसेविका समिती विश्वातील सर्वात मोठे महिलांचे स्वयंसेवी संघटन आहे. राष्ट्र सेविका समितीच्या ९० वर्षांच्या वाटचालीत हिंदुत्वाचा विचार, संस्कार व समाज आणि राष्ट्राप्रति असलेल्या समर्पित भावनेच्या कार्यपद्धतीतून समितीचे हे विश्वव्यापी संघटन झाले आहे. त्या माध्यमातून महिलांमध्ये शुद्ध शील-चारित्र्य तसेच शारीरिक-मानसिक-बौद्धिक क्षमता वाढवून कार्यपद्धतीतून सामाजिक समरसता समाजामध्ये निर्माण करते; शिवाय राष्ट्र जागृती संस्कार शिक्षा सेवा सामाजिक व राष्ट्रीय स्वास्थ्याबरोबरच येणाऱ्या आव्हानांना सक्षमपणे



तोंड देण्यासाठी महिलांना स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे अभूतपूर्व कार्य समितीच्या संस्कारातून होत असते. समितीचे कार्य पाहून स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटले होते की, अन्य महिला संघटनांचे कार्य किंवा राजकीय कार्य हे धो-धो पडणाऱ्या पावसासारखे आहे तर समितीचे कार्य रिमझिम पडणाऱ्या पावसासारखे आहे; जे राष्ट्रीय जीवनात सुसंस्काराचे व सकारात्मक विचारांचे बीजारोपण करते आहे.

समितीचे कार्य तेजस्वी राष्ट्राचे पुनर्निर्माण करण्याचे आहे. वंदनीय मावशी म्हणत, 'स्त्री ही संसार रथाची रथी नसून सारथी आहे आणि तिला आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून श्रीकृष्णासारखे सारथ्य करून कुटुंब परिवार समाज आणि राष्ट्र घडवायचे आहे.' समिती कार्याची विशिष्ट कार्यपद्धती आहे. दैनंदिन शाखेच्या नित्य उपासनेतून अतिशय सरळ सोपी आणि कार्य कुशल कार्यपद्धती आहे. मंत्र छोटा तंत्र सोपे अशा पद्धतीने सेविका ते कार्यकर्ता अशा संस्काराच्या जडणघडणीसाठी दैनंदिन शाखा, एकत्रीकरण, अभ्यास वर्ग, नैपुण्य वर्ग, संमेलने, शिबिरे बैठकी,चर्चा, प्रशिक्षण वर्ग, बौद्धिक वर्ग आदी कार्यपद्धतीतून प्रशिक्षित केले जाते. हे कार्य व्यक्तिनिष्ठ नसून तत्त्व-ध्येयनिष्ठ आहे. राष्ट्र देवो भव या संस्कारातून समिती कार्य करते. त्यासाठी परिचय, सक्रियता, दायित्व, कार्यकर्ता, सेविका अशा दृष्टी विचार विस्तार आणि विकासातून सेविका घडते; त्यासाठी संपर्क संग्रह संस्कार नियोजनाचे कार्य केले जाते. संपर्क हे समिती कार्यात रक्तवाहिन्याचे काम करते. समिती संपूर्ण विश्वाला आपला परिवार मानते. बौद्धिक विभाग, शारीरिक विभाग, व्यवस्था विभाग, सेवा विभाग, धार्मिक विभाग, तरुणी विभाग, घोष विभाग तसेच वर्षप्रतिपदा, गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, विजयादशमी, मकर संक्रांत; सोबतच वंदनीय मावशीचा जन्मदिन संकल्प दिन व स्मृती दिन सेवा दिन म्हणून साजरा करून त्याद्वारे समिती कार्याच्या विचारांचा परिचय समाजाला करून दिला जातो. राष्ट्रहिताचे कार्य करणारी समिती देशाच्या प्रगतीसोबतच येणाऱ्या आव्हानांमध्येसुद्धा संपूर्ण शक्तिनिशी देशाच्या पाठीशी समर्थपणे उभी राहत असते. विविध चळवळींसोबतच कोरोना काळातील सेवाकार्य अतुलनीय आहे.

प्रमुख संचालिका म्हणून वं. मावशींनंतर वं. ताई आपटे, वं. उषाताई चाटी, वं. प्रमिलताई व वर्तमान प्रमुख संचालिका वं. शांताक्का अशा पंच दीपांच्या प्रखर तेजस्वी निष्ठावान व श्रद्धावान मातृहृदयी नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली समिती कार्याची वाटचाल सुरू आहे. समितीच्या माध्यमातून आज संपूर्ण भारतामध्ये एकूण २३१० सेवाकार्य सुरू असून त्यात शिक्षा ४३३, स्वास्थ्य २१९, स्वावलंबन १७६, धार्मिक १११० आणि अन्य ३७२, याशिवाय २३ प्रतिष्ठाने कार्यरत आहेत. २३ छात्रावासात आदिवासी दुर्बल आत्महत्याग्रस्त शेतकरी, पूर्वांचलातील म्हणजे देशातील संवेदनशील भागातील मुलींच्या शिक्षणासहित सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कार्य सुरू आहे. विविध सेवाकार्याच्या माध्यमातून समिती तळागाळापर्यंत पोचली आहे. आज समिती क्षेत्र १२, प्रांत ३८ व १०४२ जिल्ह्यात कार्यरत असून संपूर्ण भारतात शाखा संख्या ५००० आहे. कुटुंबाचा, परिवाराचा आधारस्तंभ असलेली मातृशक्ती हीच समितीची प्रेरणादायी शक्ती आहे. समितीच्या ९० वर्षानिमित्त होणाऱ्या वाटचालीच्या कार्यक्रमात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून अखिल भारतीय स्तरावर जवळपास २००० सेविकांचे सामूहिक घोषवादन २७ डिसेंबर २०२६ रोजी गुजरात प्रांतात कर्णावती येथे संपन्न होणार आहे. हे वर्ष म्हणजे सेविकांची साधना, समर्पण व राष्ट्र कार्याच्या गौरवपूर्ण प्रवास कार्याची स्मरणगाथा आहे. त्यानिमित्ताने संपूर्ण भारतभर प्रांत संमेलनाच्या आयोजनाचे नियोजन करण्यात आले आहे. हिंदू धर्म संस्कृती मां भारती, हिंदू जीवन मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करीत विश्व कल्याणाची प्रार्थना करीत आवश्यक सप्तशतीने युक्त अशा मातृशक्तीचे संघटन असलेल्या राष्ट्रसेविका समितीच्या कार्यासाठी विश्व जननीला एवढीच प्रार्थना...

**नि:श्रेयस्य प्राप्त्यर्थ, अभ्युथनप्रदं शुभम् ।**
**देहि सामर्थ्यम् इशे नो, विश्वमांगल्यकारकय् ।।** ■

९५७९६०९९७५

## वाचक पत्रे

### पर्यटकांनी स्वयंशिस्त पाळावी

पावसाळा हंगाम म्हटले की सुटीचा दिवस गाठून पर्यटक सहकुटुंब आणि मित्र परिवाराबरोबर नजीकच्या निसर्गरम्य ठिकाणी पर्यटनास जातात. डोंगरातील धबधबे, घाट माथा, तलाव तसेच समुद्र किनारी परिसरात पर्यटक गर्दी करतात. हुल्लडबाजीत निसर्गाचा आनंद लुटताना जनाचे भान न ठेवता बीभत्स प्रकारे सामाजिक वातावरण दूषित करीत असतात. इगतपुरी येथील घडलेला प्रकार ताजाच आहे. पर्यटकांनी अति उत्साह टाळावा. स्वयंशिस्त पाळावी. वन विभाग, पर्यटन विभाग आणि पोलिसांनी समन्वय साधून जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीने उपाययोजना कराव्यात. पर्यटन ठिकाणी ऑनलाईन नोंदणी पद्धत सुरू करून नोंदणी केलेल्या पर्यटकांना प्रवेश देण्यात यावा. दुर्ग व पर्यावरण अभ्यासकाकडून जनजागृती करण्यात यावी. हवामान अंदाजाबाबत वेळोवेळी सूचित करण्यात यावे. धबधबा असणाऱ्या ठिकाणी अतिउत्साही पर्यटकांना प्रवेशास बंदी घालवी. सुटीच्या दिवशी पोलिस मनुष्यबळ वाढवून बंदोबस्त चोख ठेवण्यात यावा. धबधबा परिसरात गर्दी वाढू लागली वर मार्गावरील पर्यटकांना सूचित करून गर्दी आटोक्यात आणण्याचे प्रयत्न करावेत.

**नितीन कुंभार**/पिंपरी-पुणे

■■

### राजीनाम्याची दुर्दैवी मागणी

'नीट' परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणातील आंदोलनात काही विद्यार्थ्यांच्या खांद्यावर नरेटिव्ह विचारांची बंदूक ठेवून जे काही गलिच्छ राजकारण केले जात आहे कीव करावीशी वाटते. अशा याआधी झालेल्या पेपरफफुटीच्या घटनांतून किती शिक्षणमंत्र्यांनी राजीनामे दिले होते, याचे परीक्षण करण्याची विरोधकांची खरी वेळ आहे. २००४ ते २०१४ या काँग्रेस सरकारच्या काळात पेपरफुटीच्या जवळजवळ ७०-७२ घटना घडल्या होत्या. जेव्हा जे शिक्षणमंत्री होते यापैकी एकाही मंत्र्यांनी राजीनामा दिला नव्हता. मग आजच विरोधक अपेक्षा का करून राहिले. त्यांना केवळ मोदी, आरएसएस आणि भाजपाद्वेष या नशेतून याचा विसर पडलेला दिसतो आहे. एवढेच काय, २००४ ते २०१४ या काळात शरदचंद्र पवार कृषिमंत्री असताना साधारण १,७०,००० च्या वर शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. तेव्हा साहेबांनी राजीनामा दिला होता का? आज ते जंतर मंतरवर भेटी देत आहेत. उठसूट राजीनामा मागायचा नसतो आणि घ्यायचाही नसतो ही तर १२५ वर्षे जुन्या काँग्रेस सरकारची शिकवणूक विसरून कशी चालेल? यासाठीच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी दुर्दैवी आहे असे वाटते.

**अमोल करकरे**/खेड-रत्नागिरी, ९९६७९२७६१७

■■

### अशैक्षणिक जबाबदाऱ्यांचा डोंगर

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ नुकतेच सुरू झाले असून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याऐवजी शिक्षकांच्या मानगुटीवर अशैक्षणिक जबाबदाऱ्या टाकल्यामुळे शिक्षकांच्या शारीरिक व मानसिक स्थितीवर परिणाम होऊ लागला आहे. मुख्य निवडणूक आयोगाने ३ जुलै २०२६ रोजी शिक्षकांना इतर कोणत्याही अशैक्षणिक कामात गुंतवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले असून शिक्षण विभागाने सर्वेक्षणाची जबाबदारी शिक्षकांवरच सोपवली आहे. राज्यात सध्या शिक्षकांना मतदार यादी सुधारणा कार्यक्रम तसेच बुथ लेवल ऑफिसर ही कामे सोपविलेली असतानाच आता प्राथमिक शिक्षण संचालनालयाने १५ ते ३० जुलैदरम्यान शाळाबाह्य अनियमित आणि स्थलांतरित बालकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. या सर्व कामामुळे अशैक्षणिक कामे करायची की विद्यार्थ्यांना शिकवायचे अशा मानसिक तणावातून शिक्षक जात आहेत. शिक्षकांच्या शारीरिक आणि मानसिक परिस्थितीचा विचार करता शासनाने शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून दूर ठेवले पाहिजे. संस्थाचालक, ग्रामस्थ हे शिक्षकांकडून चांगल्या गुणवत्तेची व निकालाची नेहमीच अपेक्षा करतात. अशावेळी शिक्षकांना जर विद्यार्थ्यांपासून दूर ठेवून अशीच अशैक्षणिक कामांची जबाबदारी दिली जात असेल तर आपण शिक्षणात अग्रेसर असलेल्या केरळ राज्याकडून काहीच बोध घेतला नाही, हे सिद्ध होते. शिक्षकांनी ही कामे केले नाही तर अधिकारी वर्ग कारवाईची भाषा करत असतात. हे थांबणे आवश्यक आहे अन्यथा शिक्षण क्षेत्रातून उद्रेक झाल्याशिवाय राहणार नाही.

**शशिकांत जाधव**/पुणे

■■

### विचलित करणारे आंदोलन

देशात अराजकता पसरविणे हाच उद्देश समोर ठेवून वावरणारे विरोधक व त्यांचे तथाकथित तरुण नेतृत्व या मार्गाने देशाची सत्ता हस्तगत करू शकतील काय? निश्चितच नाही. मात्र, समाजकंटकांना मोकळे रान उपलब्ध करून देऊ शकतील. तरुण विद्यार्थ्यांना वापरून घेण्यात हे तरबेज आहेत. सरकार मात्र विद्यार्थ्यांचा रोष लक्षात घेऊन कारवाई करण्यास कमी पडले असे वाटते वा जी पाउले उचलली ती असंतोष कमी करण्यात पर्याप्त ठरली नाहीत असे दिसते. कारवाई पारदर्शक व समाज मनाला पटणारी असावी. नैतिक जबाबदारी कोणाची असेल तर ते दिसावयास नको काय? काही झाले तरी सरकारने सक्त राहून हुडदंग माजवणारे चिन्हित करून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. ■

**संजय वेलणकर**

# जंतर-मंतरवरील विद्यार्थी हल्ल्याच्या निषेधार्थ अकलूज, माळीनगर परिसरात कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज दि.२३ जुलै-**

दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर सुरु असलेल्या विद्यार्थी आंदोलन कर्त्यांवर पोलीसांनी केलेल्या अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ वंचित आघाडीने पुकारलेल्या सर्व पक्षीय बंदला प्रतिसाद देत अकलूजसह परीसरात अत्यावश्यक सेवा वगळता सर्व दैनदिन व्यवहार व्यापारी वर्गांनी बंद ठेवुन कडकडीत बंद पाळला. यावेळी अकलूज व माळीनगर परीसरातील सर्व संविधान समर्थकांनी अकलुजच्या प्रांत कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन दिले.



महाराष्ट्र बंदच्या आंदोलनास पाठींबा देत माळशिरस तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. अकलूजसह परीसरातील म ाळीनगर, यशवंतनगर, संग्रामनगर व परीसरातील सर्व दैनदिन व्यवहार बंद ठेवुन महाराष्ट्र बंद पाळण्यात आला. माळीनगर येथील लोकशाहीवादी समर्थकांनी रमामात कॉलनी ते अकलूज येथुन पायी मोर्चा काढला होता. हा मोर्चा अकलुज येथील डॉ. आंबेडकर चौकात पोहचल्यानंतर डॉ. आंबेडकर स्मारकास अभिवादन करुन अकलुज व परीसरातील सर्व नागरिक या मोर्चात सहभागी झाले. वंदे म ातरम, जय शिवाजी जयभीम, जय संविधान अशा घोषणा देत मोर्चा अण्णाभाऊ साठे स्म ारकापासून, सदभाऊ चौक मार्गे प्रांत कार्यालयावर धडकला. प्रांत कार्यालय येथे मोर्चाचे निषेध सभेत रुपात्तंर झाले. यावेळी दिल्लीच्या आंदोलनात सहभागी होवून परतलेल्या अकलुजच्या विद्यार्थीनी तनुजा साळुंखे व वैष्णवी खिलारे यांनी आंदोलनात झालेल्या पोलीस हल्ल्याचा थरारक अनुभव सांगितला.

आंदोलन कर्त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर केले. अव्वल कारकुन शशिकांत शिंदे यांनी सदरचे निवेदन स्विकारून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले.या मोर्चात माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील, विठ्ठलराव गायकवाड, वंचितचे अभिजीत गायकवाड,अभिमान जगताप,नंदकुमार केंगार,ॲड. सोमनाथ वाघमोडे,भानुदास सालगुडे,मुक्तार कोरबु,ॲड. सुमीत सावंत,स्वप्नील वाघम ारे, किरण धाईंजे,किरण साठे, धनाजी साखळकर,सुरेश गंभीर, प्रकाश काले नगरसेवक नाशिक सोनवने,विशाल मोरे,प्रतिभा गायकवाड,मनिषा तिकोटे, प्रियंका गायकवाड,भारतीय बौद्ध महासभेचे नागेश लोंढे,नंदेन तिकुटे गुरुजी आदी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ट्रॅक्शन संपत्तीची देखभाल**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी, सोलापूर विभागातील सहाय्यक ट्रान्सफॉर्मर (AT), सीएलएस पॅनेल, AT केबल, ट्रॅक्शन बॉंड, अर्थ पिट, नंबर प्लेट इत्यादी संपत्तीचे दुरुस्ती/बदली करून आणि रंगकाम करून पुनर्वसन करणे या कामासाठी नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट संकेतस्थळ www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत (पुन्हा मागवलेली निविदा). निविदा क्रमांक: SUR/TD/T/2026/08R. कामाचे नाव: सोलापूर विभागातील सहाय्यक ट्रान्सफॉर्मर (AT), सीएलएस पॅनेल, AT केबल, ट्रॅक्शन बॉंड, अर्थ पिट, नंबर प्लेट इत्यादी संपत्तीचे दुरुस्ती/बदली करून आणि रंगकाम करून पुनर्वसन करणे. अंदाजित खर्च: 1,18,21,729/-. निविदा सुरक्षा (बयाणा रक्कम): 2,36,400/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. प्रस्तावाची वैधता: 60 दिवस. संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 17.08.2026 रोजी 15.00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), सोलापूर**
EXP-34

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**आरयूबीचे बांधकाम**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत: (1) निविदा सूचना क्रमांक: 17-2026-एसआरडीईएनएस. कामाचे नाव: एडीईएन/केडब्ल्यूव्ही/बीजी अंतर्गत डीडी-केडब्ल्यूव्ही विभागातील बीआरबी-एमएलएम स्टेशन दरम्यान पुश पद्धतीद्वारे रेल्वे किमी 278/5-6 वर आरयूबीचे बांधकाम (बॉक्स आकार 6.0m x times5.50m). (ठेव अटी). कामाची अंदाजित किंमत: 64026433.54, बयाणा रक्कम: 1280500.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: 48 महिने. (2) निविदा सूचना क्रमांक: 18-2026-एसआरडीईएनएस. कामाचे नाव: मोहोळ-वाडी विभागात किमी 431/9-432/0, किमी 450/4-5, ओएचई मस्ट 465/12-14 आणि ओएचई मस्ट 592/16-18 येथे अतिरिक्त जलमार्गासाठी अतिरिक्त पुलाच्या तरतुदीसाठी टोपोग्राफिकल सर्वेक्षण, हायड्रोलॉजिकल आणि हायड्रोलिक अभ्यास. कामाची अंदाजित किंमत: 3422000.00, बयाणा रक्कम: 68400.00. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 03 महिने. देखभाल कालावधी: लागू नाही. www.ireps.gov.in या संकेतस्थळावर कोट केलेली निविदा अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ: 07.08.2026. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 07.08.2026 रोजी 17.30 वाजता. संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक नोंदवण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार संकेतस्थळाला भेट देण्याचा सल्ला दिला जातो. संकेतस्थळ: www.ireps.gov.in

EXP-33 डीआरएम (कामे), सोलापूर

तिकिटांसाठी RailOne ॲप डाउनलोड करा

# जंतर-मंतर प्रकरणी टेंभुर्णीत निषेध मोर्चा



## वंचित बहुजन आघाडीसह वडार परिवर्तन सेनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ जुलै-**

विद्यार्थी व आंदोलनकर्त्यांवर कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ गुरुवार (दि. २३) रोजी टेंभुर्णीत विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, व्यापारी, वकील, डॉक्टर आणि शेकडो युवकांच्या सहभागाने भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला.

टेंभुर्णीतील वंचित बहुजन आघाडीचे राहुल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातून रॅली काढण्यात आली. अत्यावश्यक सेवा वगळता व्यापाऱ्यांनी बंदला शंभर टक्के प्रतिसाद दिला. मोर्चाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत निषेध मोर्चा काढला. आंदोलनादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

कुर्डूवाडी चौक येथे सर्वपक्षीय पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांच्या उपस्थितीत सभा झाली. त्यानंतर वडार परिवर्तन सेनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार धोत्रे यांनी मंडल अधिकारी शेळवणे यांना निवेदन सादर करून लाठीहल्ल्याचा निषेध नोंदविला.

आंदोलनात माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पाटील चांदजकर, प्रमोद कुटे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मधुकर देशमुख, संभाजी ब्रिगेडचे सचिन जगताप, वंचित बहुजन आघाडीचे महेंद्र सोनवणे, डॉ. राहुल पाटील, विशाल नवगिरे, औदुंबर देशमुख, ॲड. तुकाराम राऊत, डॉ. ज्योती अनंतकवळस, म हेंद्र वाक्षे, क्रांती लोंढे, सुनील ओव्हाळ, वैभव कुटे, डॉ. पांडुरंग गायकवाड, भीमराव बंडगर, सुरेश लोंढे, कोंडार भागतील नेते गोविंद भाऊ पवार, नारायण गायकवाड, हरीभाऊ माने,बाबा चंदनकर, संतोष खैरमोडे,प्रशांत सोनवणे,गणेश केचे, सुनील ओहोळ ,विकास बंदपट्टे आदी सहभागी झाले होते.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज क्र. १७/२०२६
पुढील नेमलेली तारीख: २९/०८/२०२६
निशाण क्र. ६

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर साहेब, यांचे कोर्टात**

१) **श्रीमती सुवर्णा सूर्यकांत राऊत,**
वय - ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी,
रा. हांडे गल्ली, कसबा पेठ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर.
२) **चि. सुयश सूर्यकांत राऊत,**
वय - २१ वर्षे, व्यवसाय - नोकरी,
रा. हांडे गल्ली, कसबा पेठ, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर
— **अर्जदार**

विरुद्ध

**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील सूर्यकांत वसंत उर्फ वसंतराव राऊत हे दि. ११/०८/२०२४ रोजी बार्शी, ता. बार्शी येथे निधन झाले असून, अर्जदार क्र. १ व २ हे मयत कै. सूर्यकांत वसंत उर्फ वसंतराव राऊत यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. सूर्यकांत वसंत उर्फ वसंतराव राऊत हे मृत्युसमयी प्रयोगशाळा परिक्षक म्हणून श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे कायमस्वरूपी नोकरीस होते. त्यांचे मृत्युपश्चात शासनाकडून भविष्य निर्वाह निधी/भनिन याची रक्कम देय होती व आहे. सदर रक्कम मिळणे करीता अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसांच्या आत किंवा पुढील नेमलेल्या २९/०८/२०२६ या तारखेस न्यायालयात हजर राहून कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा, कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजून सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य तो निर्णय पारित करतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे. दि. २२/०७/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**वरिष्ठ स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**वरिष्ठ स्तर, बार्शी**

**जामश्री रिअलटी लिमिटेड**
सीआयइन : : L17111PN1907PLC000258
नोंदणीकृत कार्यालय : फतेहचंद दमाणी नगर, स्टेशन रोड, सोलापूर,महाराष्ट्र – ४१३०००१
दूरध्वनी +९१ २२ २२८७२४०१, वेबसाइट www.jamshri.in, ईमेल आयडी : jammill1907@gmail.com

**३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरण**

(रु. लाख)

| अ. क्र. | तपशील | संपलेली तिमाही 30.06.2026 (अलेखापरिक्षित) | 31.03.2026 (लेखापरिक्षित) | 30.06.2025 (अलेखापरिक्षित) | संपलेले वर्ष 31.03.2026 (लेखापरिक्षित) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | परिचलनातून एकूण उत्पन्न | 168.71 | 151.74 | 183.78 | 712.01 |
| 2 | कर आणि अपवादात्मक बाबीं पूर्वीच्या अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी नफा/ (तोटा) | 18.00 | (30.16) | 10.01 | (13.86) |
| 3 | कर आणि अपवादात्मक बाबीं पश्चात अखंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | 18.00 | (30.16) | 10.01 | (13.86) |
| 4 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | - | 10.24 | (1.01) | (4.76) |
| 5 | कर पश्चात खंडित परिचलना करीता कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) | - | 10.24 | (1.01) | (4.76) |
| 6 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (समावेश) नफा/ (तोटा) करपश्चात) कालावधीसाठी आणि इतर व्यापक उत्पन्न (करपश्चात) | 18.00 | (10.19) | 9.00 | (8.88) |
| 7 | समभाग भांडवल | 698.65 | 698.65 | 698.65 | 698.65 |
| 8 | प्रति समभाग प्राप्ती प्रत्येकी रू. 10/- | 10/- | 10/- | 10/- | 10/- |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत अखंडित परिचलन | 0.26 | (0.43) | 0.14 | (0.20) |
| | प्रति शेअर कमाई मूलभूत व सौम्यिकृत खंडित परिचलन | - | 0.15 | (0.01) | (0.07) |

टिप :
अ) उक्त अलेखापरिक्षित आर्थिक निष्कर्षाचा लेखापरिक्षित समितीने आढावा घेतला आहे. संचालक मंडळाने त्यांच्या जुलै 23, 2026 रोजी घेण्यात आलेल्या सभेत त्याला मंजुरी दिली आहे.
ब) उक्त निष्कर्ष कंपन्या (इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस्) नियम, 2015 सुधारित असल्याप्रमाणे आणि अधिनियमाच्या इतर संबंधित तरतूदींसह वाचावयाच्या कंपन्या आधिनियम 2013 च्या कलम 133 च्या अनुषंगाने कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने अधिसूचित केल्याप्रमाणे इंडियन अकाउंटिंग स्टॅंडर्डस् (आयएनडी ऐस) नुसार तयार करण्यात आलेले आहेत.
क) 30 जून 2026 रोजी संपलेल्या तिमाहीच्या कालावधी करिताचा वित्तीय निष्कर्षांचा बीएसईकडे दाखल केलेल्या सविस्तर प्रारुपाचा उक्त एक उतारा आहे. संपूर्ण प्रारुप बीएसईची वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीची वेबसाइट www.jamshri.in वर उपलब्ध आहे.

तारीख : 23.07.2026
ठिकाण : सोलापूर

जामश्री रिअलटी लिमिटेड करिता
सही
राजेश दामाणी
संयुक्त व्यवस्थापकीय संचालक

**भा.कृ.अनु.प.-राष्ट्रीय अनार अनुसंधान केंद्र, सोलापूर**
**ICAR - National Research Centre On Pomegrante**
(Indian Council Of Agricultural Research)
NH-65, Solapur-Pune Highway, Kegaon, Solapur-413 255(M.S.)
T-(0217) 2354330, 2350074, 2350263, F-(0217) 2353533
E-mail : nrcpomegranate@gmail.com, Website: nrcpomegranate.icar.gov.in
**(ISO 9001:2015 Certified Institute)**

**WALK-IN-INTERVIEWA**

Walk in interview will be held on **17/08/2026 11:00 AM** at ICAR-National Research Centre on Pomegranate, Kegaon, Solapur for engagement of worker under time bound project on contractual basis at a consolidated remuneration.

| Sl. No. | Name of the Project | Name of Post | Number of Posts |
|---|---|---|---|
| 1. | National Agriculture Innovation Fund Scheme (IPR) | Young Professional-II | 01 |

For more details of posts, application form, essential and desirable qualifications, Job requirements and the terms and conditions please visit our website: nrcpomegranate.in

**Sd/-**
**DIRECTOR**

**श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**
**श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड,सोलापूर-४१३००५ फोन नं. ०२१७-२३७४६७८**
**Email ID - ampmcsolapur@gmail.com / am_solapur@msamb.com**

**जा.न. प्रसिध्दीकरण/५२९** **दिनांक २३/०७/२०२६**

**जाहीर नोटीस**

**सभागृह भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे**

श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर यांचे मालकीचे सहकार महर्षी कै. वि.गु. शिवदारे आण्णा सभागृह काही अटीस अधिन राहून चालविणेस देणेचे आहे. ज्यांना सदरचे सभागृह चालविणेचे असेल त्यांनी आपले दरपत्रक दि. ०३/०८/२०२६ पर्यंत बाजार समितीच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत. सभागृह भाडेतत्वावर देणेबाबतचे नियम व अटी मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

दरपत्रक मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार बाजार समितीस राहील.

**सही/-**
**सभापती**
**बाजार समिती, सोलापूर**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११**
**(महाराष्ट्र शासन उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ८, सोलापूर यांचे कार्यालय सिंचन भवन, गुरुनानक चौक, क्लब कॅंटीन जवळ, सोलापूर**
**दूरध्वनी क्रमांक - ०२१७-२७३२८५३ ई-मेल - ucd8.solapur@gmail.com**

**दुबार ई निविदा सूचना क्रमांक ०१ सन २०२६-२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर,** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**कामाचे नाव :-** एकरुख उपसा सिंचन योजना जलद कालवा १ ते ९ कि.मी. मधील यांत्रिकी पद्धतीने अस्तरीकरणाचे काम.
**जिल्हा :-** सोलापूर
**निविदेची किंमत रुपये :-** २१३७.६६ लक्ष
**१. निविदा उपलब्ध कालावधी :-** दि. २४/०७/२०२६ ते दि. ०४/०८/२०२६
**२. निविदा उघडण्याचा दिनांक :-** दि. ०६/०८/२०२६ रोजी

**जा.क्र. उकावि-८/ निविदा/३२०३/२०२६ उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर दि. १६/०७/२०२६**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**उजनी कालवा विभाग क्र.८, सोलापूर**

**Office Of The Returning Officer, Saraswat Co-Operative Bank Ltd., Mumbai & Collector and District Magistrate, Mumbai City**
Email : collector.mumbaicity@maharashtra.gov.in Tel. No :- 022-22662440

**Ref. : Order dated 27/05/2026 received from Director-CEA,Government of India, Ministry of Co-Operation,The Co-Operative Election Authority**

In the exercise of the powers conferred by the Section 45 K(1) of the Multi State Co-operative Societies Act 2002 read with the Rule 19F(a) of the Multi State Co-operative Societies Rules 2002, as amended with MSCS Rules in 2023, an election is schedule where, **Collector & District Magistrate, Mumbai City is the Returning Officer,** who is appointed to conduct the election of the Board of Directors of **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai-400025**.

| | |
|---|---|
| Office of the Returning officer | Collector & District Magistrate, Mumbai City, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400 001. |
| Registered Office of the Society | Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan,953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai-400025. |

**ELECTION OF DIRECTORS FOR THE TERM 2026-2031 (Bye-law No.55)**

| Sr. No. | Category | No. of Directors |
|---|---|---|
| 1 | **General**<br>1) Candidates for fourteen seats from amongst the members of the Society residing in and or carrying on business and or engaged in gainful occupation within limits of State of Maharashtra.<br>2)Candidates for Two seats from amongst the members of the society residing in and or carrying on business and or engaged in gainful occupation outside the limits of State of Maharashtra but within the area of operation of the bank. | 14<br>02 |
| 2 | **Women**<br>Candidate for two reserved seats for women amongst the members of the society residing in any State or Union Territories in the Union of India, where the Bank has or may have its Branches. | 02 |
| 3 | **Schedule Caste/Schedule Tribes**<br>Candidate for one reserved seats for Scheduled Caste/Schedule Tribes from amongst the members of the society residing in any State or Union Territories in the Union of India, where the Bank has or may have its Branches. | 01 |
| | Total | 19 |

**ELECTION PROGRAMME**

| SR | STAGES | DAY/DATE | TIME | PLACE |
|---|---|---|---|---|
| 1 | Publication of provisional List of Members / Eligible to Votes on website and notice Board | 27/07/2026 (Monday) | 5.00 P.M. | Office of the Returning Officer, **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai- 400001)**, & Registered office of the Bank and all the branches. |
| 2 | Time Window for Raising ObjectionTo the Provisional List | 28/07/2026 To 31/07/2026 (Tuesday to Friday) | 11.00 A.M. To 03.00 P.M. | Office of the Returning Officer, **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001).** |
| 3 | Scrutiny of objection received to the Provisional List (if any) | 03/08/2026 To 07/08/2026 (Monday to Friday) | 11.00 A.M. To 03.00 P.M. | Office of the Returning Officer, **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001).** |
| 4 | Publication of Final List of Members / Delegates, eligible to vote on website & notice board of the society | 07/08/2026 (Friday) | 05.00 P.M | Office of the Returning Officer **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001).** & Registered office of the Bank and all the branches. |
| 5 | Issue and filing of Nomination Form | 17/08/2026 To 21/08/2026 (Monday to Friday) | 11.00 A.M. To 03.00 P.M. | **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi,Mumbai - 400025** |
| 6 | Display of nomination received by Returning Officer on website & notice board of the society. | 21/08/2026 (Friday) | 05.00 P.M. | Office of the Returning Officer **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** & Registered office of the Bank and all the branches. |
| 7 | Scrutiny of Received Nomination Forms | 24/08/2026 (Monday) | 11.00 A.M. onwards | Office of the Returning officer. **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** |
| 8 | Publication of List of Valid Nomination Forms | 24/08/2026 (Monday) | By 5.00 P.M | Office of the Returning officer. **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** & Registered office of the Bank and all the branches. |
| 9 | Withdrawal of Nominations | 25/08/2026 (Tuesday) | 11.00 A.M To 03.00 P.M | **Saraswat Co-operative Bank Ltd., Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, ,Mumbai - 400025** |
| 10 | Publication of Final list of Contesting candidates | 25/08/2026 (Tuesday) | 05.00 P.M | Office of the Returning officer. **(Add :- Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort,Mumbai-400001)** & Registered office of the Bank and all the branches |
| 11 | Date of Polling if Necessary | 08/09/2026 (Tuesday) | 08.00 A.M.To 04.00 P.M (and all those who entered polling station at 04.00 p.m or before should be allowed to cast vote). | Place will be declared later. |
| 12 | Counting of Votes | 11/09/2026 (Friday) | From 08.00 a.m Onwards | Place will be declared later. |
| 13 | Submission of Form 19 M with reommendation for Seeking approval of CEA before declaration of BOD | 11/09/2026 (Friday) | -- | -- |
| 14 | Declaration of Results of Board of Directors | On or before 18/09/2026 | -- | -- |

**Election Programme of Office Bearers (After Declaration of Result of Board Members Election)**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Announcement of Election Schedule | 21/09/2026 (Monday) | **Bank's Registered Office at Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi,Mumbai 400025** |
| | (I) Time window for filing Nomination | 09.30 am to 11.30 am | |
| | (II) Scrutiny of nomination papers | 12.30 pm to 02.00 pm | |
| | (III) Time and date for Withdrawal | 02.00 pm to 04.00 pm | |
| | (IV) Display of list of contesting candidate | 05.00 pm | |
| 2 | Meeting of Newly Constituted Board & Publication of List for valid Nominations, Polling (if required) | 22/09/2026 (Tuesday) 11.00 a.m. Onwards | Office of the Returning Officer, **(Add :-Collector & District Magistrate, Mumbai City 3rd Floor, Old Custom House, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001)**. |
| 3 | Declaration of Result of Election of | On or before 28/09/2026 at 11.00 am. | Office of the Returning Officer(As above). |

**NOTES :-**

1. A copy of Voters list will be supplied by the society to any Regular member on payment of such fee as may be specified by the Board of Directors of the society.
2. The Nomination Forms duly completed as prescribed therein shall be presented in person by the candidate or through any person authorized by him/her, at the registered office of the bank, **Ekanath Thakur Bhavan, 953, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai-400025**, so as to reach him not later than 03.00 p.m. on 21/08/2026. Nomination forms received thereafter shall not be accepted.
3. As per Bye Laws No.55A, Candidates contesting for directorship shall hold fifty fully paid shares on the last date of nomination and should have been a member for a minimum period of twelve months immediately preceding the date of such election or appointment. The contesting candidate should have an operative savings/current/term deposit account of Rs. 50,000/- in the Bank for a minimum period of twelve months continuously prior to the date of nomination and shall continue till he/she remains a Director of the Board. A member who is indebted to the Society as a borrower, except by way of advance against his deposits with the Bank, shall not be eligible for election on the Board.
4. As per bye laws No.55B of the bank "A candidate who wishes to contest the election to the Board of Directors of the Bank is required to deposit Rs.25000/- as security deposit at the time of filing the nomination.Provided that if a candidate withdraws his nomination or if his nomination is rejected, the deposit will be refunded within 15 days of his withdrawal/rejection. The deposit shall be forfeited, if at an election where a poll has been taken,the candidate is not elected and the number of valid votes polled by him does not exceed one-tenth of the total number of valid votes polled by all the candidates or, in the case of election of more than one member at the election one-tenth of the number of valid votes so polled divided by the number of members to be Selected. In other cases Security Deposit will be returned."
5. A Regular member who gets disqualified under any of the provisions specified in Section 43 and 44 of the Multi State Co-operative Societies Act, 2002 and/ or Byelaw No.55A of the Society, shall not be eligible for being nominated for a seat on the Board.
6. After the close of the poll, the ballot boxes used for poll shall be sealed at respective polling centers and the same shall be brought to place of counting.
7. Any changes mentioned above will be conveyed by publishing the same on Society's website and/or by publishing in the newspapers.
8. A Company, Partnership firm or any other Body Corporate constituted under any law, which is a shareholder of the Bank, may appoint any of its Directors/ Partners/ Officers to vote on its behalf. There resolution / letter of such appointment must be produced by the authorized person intending to vote on behalf of such company / any other body Corporate/ firm alongwith Polling Notice and identification of the person.
9. The candidate filing Nomination form under the category of reserve seats for Scheduled Caste & Scheduled Tribe should attach copy of caste certificate duly attested by self, with his/her nomination form.
10. Withdrawal of Nomination (if any), shall be made by a notice in writing and submit in person by the Candidate or by person authorised on his/her behalf as per election programme. A notice of withdrawal of nomination once given shall be irrevocable.
11. Place of polling stations (If election contested) will be declared later. Voters are advised to bring any one of their own original Photo Identity Card issued by Government Authorities like Passport, Driving License, Voter card issued by the Election Commission, Aadhaar Card & PAN Card during voting to prove their identity if called upon by the Officer on Election Duty.

**Place : Mumbai**
**Date : 23 / 07/2026**

SEAL

**(Aanchal Goyal)**
**Returning Officer &**
**Collector & District Magistrate,**
**Mumbai City.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### महिला दुहेरी प्रकारात भारताचा माल्टावर विजय

**ग्लासगो :** राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील आपल्या मोहिमेची विजयी सुरुवात करताना, भारताने 'बोल्स' महिला दुहेरी प्रकारात माल्टाचा पराभव केला. गुरुवारी झालेल्या या सामन्यात, 'बोल्स' महिला दुहेरी प्रकारात भारताने माल्टावर रोमांचक 'टाय-ब्रेकर'मध्ये विजय मिळवून स्पर्धेची विजयी सुरुवात केली. रूपा राणी तिर्की (लीड) आणि पिंकी (स्किप) या भारतीय जोडीने पहिला सेट ७-१ असा जिंकला, परंतु दुसरा सेट ३-४ असा गमावला; त्यामुळे 'सेक्शन बी'मधील पहिल्या फेरीचा हा सामना 'टाय-ब्रेकर'पर्यंत गेला. भारतीय खेळाडूंनी संयम राखत 'टाय-ब्रेकर'मध्ये विजय मिळवला आणि पिंकीने आपल्या शेवटच्या 'बोल'द्वारे (चेंडूद्वारे) विजयावर शिक्कामोर्तब केले.



### महिला व्हीलचेअर बास्केटबॉल संघाचे पदकाचे लक्ष्य

**ग्लासगो :** येथे गुरुवारपासून सुरू होणाऱ्या ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील ३x३ व्हीलचेअर बास्केटबॉल प्रकारात भाग घेणाऱ्या भारतीय संघातील चार खेळाडूंमध्ये महाराष्ट्राची मीनाक्षी जाधव आणि मणिपूरची रितू चानू यांचा समावेश आहे. संघातील इतर दोन सदस्य महाराष्ट्राची रीना गुप्ता आणि कर्नाटकची लक्ष्मी रयन्नवर आहेत. या संघाचे देशासाठी पदक जिंकणे, हेच लक्ष्य आहे. बर्मिंगहॅम येथील २०२२ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पहिल्यांदाच समाविष्ट करण्यात आलेल्या ३x३ व्हीलचेअर बास्केटबॉल प्रकारात, एका वेळी मैदानात तीन खेळाडू खेळतात. १० मिनिटांच्या या सामन्यादरम्यान एका खेळाडूला 'सबस्टिट्यूट' (पर्यायी खेळाडू) म्हणून वापरले जाते. थायलंडमधील बँकॉक येथे झालेल्या २०२५ च्या 'आयडब्ल्यूबीएफ' (आंतरराष्ट्रीय व्हीलचेअर बास्केटबॉल फेडरेशन) आशिया-ओशनिया चॅम्पियनशिप द्वारे भारतीय संघाने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. मी महाराष्ट्रातील एका गावातील एक सामान्य मुलगी होते. पण २०१२ मध्ये, वयाच्या २३ व्या वर्षी, मी झाडावरून पडले आणि माझ्या पाठीच्या कण्याला दुखापत झाली, असे संघाची कर्णधार मीनाक्षीने सांगितले.

# भारताचा झिम्बाब्वेवर विजय

## वैभव सूर्यवंशी सर्वात तरुण अर्धशतकवीर, भारताची पराभवाची मालिका खंडित

**हरारे, २३ जुलै**

वैभव सूर्यवंशीचे विक्रमी अर्धशतक आणि मयंक यादव व प्रिन्स यादवच्या प्रभावी गोलंदाजीच्या बळावर भारताने झिम्बाब्वेरुद्धच्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात झिम्बाब्वेवर ४० चेंडू शिल्लक ठेवित ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. सूर्यवंशी, मयंकमुळे भारताची पराभवाची मालिका खंडित झाली. या विजयाबरोबरच भारताने झिम्बाब्वेविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत १-० अशी आघाडी मिळविली. १८ धावांत २ बळी टिपणारा मयंक यादव सामनावीर ठरला तसेच वैभव सूर्यवंशी सर्वात तरुण अर्धशतकवीर ठरला.भारताने टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद यशस्वीपणे राखल्यानंतर श्रेयस अय्यरने सूर्यकुमार यादवकडून कर्णधारपदाची धुरा स्वीकारली. मात्र, त्याच्या नेतृत्वाखालील सुरुवातीच्या काळातच संघाला आयर्लंडविरुद्ध २-० अशा मालिका पराभवाला आणि त्यानंतर इंग्लंडमध्ये ४-० अशा दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. सूर्यवंशी आणि मयांक यांच्यामुळे भारताची टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील पराभवाची मालिका खंडित झाली. मार्चमध्ये टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारताने आपला पहिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामना जिंकला.



वैभव सूर्यवंशीचे पहिले अर्धशतक



सामनावीर मयंक यादव

झिम्बाब्वेविरुद्धच्या या टी-२० मालिकेच्या यशस्वी सुरुवातीदरम्यान, भारताचा युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी याने अवघ्या १८ चेंडूंत आपले पहिले आंतरराष्ट्रीय अर्धशतक झळकावले. या कामगिरीबरोबरच सूर्यवंशी सर्वात तरुण अर्धशतकवीर ठरला.

२०२६ च्या १९-वर्षांखालील विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ८० चेंडूंत १७५ धावांची खेळी करणाऱ्या सूर्यवंशीने पुन्हा एकदा त्याच मैदानावर चमकदार कामगिरी करत, विजयासाठी आवश्यक असलेल्या माफक धावसंख्येचा पाठलाग सहजपणे पूर्ण केला.

श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला.भारताच्या अननुभवी गोलंदाजी आक्रमणासमोर झिम्बाब्वेला ७ बाद १२५ धावाच करता आल्या. मयंक यादव व प्रिन्स यादवने झिम्बाब्वेच्या फलंदाजीच्या अव्वल फळीला सुरुवातीलाच कोलमडून टाकले; त्यानंतर मधल्या आणि खालच्या फळीतील फलंदाजांनी काही प्रमाणात योगदान दिले.

मयंक व प्रिन्सने आपल्या प्रत्येकी चार षटकांच्या कोट्यात मिळून केवळ ३७ धावा दिल्या आणि प्रत्येकी २ बळी टिपलेत. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी प्रति षटक आठ किंवा त्यापेक्षा कमी धावा देण्याचा शिस्तबद्ध मारा केला.

लक्ष्याचा पाठलाग करताना तिसऱ्याच षटकांत सलामीवीर अभिषेक शर्मा एक धाव काढून बाद झाला, परंतु त्यानंतर वैभव सूर्यवंशी व ईशान किशनने दुसऱ्या गड्यासाठी ४५ धावांची भागीदारी करून डाव सावरला. रिचर्ड न्गारावाच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी वैभव सूर्यवंशीने अवघ्या १९ चेंडूंत प्रत्येकी ४ चौकार व षट्कारांसह ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. आपले पहिले टी-२० अर्धशतक झळकावताच त्याने टी-२० अर्धशतक झळकावणारा सर्वात तरूण क्रिकेटपटू ठरला. ईशान किशनने २४ चेंडूंत ३५ धावांचे योगदान दिले. श्रेयस अय्यर (नाबाद २८) व तिलक वर्माने (नाबाद ६) नाबाद खेळी करत भारताला १३.२ षटकांत ३ बाद १२६ धावा काढून विजय मिळवून दिला.

### अशोक शर्माचे टी-२० मध्ये पदार्पण

भारताकडून अशोक शर्माने पदार्पण केले. झिम्बाब्वेने फलंदाज बेन करन आणि डावखुरा वेगवान गोलंदाज न्यूमन न्यामहूरीला पदार्पणाची संधी दिली.अशोक शर्मा हा राजस्थानचा आहेत. जयपूरजवळील एका गावात जन्मलेल्या या २४ वर्षीय वेगवान गोलंदाजाने गुजरातला जाण्यापूर्वी देशांतर्गत स्पर्धांमध्ये राजस्थान क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व केले होते. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय युवा संघाने कसोटी मालिका जिंकली

## दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेवर २११ धावांनी विजय




कसोटी मालिकेच्या विजेतेपदाच्या चषकासह भारताचे युवा क्रिकेटपटू

**कोलंबो, २३ जुलै**

रोहित यादवने घेतलेल्या चार बळींच्या जोरावर भारताने श्रीलंकेच्या तळाच्या फळीतील फलंदाजांचा प्रतिकार मोडून काढला आणि आर. प्रेमदासा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या दुसऱ्या 'युवा कसोटी' (कनिष्ठ गटातील कसोटी) क्रिकेट सामन्यात २११ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयासह भारतीय युवा संघाने दोन सामन्यांची कसोटी मालिका १-० अशी जिंकली. पहिला कसोटी सामना अनिर्णीत राहिला होता.

सामन्याच्या चौथ्या आणि अंतिम दिवशी भारताला विजयासाठी सहा बळींची आवश्यकता होती. सकाळच्या सत्रात यश मिळविण्यासाठी भारताला १८ षटकांची वाट पाहावी लागली, कारण विमथ दिनसारा व कविजाने पाचव्या गड्यासाठी चिवट भागीदारी करत २६.३ षटकांत ४० धावा जोडल्या. अखेरीस लेग-स्पिनर यादवने ही भागीदारी तोडली आणि श्रीलंकेचा कर्णधार दिनसाराला (१२९ चेंडूंत ६४ धावा) बाद केले.

उर्वरित पाच बळी मिळविण्यासाठी भारताला फारसा संघर्ष करावा लागला नाही; हे बळी पुढील २३.१ षटकांच्या कालावधीत पडले. यादवने यापैकी तीन बळी घेतले, यात गमागेचा (१५२ चेंडूंत ३६ धावा) समावेश होता; गमागेची ही खेळी श्रीलंकेच्या डावातील सर्वात दीर्घकाळ चाललेली खेळी ठरली.

सामना संपत आला असताना सेठमिका सेनेविरात्नेने आक्रमक फटकेबाजी केली; त्याने सहा चौकार आणि एक षट्कार हाणला आणि अखेरीस ४९ चेंडूंत ४२ धावा करून बाद होणारा तो शेवटचा फलंदाज ठरला. ◂ (वृत्तसंस्था)

# महिला मुष्टियोद्धे पदके जिंकणार

### मोहम्मद अली कमर यांना विश्वास

**नवी दिल्ली, २३ जुलै**

ग्लासगो राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी देशाने आतापर्यंतचा सर्वोत्तम महिला संघ पाठविला आहे व त्यातील सातही खेळाडू पदक जिंकून परतण्यास सक्षम आहेत, असा विश्वास भारताचे दिग्गज बॉक्सर आणि माजी प्रशिक्षक मोहम्मद अली कमर यांनी व्यक्त केला.

खूप काही गोष्टी महिला खेळाडूंना मिळणाऱ्या सामन्यांच्या वेळापत्रकावर अवलंबून असतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

भारताने १४ सदस्यांचा संघ निवडला असून यात सात पुरुष आणि सात महिलांचा समावेश आहे. राष्ट्रकुल स्पर्धेतील मुष्टियुद्ध स्पर्धा शुक्रवारी सुरू होणार आहे.

ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धा



राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मुष्टियुद्धामध्ये भारताने नेहमीच पदके जिंकली आहेत. यावेळीही जे खेळाडू सहभागी होत आहेत, ते अत्यंत अनुभवी आहेत. त्यांनी अनेक स्पर्धांमध्ये पदके जिंकली आहेत. त्यामुळे राष्ट्रकुल स्पर्धेत भारताची कामगिरी चांगली होईल, असा विश्वास अली यांनी व्यक्त केला. अली हे टोकियो ऑलिम्पिकसह जवळपास सहा वर्षे महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक होते.

२००२ च्या मँन्चेस्टर क्रीडा स्पर्धेत 'लाइट फ्लायवेट' गटात विजेता होऊन राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारे कमर हे पहिले भारतीय मुष्टियोद्धा होते. त्यानंतर नाकाला झालेल्या दुखापतीमुळे त्यांची कारकीर्द अकाली संपली; प्रशिक्षक होण्यापूर्वी त्यांनी राष्ट्रीय निवड समितीचे सदस्य म्हणूनही काम केले होते. ते आता महिलांच्या प्रशिक्षक पथकाचा भाग नाहीत.

टोकियो ऑलिम्पिकसाठी मी ज्या अनेक बॉक्सरना तयार केले होते, त्यातील जैस्मिन लंबोरिया (५७ किलो) व लवलिना बोरगोहेन (७५ किलो) यांसारख्या खेळाडू या राष्ट्रकुल स्पर्धेत जात आहेत. आम्ही अरुंधती चौधरी (७० किलो) हिची सराव जोडीदार म्हणून निवड केली होती. प्रिया (६० किलो) ही युवा गटातून वरिष्ठ गटात आली आहे, पण आता ती चांगली कामगिरी करत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# वोझिन्हाला मिळाले कष्टाचे फळ

## फिफा विश्वचषकाच्या ड्रीम टीममध्ये स्थान

**झुरिच, २३ जुलै**

केप वर्देचा गोलरक्षक वोझिन्हाला फिफा विश्वचषतकात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीचे फळ मिळाले आहे. वोझिन्हा आणि नॉर्वेचा आक्रमक खेळाडू अर्लिंग हालंड यांची चाहत्यांनी मतदान केलेल्या फिफा विश्वचषक ड्रीम टीममध्ये निवड झाली असून, दोघांनाही त्यांच्या संघांच्या अनपेक्षित विजयाच्या मालिकेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुरस्कृत करण्यात आले आहे. या दोघांसोबत किलियन एमबाप्पे, लिओनेल मेस्सी आणि ज्यूड बेलिंगहॅम यांसारखे स्टार खेळाडू संघात आहेत.

विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या केप वर्दे संघासाठी एकापाठोपाठ एक प्रभावी कामगिरी केल्यानंतर, वोझिन्हा ३९.६ टक्के मतांसह गोलरक्षकांच्या यादीत अव्वल ठरला. फिफाच्या तांत्रिक गटाद्वारे निवडला जाणारा गोल्डन ग्लोव्ह स्पेनच्या उनाई सायमनने जिंकला असूनही हे घडले.



केप वर्देचा गोलरक्षक व्होझिन्हा

स्पर्धेपूर्वी पोर्तुगीज सेकंड-टियर संघ चावेस सोडल्यानंतर क्लबविना असलेल्या या ४० वर्षीय खेळाडूने, केप वर्देने अंतिम विजेते स्पेनला गोलशून्य बरोबरीत रोखताना सात बचाव केले.

त्याने अंतिम फेरीत पोहोचलेल्या अर्जेंटिनाला शेवटच्या ३२ संघांच्या फेरीत अतिरिक्त वेळेपर्यंत पोहोचण्यासही मदत केली. नॉर्वेला त्यांच्या पहिल्या विश्वचषक उपांत्यपूर्व फेरीत पोहोचवल्यानंतर हॉलंडने २७.५ टक्के फॉरवर्ड मते मिळविली.

मँन्चेस्टर सिटीच्या या आक्रमक खेळाडूने पाच सामन्यांमध्ये सात गोल केले, यात नॉर्वेने अंतिम १६ संघांच्या फेरीत पाच वेळच्या विजेत्या ब्राझीलला २-१ ने हरवताना केलेल्या दोन गोलांचा समावेश आहे, पण इंग्लंडविरुद्ध त्यांचा प्रवास तिथेच संपला.

**फिफा विश्वचषक २०२६ ड्रीम इलेव्हन :** गोलरक्षक : वोझिन्हा (केप वर्दे). बचावपटू : पेड्रो पोरो (स्पेन), लिसँड्रो मार्टिनेझ (अर्जेंटिना), दायोत उपमेकानो (फ्रान्स), मार्क कुकुरेला (स्पेन). मधली फळी : रॉड्री (स्पेन), मायकल ओलिसे (फ्रान्स), ज्यूड बेलिंगहॅम (इंग्लंड). आक्रमक फळी : लिओनेल मेस्सी (अर्जेंटिना), एर्लिंग हॉलंड (नॉर्वे), किलियन एमबाप्पे (फ्रान्स).

◂ (वृत्तसंस्था)




# ज्ञानासोबत खेळाचीही गरज आहे

## जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे

**सोलापूर, दि. २३ जुलै -**

दयानंद शिक्षण संस्थेत हँडबॉल दिनाचा कार्यक्रम थाटात पार पडला. श्री प्रकाश मोहारे सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते तसेच श्री नदीम शेख क्रीडा अधिकारी,सोलापूर यांच्या हस्ते हँडबॉल दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानिक प्रशासक डॉ.विजयकुमार उबाळे प्राचार्य डॉ. बी.एच.दमजी, प्राचार्य डॉ. एस.बी क्षीरसागर, प्राचार्य शिंदे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, पर्यवेक्षका सुनिता गवळी, डॉ.किरण चोकाकर, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख प्रमोद कुनगुलवार यांनी करून दिले तर सूत्रसंचालन नवनाथ हराळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी दयानंद हँडबॉल परिवारातील सर्व खेळाडूंनी परिश्रम घेतले.

# सोलापूरच्या यश बोरामणी व समर्थ दोरनाल यांची महाराष्ट्र संभाव्य क्रिकेट संघात निवड

**सोलापूर, दि. २३ जुलै -**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या वयोगटानुसार संभाव्य महाराष्ट्र संघात सोलापूरच्या यश बोरामणी व समर्थ दोरनाल यांनी आपल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर स्थान मिळवले आहे. यश याची २३ वर्षांखालील संभाव्य संघात, तर समर्थची १९ वर्षाखालील संभाव्य संघात निवड झाली आहे.





यश याने यापूर्वी -१४ व -१६ मध्ये महाराष्ट्र संघाचे नेतृत्व केले आहे. २०२२ मधील -१९ कूच बिहार व विनू मांकड ट्रफीमध्ये त्याने २ शतके आणि २१ विकेट्स घेतल्या होत्या. अलीकडील ओपन इनव्हिटेशन टूर्नामेंटमध्ये ४८७ धावा (२ शतके, २ अर्धशतके) आणि १२ विकेट्स अशी कामगिरी केली असून, सध्या तो सोलापूर वरिष्ठ संघाचे नेतृत्व करत आहे.

दुसऱ्या बाजूला, समर्थने विविध वयोगटातील स्पर्धांमध्ये अष्टपैलू खेळ करत आपले स्थान निश्चित केले आहे. २०२५-२६ च्या १९ वर्षाखालील आमंत्रितांच्या स्पर्धेत त्याने ८ डावांत २६० धावा आणि २८ बळी टिपले. तसेच २०२४-२५ च्या खुल्या वर्गातील स्पर्धेत १०९ धावा व ७ बळी, तर २०२३ च्या १६ वर्षाखालील स्पर्धेत २०९ धावा व २१ बळी अशी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

या दोन्ही खेळाडूंचे सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन रणजितसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष दिलीप माने, संयुक्त सचिव खासदार धैर्यशील मोहिते पाटील व चंद्रकांत रेम्बर्सो यांनी अभिनंदन केले.



# सिंधूचा चेन युफेईकडून पराभव

**चांगझू, २३ जुलैः**

चीनच्या चेन युफेईने गुरुवारी शानदार पुनरागमन करीत भारताच्या पी. व्ही. सिंधूचा १६-२१, २२-२०, २१-१८ असा पराभव केला आणि चायना ओपन २०२६ बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

दुसऱ्या गेममध्ये सिंधूकडे चार 'मॅच पॉइंट्स' होते, परंतु चेनने जोरदार मुसंडी मारत साम ना निर्णायक गेमपर्यंत नेला. अंतिम गेममध्ये सुरुवातीला भारतीय खेळाडूचे वर्चस्व होते, मात्र शेवटी चेनने वेगवान खेळ करीत सामना आपल्या नावे केला. २०२० ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या चेनचा उपांत्यपूर्व फेरीत रचानोक इंतानोन व गुयेन थुय लिन्ह यांच्यातील विजेत्याशी सामना होईल.

भारताचा युवा खेळाडू आयुष शेट्टीचे आव्हानही 'अंतिम सोळा'मध्येच संपुष्टात आले; त्याने पहिला गेम जिंकून आघाडी घेतली होती, तरीही त्याला आयर्लंडच्या न्हात गुयेनकडून २१-१५, १३-२१, २०-२२ असा पराभव स्वीकारावा लागला. दुसरा गेम गमावल्यानंतर जागतिक क्रमवारीतील २८ व्या स्थानावर असलेल्या शेट्टीने निर्णायक गेममध्ये १९-१५ अशी आघाडी घेऊन सावरल्याचे संकेत दिले होते, परंतु त्या स्थितीतून त्याला प्रतिस्पर्ध्यावर विजय मिळविता आला नाही.

त्यानंतर लक्ष्य सेनचा कॅनडाच्या व्हिक्टर लाईकडून १९-२१, ११-२१ असा पराभव झाल्याने या स्पर्धेतील भारताचे आव्हान पूर्णपणे संपुष्टात आले. तत्पूर्वी, चौथ्या मानांकित चेनने सुरुवातीच्या गेममध्ये १२-६ अशी आघाडी घेत सामन्यावर वर्चस्व गाजवले होते. मात्र, सिंधूने सामन्यात पुनरागमन करत १६-१६ अशी बरोबरी साधली आणि त्यानंतर उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत पहिला गेम २१-१६ असा जिंकला. भारतीय खेळाडूने सामन्यावरील आपले नियंत्रण कायम ठेवले होते आणि दुसऱ्या गेममध्ये २०-१७ अशा स्थितीत चार 'मॅच पॉइंट्स' मिळवून सामना जिंकण्याची संधीही निर्माण केली होती.

# डॉ.कराड यांचे लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य

## हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांचे विचार

### श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. २३ जुलै-**

लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले आहे. त्यांनी शक्तिची पूजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, त्यांच्यामुळे वाखरी फुलली आहे. ''असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी व्यक्त केले.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या ''श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या आशीर्वादाने व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, नजरुद्दीन नायकवडी आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर, ह भ प तुळशीराम दा कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड, डॉ. हनुमंत तुळशीराम कराड, राष्ट्रीय कुस्तीगीर महेश वरूटे, सुरजीत सिंग, श्रीकांत देशमुख, सामाजिक कार्यकर्ता सालगुडे पाटील, कदम पाटील, सरकार निंबाळकर, कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, भीमराव आदलिंग, शिवाजीराव काळे, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारकरी संप्रदाय परंपरा ७५० वर्ष जुनी आहे. या परंपरेचे पाईक विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांनी समाज घडविण्यासाठी विश्वशांती केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून सर्व संतांची शिकवण पुढे चालू ठेवली आहे. यातून आत्मचिंतनाची दिशा दाखवली आहे. वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. याच कार्याचा भाग म्हणजे ही कुस्ती स्पर्धा आहे.

श्रीकांत देशमुख म्हणाले, संस्कृती आणि परंपरा टिकवणारी ही प्रथा पुढे चालवत डॉ. विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनात कुस्तीचे आयोजन केले. वारकरी हा काटक आहे. डॉ. कराड यांच्या कार्यासमोर सर्व पुरस्कार नगण्य असून त्यांचे कार्य अतुलनीय आहे.

प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक व कुस्ती स्पर्धाचे नियोजन केले.बाबा निम्हण यांनी धावते समालोचन केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘उजनी’त ३२,९५० क्युसेकने आवक; उपयुक्त पाणीसाठा ५६.९४ टक्क्यांवर



## सिंचनासाठी कालव्यातून २ हजार क्युसेक विसर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ जुलै -**

भीमा तसेच कृष्णा नदीच्या खोऱ्यातील पर्जन्य क्षेत्रात संततधार पाऊस सुरु आहे. गेल्या दोन दिवसांपासून उजनी धरणात पाण्याच्या आवकेत लक्षणीय वाढ झाली आहे. गुरुवारी संध्याकाळी ६ वाजता उजनीत ३२,९५० क्युसेक वेगाने पाणी येत असून धरणातील उपयुक्त पाणीसाठा ५६.९४ टक्क्यांवर पोचला आहे.

गुरुवार (२३ जुलै) रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंतच्या धरण प्रशासनाच्या अहवालानुसार, उजनी धरणातील उपयुक्त पाणीसाठा ८६३.९६ दशलक्ष घनमीटर (३०.५१ टीएमसी) इतका झाला आहे. तो धरणाच्या उपयुक्त क्षमतेच्या ५६.९४ टक्के आहे. धरणातील एकूण पाणीसाठा २६६६.७७ दशलक्ष घनमीटर (९४.१७ टीएमसी) इतका नोंदवला आहे. धरणाची जलपातळी ४९४.७०० मीटर असून, जलपृष्ठ विस्तार २७८.९९ चौरस किलोमीटर इतका झाला आहे.

दौंड येथील नदी मापन केंद्रावर नदीची पातळी ५००.१७० मीटर इतकी असून, तेथून उजनी धरणात ३२,९५० क्युसेक वेगाने पाणी दाखल होत आहे. कालच्या तुलनेत धरणातील आवकेत मोठी वाढ झाल्याने पुढील काही दिवस पाणीसाठ्यात आणखी वाढ होणार आहे.

धरणातून सध्या मुख्य कालव्यातून २,००० क्युसेक पाणी खरीप हंगामातील सिंचनासाठी सोडण्यात येत आहे. त्याचबरोबर वीजनिर्मिती केंद्रातून १,६०० क्युसेक, भिमा-सीना बोगद्यातून ९०० क्युसेक, सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी २८० क्युसेक आणि दहीगाव उपसा सिंचन योजनेसाठी ९० क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. विशेष म्हणजे सांडव्यातून तसेच नदी स्लुईसमधून कोणताही विसर्ग सुरू नसल्याने धरणातील अतिरिक्त पाणी नदीपात्रात सोडले जात नाही. जुलै महिन्यात भीमा खोऱ्यात सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे उजनी धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे खरीप हंगामातील पिकांसाठी आवश्यक सिंचन, पिण्याच्या पाण्याचा साठा आणि औद्योगिक वापरासाठीची उपलब्धता अधिक बळकट होत आहे. मुख्य कालव्यातून सुरू असलेल्या पाण्यामुळे सोलापूर, पुणे आणि उजनीच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. ऊस, सोयाबीन, मका, भाजीपाला व इतर खरीप पिकांना त्याचा लाभ होणार आहे.

दरम्यान, भीमा नदीच्या वरच्या भागात पावसाचा जोर कायम राहिल्यास उजनी धरणातील आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे. परिस्थितीनुसार धरण प्रशासनाकडून पाणीविसर्गाचे नियोजन केले जाणार असल्याची माहिती प्रशासनाकडून दिली आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तारण गोदामात चोरी

## ४० हजारांहून अधिक किमतीच्या शेतमालाची चोरी; एकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.२३ जुलै -**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारातील शेतमाल तारण योजना गोदामात अज्ञात चोरट्याने खिडकीची जाळी व काच फोडून शेतमालाची चोरी केली. घटनेत ४० हजार ७२५ रुपयांची तूर व ज्वारी चोरीला गेल्याची तक्रार बार्शी शहर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

श्रीशल्य घाणेगावकर (वय ५५, रा. कासारवाडी रोड, बार्शी) यांनी फिर्याद दिली आहे. ते गेल्या २५ वर्षांपासून कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी येथे पर्यवेक्षक म्हणून कार्यरत आहेत. २० जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता त्यांनी सहकाऱ्यांसह मुख्य बाजार आवारातील गट क्रमांक १९५ मधील शेतमाल तारण योजना गोदाम बंद केले होते. त्यावेळी गोदामातील सर्व शेतमाल सुरक्षित व व्यवस्थित होता. दि. २२ जुलै रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास गोदाम उघडून पाहणी केली असता, गोदामातील पाच कट्टे पांढरी तूर आणि तीन कट्टे ज्वारी, असे एकूण आठ कट्टे शेतमाल गायब झाल्यसचे दिसले. गोदामाच्या एका खिडकीची जाळी व काच फोडल्याचे आढळून आल्याने चोरी झाल्याचे स्पष्ट झाले.

चोरीस गेलेल्या मालामध्ये ३० हजार किमतीची पाच कट्टे पांढरी तूर आणि १० हजार ७२५ किमतीचे तीन कट्टे ज्वारी, असा एकूण ४० हजार ७२५ रुपयांचा शेतमाल आहे.

# माझ्याकडे का बघतोस? म्हणत तरुणाला बेदम मारहाण; ८ जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै -**

मित्रासह दुचाकीवरून घराकडे निघालेल्या एका तरुणाला तू माझ्याकडे का बघतोस? अशी कुरापत काढून लोखंडी पाईप, लाथाबुक्यांनी आणि दगडाने जीवघेणा हल्ला करण्यात आला. ही घटना सोरेगाव येथील व्ही.व्ही.पी कॉलेजसमोर १८ जुलै रोजी दुपारी घडली. दरम्यान याप्रकरणी आठ जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

संदेश हरिदास जमादार (रा. ४२, स्वामी विवेकानंद नगर, सैफुल, सोलापूर) यांनी फिर्यादी दिली आहे. ऋषी जाधव (रा. मुळेगाव तांडा, सोलापूर), यश वाकसे व इतर ६ साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. संदेश जमादार हे १८ जुलै रोजी दुपारी सव्वा एक वाजण्याच्या सुमारास सोरेगाव येथील व्ही.व्ही.पी. कॉलेजमधील पेपर संपवून मित्र सुरज हजारी याच्यासह दुचाकीवरून जात होते. कॉलेजच्या गेटसमोर आले असता, ऋषी जाधवने त्यांची दुचाकी अडवली. ‘तू माझ्याकडे का बघतोस?‘ असे म्हणत फिर्यादीची गच्ची पकडली आणि त्यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण, शिवीगाळ केली. तसेच जीवे मरण्याची धमकी देत यश वाकसे व इतर ६ जणांनी मिळून फिर्यादीला मारहाण सुरू केली. या हल्ल्यादरम्यान जमावातील एकाने फिर्यादीच्या दिशेने दगड फेकून मारला, तर दुसऱ्याने लोखंडी पाईपने फिर्यादीच्या डाव्या बरगडीवर जोरात प्रहार केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास फौजदार काजळे करत आहेत.

## महत्वाचे...

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकीला अपघात; युवक जखमी

**सोलापूर,दि. २३ जुलै-**

दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत असताना अचानक कुत्रा आडवा आल्याने खाली कोसळून मुलगा जखमी झाला. हा अपघात अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगरात आज गुरुवारी दुपारच्या सुमारास घडला. फिरोज नदाफ (वय १६ रा. मल्लिकार्जुन नगर) असे जखमी मुलाचे नाव आहे. तो दुचाकीच्या पाठीमागे बसून प्रवास करीत होता. त्याला उपचारासाठी वडिलांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

---

### शेतातून लाईट घेतल्याची विचारणा केल्याने मारहाण

**सोलापूर,दि. २३ जुलै-**

तू आमच्या शेतातून लाईट का घेतली? अशी विचारणा केल्याने दगड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत भीमराव शेळके (वय ५५) हे जखमी झाले. ही घटना हराळवाडी (ता.मोहोळ) येथे आज गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्यांना प्रकाश ढगे आणि गिरीधर ढगे या दोघांनी मारहाण केली. त्यांना कामती येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात राहुल (मुलगा) याने दाखल केले.

---

### थांबलेल्या ट्रकला पाठीमागून दुचाकीची धडक; दोघे जखमी

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडकल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. हा अपघात अक्कलकोट मार्गावरील वळसंग टोलनाक्याजवळ बुधवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास घडला. अकबर अमीन पटेल (वय २४) आणि साहिल शेख (वय २५ दोघे रा.जेऊर, ता. अक्कलकोट) अशी जखमींची नावे आहेत. रात्री आठ वाजेच्या सुमारास ते दोघे दुचाकीवरून सोलापूर ते अक्कलकोटकडे निघाले होते. टोल नाक्याजवळ थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडकल्याने दोघेही जखमी झाले. त्यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात ॲम्ब्युलन्समधून दाखल करण्यात आले.

---

### बोरामणी शिवारातील गटारीत अनोळखी इसमाचा कुजलेला मृतदेह

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

एका अनोळखी इसमाचा कुजलेला मृतदेह बोरामणी शिवारातील एका गटारीमध्ये बुधवारी सकाळी सात वाजता मिळून आला. विजय दास यांच्या शेतासमोरील बांधाजवळ गटारीतील चिलारीच्या आडोशाला एक अनोळखी पुरुष जातीचा मृतदेह बुधवारी सकाळी स्थानिक लोकांना आढळून आला. मृतदेहाला मुंग्या लागल्या होत्या. ही खबर गावच्या पोलीस पाटील यांना समजली. त्यानंतर त्यांनी सोलापूर तालुका पोलिसांना ही खबर दिली. त्याप्रमाणे पोलीस हवालदार एम. आर. कटकधोंड यांनी घटनास्थळी पोहोचून शेतगड्याच्या मदतीने मृतदेह एका रुग्णवाहिकेतून शव विच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी साडेदहा वाजता दाखल केला. मयत इसम हा सडपातळ, ४५ ते ५० वयोगटातील असून त्याने निळा रंगाचा टी-शर्ट आणि निळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट परिधान केलेली आहे. तरी मयत इसमाबाबत माहिती असणाऱ्यांनी पोलीस निरीक्षक कुंदन गावडे (मो .नं . ८८८८८०१७७७ ) यांच्याशी संपर्क साधण्यास सांगितले आहे.

## निधन वृत्त...

### शोभा देवकते



**सोलापूर, दि. २३ जुलै-**

कल्याण नगर येथील शोभा दिगंबर देवकते (वय ६७) यांचे शुक्रवारी अल्पशा आजाराने निधन झाले. सांयकाळी त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, २ मुले, १ मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे. राष्ट्रीय खो-खो खेळाडू प्रभाकर देवकते यांच्या त्या मातोश्री होत.

# परवाना संपूनही औषधांची बेकायदा विक्री

## कंदलगावात एफडीएकडून १ लाखांचा औषध साठा जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. २३ जुलै-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथील एका मेडिकल स्टोअरवर अन्न व औषध प्रशासनाकडून छापा टाकण्यात आला. छाप्यात परवान्याविना औषधांची खरेदी करून त्याची साठवणूक करत विक्री केल्याचे तपासणीत उघड झाले आहे.

छाप्यादरम्यान दोन प्रकारच्या औषधांचे नमुनेही तपासणीसाठी जप्त केले आहेत. एफडीए विभागाला प्राप्त झालेल्या माहितीनुसार जय लक्ष्मी मेडिकल अँड जनरल स्टोअर्स या औषध विक्री केंद्रातून १ लाख १३ हजार ८०० रुपयांचा ॲलोपॅथिक औषधसाठा जप्त करण्यात आला. तपासणी दरम्यान संबंधित औषध विक्री केंद्राच्या औषध विक्रीच्या परवान्याची मुदत १९ मार्च २०२५ रोजी संपुष्टात आल्यानंतर संबंधितांकडून त्याचे नूतनीकरण केली नसल्याची बाब उघड झाली. संबंधित व्यावसायिकाकडून परवान्याविना ॲलोपॅथिक औषधांची खरेदी करून त्याची साठवणूक व विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले. सदर बाब औषध व सौंदर्यप्रसाधने कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन मानून एफडीएने संपूर्ण औषधसाठा जप्त केला.

कारवाई दरम्यान पुढील तपासासाठी दोन औषधांचे नमुने घेण्यात आले आहेत. त्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली जाणार आहे. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. एफआयआर दाखल करण्याबाबतची कार्यवाहीही सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही कारवाई सहाय्यक आयुक्त (औषधे) अरुण गोडसे यांनी केली. कारवाईला पुणेचे संयुक्त आयुक्त (औषधे) गिरीश हुकारे यांचे मार्गदर्शन लाभले.

# पंचशील नगरात तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

अज्ञात कारणावरून तरुणाने घरातील लाकडी वाशाला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुमठा नाका परिसरात पंचशील नगरात गुरुवारी सकाळी ११ वाजता उघडकीस आली. शिवकुमार ठोंबरे (वय २३, रा.५०५/बी पंचशील नगर, कुमठा नाका, सोलापूर ) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. आज गुरुवारी सकाळी शिवकुमार याने घरातील देव घरामध्ये गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले . नातेवाईकांच्या साह्याने शिवकुमार यास गळफास सोडवून खाली उतरविले . दरम्यान हि खबर समजताच सदर बझार पोलिस ठाण्याच्या महिला पोलीस हवालदार एस एस चव्हाण यांनी घटनास्थळी पोहोचून शिवकुमार यास येथील शासकीय रुग्णालयात दुपारी साडेबारा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# धम्मयात्रेचे अकलूजमध्ये स्वागत



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ जुलै-**

परम पूजनीय भंते ज्ञानज्योती महास्थवीर व भिक्खू संघ यांच्या (ताडोबा अभयारण्य चंद्रपूर) यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक क्रांती अभियाना अंतर्गत भिमा कोरेगांव ते पंढरपूर पदयात्रेचे अकलूजमध्ये स्वागत करण्यात आले.यावेळी अकलुजच्या सारनाथ बुध्द विहारात दिर्डी मुक्काम राहील्यानंतर भंत्ते ज्ञानज्योती यांचे प्रवचन झाले.

आषाढी एकादशी निमित्त सर्व संताच्या पालख्या पंढरपूरकडे वाटचाल करीत आहे.याच दरम्यान सामाजिक क्रांतीचे अभियान हाती घेतलेले भंते जी भदंत ज्ञानज्योती महास्थवीर यांच्या नेतृत्वाखाली १२ जुलैला भीमाकोरेगाव हुन पायी निघालेली धम्मयात्रेचे अकलूज शहरात आगमन झाले. यावेळी गांधी चौक येथे नगराध्यक्षा रेश्मा अडगळे, नगरसेविका मनिषा तिकोटे, प्रियंका गायकवाड यांच्यासह सारनाथ बुध्द विहाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. तदनंतर पदयात्रा अकलूज शहरातुन सारनाथ बुध्द विहारात पोहचल्यानंतर बुध्द वंदना होवून भंत्ते ज्ञानज्योती यांचे प्रवचन झाले. यावेळी बोलताना भंत्ते ज्ञानज्योती म्हणाले पंढरपूरचा पांडुरंग हा बुध्द आहे तर विठ्ठल मंदिर हे प्राचिन बुध्द विहार आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठाम पणे सांगितले होते.ते सिध्द करण्यासाठी कामाच्या व्याप्तीमुळे बाबासाहेब आंबेडकरांना वेळ भेटला नाही, परंतु बाबासाहेंबाचं अपुर्ण काम पुर्ण करण्याचा प्रयत्न या पदयात्रेतून करत आहे.ही लढाई मंदिर मागण्यासाठी नाही तर प्राचिन इतिहास सिद्ध करण्यासाठी आहे, आम्ही सिद्ध करायला चाललो आहे असे ते म्हणाले. यावेळी पदयात्रेतील सर्व भंत्ते यांना बौध्द उपासकांनी फळे व मिठाई दान केली. सोमवारी धम्मयात्रेचा सारनाथ विहारात मुक्काम झाला व त्यानंतर खंडाळी वेळापूर येथे विसावा घेत पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.

# आषाढीनिमित्त पंढरपुरात एअर ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांच्या आरोग्य सुरक्षिततेला प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाच्या वतीने पंढरपूर येथे अत्याधुनिक एअर ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ही सेवा जेटसर्व्ह एव्हिएशन, एअर रेस्क्यूअर्स ॲम्बुलन्स आणि विश्वराज एव्हिएशन महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यान्वित करण्यात आली असून, आपत्कालीन परिस्थितीत गंभीर रुग्णांना तातडीने उच्चस्तरीय वैद्यकीय उपचारासाठी स्थलांतरित करण्याची सुविधा या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आली आहे.




एअर ॲम्बुलन्स हेलिकॉप्टर पंढरपूर येथे दाखल होताच वैमानिक, वैद्यकीय पथक आणि ऑपरेशनल टीमचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.


यावेळी डॉ. भगवान पवार, डॉ. अमोल भोर, डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. राखी माने , विवेक कुमार पांडे, डॉ. संजय मिश्रा, विश्वराज चाकोते उपस्थित होते.

# सिन्नुर गावाजवळ ट्रकला अपघात; चालक ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ जुलै-**

धावत्या ट्रकला अपघात झाल्याने एका ट्रक चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सायंकाळी सात वाजता अक्कलकोट-अफजलपूर मार्गावर सिन्नुर गावाजवळ घडली.

रवी सुधाकर गवळी ( वय ३८, रा. अहिल्यानगर,मुळेगाव सोलापूर) असे मयत ट्रकचालकाचे नाव आहे. तो बुधवारी सायंकाळी सात वाजता अफजलपुरकडून अक्कलकोट कडे एका ट्रकमधून येत होता. तेव्हा वाटेत सिन्नुर गावाजवळ ट्रकला अपघात झाला. यात गंभीर जखमी होऊन तो जागेवरच मयत झाला. दरम्यान नातेवाईक अनिकेत यांनी रवी गवळी यास येथील शासकीय रुग्णालयात मध्यरात्री दाखल केले. तेव्हा डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मयत रवी हा मित्राबरोबर फिरायला जातो असे सांगून घरात सांगून गेला होता. त्याच्या पक्षात आई, वडील, पत्नी व तीन मुली असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.




# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त ७३८ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा बार्शी शहर व तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ७३८ बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले. बार्शी येथील भगवंत रक्तपेढीच्या माध्यमातून हे रक्त संकलन करण्यात आले.

आमदार राजाभाऊ राऊत व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ॲड.रणवीर राजेंद्र राऊत यांनी स्वतः या शिबिरात रक्तदान केले. आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, एका बाटली रक्ताने तीन जीव वाचू शकतात. आज ७३८ बाटल्या रक्त संकलन झाले म्हणजे आपण किमान २००० पेक्षा जास्त गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. रक्तदान हीच खरी समाजसेवा आहे.

भगवंत रक्तपेढीच्या सहकार्याने हे शक्य झाले. यापुढेही असे उपक्रम आम्ही राबवत राहू, असेही आमदार राजेंद्र राऊत म्हणाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पार्टी व भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा बार्शी शहर व तालुका पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच भगवंत रक्तपेढी बार्शी, सिव्हील हॉस्पिटल रक्तपेढी सोलापूर, रामभाई शहा रक्तपेढी बार्शी, हेडगेवार रक्तपेढी सोलापूर येथील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बहुजनांचं, बहुआयामी नेतृत्व : दीपक दादा घोडके



अणदूर परिसरातील १८ पगड जातीना बरोबर घेऊन त्यांच्या जीवनात नवी पहाट निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारे, भारतीय जनता पक्षाचे अणदूर शहर अध्यक्ष तथा धाराशिव जिल्हा ओबीसी सेल चे उपाध्यक्ष दीपक दादा घोडके यांचा आज वाढदिवस त्या निमित्त त्यांच्या जीवन कार्याचा थोडक्यात आढावा, आई वडील दोघेही शिक्षक त्या मुळे दादांवर खूप चांगले संस्कार त्यांनी केले, आपल्याजवळ जे काही आहे त्यातील काही भाग आपण समाज कार्यासाठी देऊ शकतो त्या शिवाय समाजातील गरिबी हटणार नाही, या उदात्त हेतूने त्यांचे सामाजिक कार्य चालू असते, दीपक दादा मित्र मंडळ च्या माध्यमातून त्यांनी व त्यांच्या मित्रांनी अनेक सामाजिक उपक्रम अणदूर मध्ये राबविले आहेत, धार्मिक कार्यात त्यांचा सतत सहभाग असतो श्रावण मास,धोंडेदान, पंढरपूर वारकरी सेवा असे अनेक धार्मिक कार्यक्रम त्यांनी घेतले आहेत, अन्नदान हा दादांचा आवडीचा विषय वर्षभरात वेगवेगळ्या कारणाने त्यांच्या घरी अन्नदान चालूच असते, भारतीय जनता पक्षाचे ते अत्यंत निष्ठावान कार्यकर्ते आहेत, आमदार राणा दादा यांचे ते कट्टर कार्यकर्ते असून,पक्ष जो काही आदेश देईल त्या आदेशाचे पालन ते करणारच, नुकतीच त्यांची धाराशिव जिल्हा भाजपा ओबीसी मोर्चाच्या उपाध्यक्ष पदी पक्षाने निवड केली आहे.देव,धर्म,गुरु यांची सातत्याने सेवा करणे हा त्यांचा स्वभावगुण, कोणालाही मदतीचा हात देणे, पीडित, वंचित अडलेल्या माणसाला दादांनी कायम मदत केली, त्यांचे आपल्या धनगर समाजाविषयी विशेष प्रेम मेंढपाळांचे अनेक किचकट प्रश्न त्यांनी सोडवले आहेत, दादांचा मित्रपरिवार ही खूप मोठा त्यात गरिबापासून श्रीमंतापर्यंत सगळ्यांचा वावर त्यांच्या घरी असतो, त्याच बरोबर प्रसंग कितीही अवघड असला तरी त्याची उकल दादांकडे हमखास होते हे जनतेला चांगले माहित असल्याने अडले,नडले यांचा कायम दादांकडे गोतावळा असतो, गाव पातळीवरील निवडणुकीत दादांना खूप मोठे स्थान असून,भांडण,तंटे मिटविणे, समाजाचे अनेक प्रश्न त्यांनी लीलया सोडवले आहेत, राजासारख मन मनासारखा राजा अशा या अणदूर रत्न असलेल्या चालत फिरतं न्यायालय असलेल्या नेतृत्वाचा वाढदिवस त्यांच्या हातून असेच सामाजिक कार्य घडो आई तुळजाभवानी,ग्रामदैवत श्री खंडोबा चरणी प्रार्थना आमच्या दीपक दादांना उदंड आयुष्य लाभो हीच भावना या प्रसंगी.

**-बालाजी कुलकर्णी, अणदूर**

# घरंदाज लावणी, जात्यावरच्या ओव्या, भक्तीच्या रसाळ आविष्काराने अक्कलकोटकर भारावून गेले

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ जुलै-**

फोक आख्यान हा सध्याच्या तरुण कलाकारांचा एक लोकप्रिय संच आहे, तो सध्या मराठी लोकसंगीताचा वारसा नवीन पिढीपर्यंत पोहोचवत आहे. यामध्ये पारंपरिक वाद्ये, शाहिरी बाणा आणि लोककलेचा मेळ घालून अतिशय ऊर्जे ने कथा सादर केल्या जातात. या चमूने आपल्या ठसकेबाज आवाजाने आणि सादरीकरणाने संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला आहे. जुन्या लोककलांना त्यांनी आधुनिक काळाशी जोडून एक नवा 'थाट' दिला आहे. आख्यानांमध्ये संत, अवतारी पुरुष आणि देवदेवता यांची चरित्रे, पौराणिक कथांचा समावेश असतो. लोककलेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील इतिहास, शूरवीरांच्या गाथा, महाराष्ट्राच्या मातीतील भावना लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम आख्यान करत आहे. या घरंदाज लावणी, जात्यावरच्या ओव्या आणि भक्तीचा रसाळ आविष्काराने अक्कलकोटकर भारावून गेले होते.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा म होत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनम ेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे. गुरुवारी सायंकाळी 'फोक आख्यान' या कार्यक्रमाने पाचवे पुष्प संपन्न झाले. प्रारंभी सोलापूर महापालिकेचे महापौर विनायक कोंड्याल, धनश्री विनायक कोंड्याल, आयुक्त सचिन ओंबासे, अस्मिता सचिन ओंबासे, प.पू. धनंजय पुजारी, शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे, चंद्रशेखर रेड्डी, ओंकार पवार, नगरसेविका संगीता जाधव, मुकुंद पंडित, नीलकंठ बँकेचे अध्यक्ष धनराज नोगजा, बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर मानस झा, गिरीष कणेकर, योगेश अहंकारी, राजेंद्र लिंबीतोटे, सरपंच नितीन चव्हाण, निहार आडकर, समीर लोंढे, इम्तीजात कमिशनर, राहुल भंडारी, दामोदर देवसानी, डॉ. विनायक बुदले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

'फोक आख्यान' ही महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशात रुजलेली एक प्रभावी लोकसंगीत आणि कथाकथनाची परंपरा आहे. यामध्ये संगीत, कथन आणि नाट्यमय अभिव्यक्ती यांचा मिलाफ साधून शौर्य, भक्ती आणि ऐतिहासिक कथांचे राकट पण तल्लीन करणारे सादरीकरण संपन्न झाले. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, संजय कुलकर्णी, सोमकांत कुलकर्णी, विश्वंभर पुजारी मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले. सतीश पवार, राजू पवार, पानमंगरूळ, मोहित आंटद, अक्कलकोट, प्रेम नोगजा, सोलापूर यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, सरोजनी मोरे, स्वाती निकम, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, अक्षता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल क्षीरसागर, तृप्ती बाबर, सुवर्णा घाडगे, छाया पवार, रुपा पवार न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, संतोष भोसले, मनोज निकम, शरणप्पा पुजारी, अरविंद शिंदे, प्रवीण देशमुख, प्रा.शरणप्पा आचलेर, अतिश पवार, निखील पाटील, शिवराज स्वामी, रोहित खोबरे, प्रवीण घाडगे, गोटू माने, सौरभ मोरे, ज्ञानेश्वर भोसले, सर्फराज शेख, कांत झिपरे, सिद्धेश्वर मोरे, बाबुराव कुलकर्णी, सायबण्णा जाधव, रोहित मोरे, बालाजी पाटील, संतोष फुलारी, श्रीशैल कुंभार, ओंकार पवार, किरण साठे, संकेत पवार, वैभव मोरे, ॲड. फहीम पिरजादे, विवेक जाधव, नितीन कोबन, स्वामीनाथ बाबर, योगेश पवार, राजाराम पवार, अभिषेख चव्हाण, निखील शिंदे, अमित कोळी, लक्ष्मण शिंदे, मुन्ना कोल्हे, दरेप्पा जकापुरे, शुभम सावंत, भूषण मोहरे, विनायक भोसले, गोविंदराव शिंदे, बाळासाहेब घाटगे, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, संतोष माने, असद फुलारी, रमेश हळसंगी, बसवराज क्यार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, समर्थ चव्हाण, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडून शुभेच्छा

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३९ वा वर्धापन दिन आणि श्री गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे समजून आनंद झाला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व त्यांच्या संलग्न संस्थांमार्फत सुरू असलेले समाजसेवेचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. गरीब, गरजू, भाविक आणि यात्रेकरूंना भोजन देण्याचे कार्य हे केवळ उदरभरण नव्हे, तर मानवसेवेचा आदर्श आहे. या कार्यामागील निःस्वार्थ सेवा, श्रद्धा, शिस्त आणि प्रभावी व्यवस्थापन यांमुळे ''स्वामी अन्नछत्र मंडळ'' हे राज्यातील सेवाभावी संस्थांसाठी आदर्शवत ठरले आहे. अन्नदानासोबतच शिक्षण, आरोग्य, स्वच्छता आणि अध्यात्म या क्षेत्रांमधील मंडळाचे योगदान समाजाच्या सर्वांगीण विकासाला मोठा हातभार लावणारे आहे. समाजसेवेच्या मार्गावर निष्ठेने आणि सातत्याने कार्य करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त, तसेच मंडळाच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

### धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडाक्षेत्रास महत्व

दि.२६ जुलै रोजी रविवार पहाटे ५.३० ते ९.३० वा पर्यंत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (ट्रस्ट), व चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यम ाने आयोजित ''आरोग्य ते अध्यात्म'' हा प्रेरणादायी संदेश देणारी ही ''भक्ती रन'' स्पर्धा रविवार दि. २६ जुलै २०२६ रोजी अक्कलकोटच्या पावन भूमीत आयोजित करण्यात आली असून, शारीरिक तंदुरुस्ती, अध्यात्मिक उन्नती आणि भक्तीमय वातावरणाचा सुंदर संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळणार आहे. 'अक्कलकोट १० भक्ती रन' या आगळ्यावेगळ्या मॅरेथॉन स्पर्धेच्या ऑनलाईन रजिस्ट्रेशन लिंकचे उद्घाटन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आले होते.

**आज कीर्तनसेवा** - शुक्रवार दि. २४ जुलै रोजी सायंकाळी ७.१५ ते रात्रौ ९.३० पर्यंत 'किर्तन' राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचा कार्यक्रम होणार आहे.

### नियोजित महाप्रसाद गृहाच्या इमारतीचे सादरीकरण

नियोजित महाप्रसाद गृहाची इमारत, भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल. या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी बसून सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सध्या गेल्या नोव्हेंबर-२०२४ पासून सदरचे काम प्रगतीपथावर आहे, येत्या २ वर्षात हे महाप्रसादगृह भक्तांच्या सेवेत असणार आहे. या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले.

### सादरकर्ते याप्रमाणे

दवंडी पुत्र - अभिजीत लोंढे, शुभम साळवी, सौरभ कापसे निर्मिती व्यवस्थापक : अमोल टापरे आणि शैलेश थोरात अधिकृत छायाचित्रकार : जयदीप इनामदार, दिवटा:- तेजस देवधर, साऊंड :- आदित्य करंबेळकर चित्रीकरण व प्रसारण व्यवस्थापक : सचिन पाटील कपडे पटः- तुकाराम कमठेवार रंग भूषाकार :-विशाल निघोल झिलकरि :- दीपक उकिरडे आणि विनायक उकिरडे (थेरवडि), रोहित डाके (मुंबई) सागर खवले, (जामखेड), लोक वाजंत्री मंडळ:- पृथ्वीराज देशमुख (आळंदी), अभिषेक नायबळ (आळंदी), ऋतुराज रास्ते (अकलूज), गौरव बत्तीसे (मालेगाव), नयन गतिर (नाशिक, इगतपुरी), विश्वजीत लोंढे (पिंपरी), अर्णव कोटकर,(सांगवी), मानस साखरपेकर (चिपळूण), कुंदन ठाकूर (मालेगाव),राजेंद्र साळुंके (चारकोप बोरिवली), लोक वाघ्या मुरळी मंडळ : ऋषीकेश रिकामे (नाशिक इंचुरगवळी), अनुजा देवरे (नाशिक), चंद्रकांत माने (शिरुर), ऋचा कुलकर्णी (अंबेजोगाई), आख्यान मुकादम :- रणजीत गुगळे (जामखेड) बांधणी, रचना आणि लमाण बंधु, ईश्वर अंधारे (जाम खेड), मूळ संकल्पना आणि संगीत कारभारी हर्ष विजय व सहकारी. प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.

## महत्वाचे...



### २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या कायमबाबत लवकरच विशेष बोर्ड

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेतील २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव २० जुलै रोजी झालेल्या महापालिका सभागृहाच्या बैठकीत न आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची भेट घेऊन चर्चा केली. याबाबत लवकरच विशेष सभा घेण्यात येईल असे आश्वासन पदाधिकाऱ्यांनी दिले आहे, अशी माहिती युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी दिली. यावेळी सभागृह नेते व उपमहापौर यांनी आयुक्त आणि उपायुक्त यादव यांच्याशी चर्चा केली असता, संबंधित प्रस्ताव सभागृह सुरू असताना उशिरा सादर झाल्यामुळे तो त्या दिवसाच्या कामकाजात समाविष्ट होऊ शकला नसल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी लवकरच या विषयावर विशेष बोर्ड बोलावून प्रस्ताव मंजूर करण्यात येईल आणि त्यानंतर तो शासनाकडे पाठविण्यात येईल, असे आश्वासन महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे आणि उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी ट्रेड युनियनचे अध्यक्ष तथा कामगार नेते बापूसाहेब सदाफुले आणि पदाधिकाऱ्यांना दिले.याप्रसंगी ट्रेड युनियनचे मार्गदर्शक इकबाल तडकल, अरुण मेत्रे, धनाजी लोंढे, सुनील शिंदे, बिभीषण गायकवाड यांच्यासह बदली रोजंदारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चक्कर येऊन पडल्याने तरुणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

अचानक चक्कर येऊन रस्त्यावर पडल्याने एका ३७ वर्षीय तरुणाचा जागेवर मृत्यू झाल्याची घटना कन्ना चौक येथे घडली. गौरव प्रवीण शहा (रा.कन्ना चौक, सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. बुधवारी रात्री कन्ना चौक येथील बाकळे दुकानाजवळ थांबला असताना चक्कर आल्याने पडून तो बेशुध्द झाला होता. याबाबतची खबर स्वप्निल जानगवळी यांनी जेलरोड पोलिसांना दिली. हवालदार एस.यु.माने यांनी घटनास्थळी दाखल होत गौरव शहा यास शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### तणनाशक पिलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ जुलै-**

तणनाशक औषध पिलेल्या आगरखेड गावच्या व्यक्तीचा उपचारादरम्यान सोलापुरातील शासकीय रुग्णालयात गुरुवारी दुपारी दोन वाजता मृत्यू झाला. निंगप्पा सिध्दप्पा सावळे (वय-४२, रा.देवीगोठा, ता.अक्कलकोट मुळ रा.अगरखेड जि.विजापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. अज्ञात कारणावरुन त्यांनी बुधवारी सायंकाळी राहत्या घरी तणनाशक औषध पिले होते. याचा त्रास होऊ लागल्याने मुलगा नागेश सावळे यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला.

## अतिसाराची लागण झालेल्या 'त्या' इमारतीत महापालिकेचे नव्हे तर खासगी बोअरचे पाणी

### उपचारादरम्यान महिलेचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

आसरा चौक परिसरातील एसबी प्लाझा या इमारतीत अतिसाराने एका महिलेचा बळी घेतला आहे. दूषित पाणीपुरवठ्यामुळे मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे. महापालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, त्या इमारतीत महापालिकेचे पाणी नाही तर खाजगी बोअरचे पाणी वापरले जाते, असे स्पष्टीकरण महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिले.

आफरीन मुजफ्फर शेख (वय-४९) असे मृत महिलेचे नाव असून त्यांच्यावर शहरातील यशोधरा रुग्णालयात उपचार सुरु होते. मागील तीन दिवसांपासून त्यांना दूषित पाणी पिल्यामुळे उलट्या व जुलाबाचा तीव्र त्रास होत होता, असा आरोप रहिवाशांनी केला. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. एसबी प्लाझा इमारतीतील दूषित पाणीप्रकरणा मुळे एकूण ४० रहिवाशांना विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. काही रुग्णांची प्रकृती सुधारली असली, तरी या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या



इमारतीत दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी रहिवाशांनी अनेकवेळा महापालिका प्रशासनाकडे केल्या होत्या. मात्र त्याची गांभीर्याने दखल घेण्यात आली नाही. प्रशासनाने वेळेत उपाययोजना केली असती, तर हा दुर्दैवी मृत्यू टाळता आला असता, असा आरोप नागरिकांनी केला आहे.संबंधित म हिलेचा मृत्यू अतिसाराने झालेला असला तरी तेथील नागरिक जे पाणी वापरतात ते महानगरपालिकेचे नाही. त्यांचे स्वतंत्र बोअरिंग आहेत. घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेचे पथक घटनास्थळी भेट देत सुरक्षात्मक उपाययोजना तसेच औषध गोळ्यांचे वाटपही केले होते, असे महापालिका आरोग्य अधिकारी डॉ.राखी माने यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या घटनेशी महापालिकेचा काहीही संबंध नाही. या इमारतीमध्ये त्यांचे स्वतःचे बोअरिंग आहेत, असे सार्वजनिक आरोग्य उप अभियंता रामचंद्र पेंटर यांनी सांगितले.

## होटगी रस्त्यावरील कामामुळे पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था बाधित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

होटगी रोडवरील रस्त्याचे काम तांत्रिकदृष्ट्या चुकीच्या पध्दतीने होत असून यामुळे पाणीपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था बाधित होत असल्याची तक्रार 'एमआयएम'चे नगरसेवक अजहर हुंडेकरी यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे. होटगी रोडच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहती आहेत. या भागातील ड्रेनेज लाईन, पाणीपुरवठ्याच्या भूमिगत पाईपलाइनवर अनेक ठिकाणी रस्त्याचे बांधकाम करण्यात आले आहे. ड्रेनेज चेंबर्ससाठी आवश्यक जागाही न सोडल्याने भविष्यात देखभाल आणि दुरुस्तीची अडचण निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, महापालिका प्रशासनाने या तक्रारीची दखल घेत घटनास्थळाची पाहणी केली. पाहणीदरम्यान त्यांनी कामातील त्रुटींवर आक्षेप नोंदवत एम एसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना आवश्यक बदल करण्याच्या सूचना दिल्या.


महापालिकेने सुमारे ९ कोटी रुपयांचा दुरुस्ती आराखडा तयार करून एमएसआरडीसीकडे सादर केला असून या दुरुस्तीचा खर्च एमएसआरडीसीकडून करण्यात येणार आहे, असे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## 'विश्वकर्मा-अहिल्यादेवी'च्या वतीने २ ऑगस्ट रोजी 'उद्योजक व्हा' शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ जुलै-**

विश्वकर्मा फाउंडेशन व अहिल्यादेवी बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्था मर्यादित सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि.२ ऑगस्ट २०२६ रोजी उद्योजक व्हा शिबीराचे आयोजन करण्यात आले. अधिक माहितीसाठी १२ अ रेल्वे लाईन भैय्या चौक गायकवाड बिल्डिंग सोलापूर येथे समक्ष किंवा ९४२२०६५८५७ / ८०८०९३३२०२ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन विश्वकर्मा फाउंडेशनचे अध्यक्ष संतोष गायकवाड यांनी केले.

या शिबिरामध्ये उद्योग करु शकतो का? उद्योग करण्यासाठी कोणते गुण हवेत ते गुण नसेल तर ते कसे आत्मसात करावे? कोणकोणत्या उद्योग संधी आपल्या शहरात उपलब्ध आहेत? कोणकोणते उद्योग आपण करु शकतो? बँक लोन कसे मिळते? त्यासाठी काय काय कागदपत्रे लागतात? शासनाची कोणकोणती महामंडळ आहेत? सबसिडी किती मिळते? मुद्रा लोन, स्टार्टअप योजना, स्टँडिंग इंडिया, विश्वकर्मा योजना आदींविषयीची माहिती दिली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भरधाव कार डिव्हायडरवर आदळली; एकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत भरधाव व निष्काळजीपणे चालविलेल्या कारचा अपघात होऊन एका तरुणाचा मृत्यू, तर दुसरा जखमी झाल्याप्रकरणी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर नारायण काळे, शंकर राजू काळे (वय २६, रा. सारवाडी, ता. जि. धाराशिव) आणि चक्रधर दत्ता कव्हळे हे १४ जुलै २०२६ रोजी पहाटे सुमारे १ वाजता एमएच-२१-सीजी-२८९५ क्रमांकाच्या किया सोनेट कारमधून प्रवास करत होते.

कावलदरा येथील अनुराधा मंगल कार्यालयासमोर चालक ज्ञानेश्वर काळे याने कार भरधाव व निष्काळजीपणे चालवून रस्त्यावरील डिव्हायडरला धडक दिली. या अपघातात चक्रधर कव्हळे यांचा गंभीर दुखापतीमुळे मृत्यू झाला, तर शंकर काळे हे जखमी झाले.

या प्रकरणी शंकर काळे यांनी २१ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात चालक ज्ञानेश्वर नारायण काळे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### भाजपच्या वतीने परंड्यात स्व. अजितदादा पवार यांना अभिवादन

**परंडा, दि.२३ जुलै -**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त परंडा येथे प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, उपनगराध्यक्ष समरजीतसिंह ठाकूर, युवा मोर्चा शहराध्यक्ष अविनाश विधाते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याला अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना विनम्र श्रद्धांजली अर्पण केली.



### उमरग्यात स्व. अजित अनंतराव पवार यांना अभिवादन

**उमरगा, दि.२३ जुलै -**

श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा येथे महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री व माजी अर्थमंत्री स्व. अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे कनिष्ठ लिपिक आनंद कुलकर्णी होते, तर एस. व्ही. गायकवाड प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ शिक्षक एस.बी. गायकवाड यांनी स्व. पवार यांच्या राजकीय, सामाजिक व प्रशासकीय कार्याचा आढावा घेत राज्याच्या विकासातील त्यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. प्रारंभी प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सविता लोहार, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. अजित अनंतराव पवार यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली.



### स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त रुईभर येथे अभिवादन

**धाराशिव, दि.२३ जुलै -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सचिन कांबळे यांनी केले.



### पोद्दार जम्बो किड्सच्या विद्यार्थ्यांची पोलीस ठाण्यास शैक्षणिक भेट

**उमरगा, दि.२३ जुलै -**

पोद्दार जम्बो किड्स, उमरगा येथील विद्यार्थ्यांसाठी उमरगा पोलीस स्टेशन येथे शैक्षणिक फील्ड ट्रिप आयोजित करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी पोलीस ठाण्याची कार्यपद्धती, पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांची कर्तव्ये आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस दल करत असलेल्या कार्याची प्रत्यक्ष माहिती घेतली. पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे पालन, आपत्कालीन परिस्थितीत मदत कशी घ्यावी तसेच जबाबदार नागरिक होण्यासाठी आवश्यक सवयींबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पोलीस दलाविषयी आदर, विश्वास आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली. या उपक्रमास संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य बी.पी. सिंग, उपप्राचार्य अतुल फावडे, मुख्याध्यापिका विभावरी थिटे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## नळदुर्गमध्ये स्वस्त धान्य दुकानांत निकृष्ट गहू-तांदूळ वाटप ?

### नागरिकांकडून चौकशीची मागणी




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ जुलै -**

नळदुर्ग शहरातील स्वस्त धान्य दुकानांमधून शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येणारा गहू व तांदूळ निकृष्ट दर्जाचा असल्याची तक्रार समोर आली आहे. पुरवठा विभागाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून संबंधित पुरवठादारावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सध्या शहरातील स्वस्त धान्य दुकानांमधून या महिन्याचे गहू व तांदळाचे वितरण सुरू आहे. मात्र, वितरित करण्यात येणाऱ्या तांदळात तांदळापेक्षा कणीचे प्रमाण अधिक असून त्याचा रंगही काळपट असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. तसेच गव्हाचाही दर्जा अत्यंत खराब असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या मोफत धान्य योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना अन्नधान्य उपलब्ध करून दिले जाते. मात्र, पुरवठादारांकडून निकृष्ट दर्जाचे धान्य दिले जात असल्याने योजनेच्या उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना व्यक्त होत आहे. काही महिन्यांत चांगल्या दर्जाचे धान्य मिळत असले तरी त्यानंतर पुन्हा निकृष्ट दर्जाचे धान्य वितरित केले जात असल्याचीही नागरिकांची तक्रार आहे.

निकृष्ट दर्जाच्या धान्यामुळे गरीब नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून, स्वस्त धान्य दुकानांमधून केवळ चांगल्या दर्जाचेच धान्य वितरित होईल याची पुरवठा विभागाने दक्षता घ्यावी, अशी मागणी होत आहे.

तसेच निकृष्ट दर्जाचे गहू व तांदूळ पुरवणाऱ्या संबंधित पुरवठादाराची चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी शिधापत्रिकाधारकांनी केली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त परंड्यात २०१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ जुलै -**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त परंडा येथे आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरात तब्बल २०१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

यावेळी सुजितसिंह ठाकूर यांनी रक्तदात्यांचे आभार मानत रक्तदान हे सर्वोत्तम जीवनदान असल्याचे सांगितले. कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे, शहराध्यक्ष उमाकांत गोरे, ॲड. गणेश खरसडे, समरजीतसिंह ठाकूर, अविनाश विधाते यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्री भगवंत ब्लड बँक, बार्शीच्या कर्मचाऱ्यांसह भाजप कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर रेल्वेमार्गाला गती

### सर्वेक्षणास मंजुरी, डीपीआरचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

धाराशिव, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यांना जोडणाऱ्या प्रस्तावित २४० किलोमीटर लांबीच्या नव्या रेल्वेमार्गाच्या उभारणीला महत्त्वाचे पाऊल पडले आहे. या रेल्वेमार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालासाठी (डीपीआर) आवश्यक सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली असून प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे कामही सुरू झाल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

मराठवाड्यातील रेल्वे संपर्क अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. डीपीआर पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकार व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून नीती आयोग, केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि इतर सक्षम प्राधिकरणांकडून आवश्यक मंजुरी घेण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.रेल्वे मंत्रालयाने स्पष्ट केल्याप्रमाणे, रेल्वे प्रकल्पांची मंजुरी ही विविध प्रशासकीय टप्प्यांतून पूर्ण होणारी प्रक्रिया असल्याने अंतिम मंजुरी व प्रत्यक्ष काम सुरू होण्याबाबत सध्या निश्चित कालमर्यादा सांगता येणार नाही. मात्र, सर्वेक्षणास मंजुरी मिळाल्याने प्रकल्प पुढील टप्प्यात पोहोचला असून मराठवाड्याच्या विकासासाठी हे महत्त्वाचे पाऊल असल्याचे आमदार पाटील यांनी नमूद केले.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या प्रकल्पासंदर्भातील माहिती दिली असून, रेल्वेमार्ग पूर्ण झाल्यानंतर धाराशिव, बीड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील रेल्वे संपर्क अधिक मजबूत होणार आहे. यामुळे प्रवासी वाहतुकीसह कृषी व औद्योगिक मालवाहतुकीलाही मोठी चालना मिळून मराठवाड्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## अल्पवयीन मुलीचा बालविवाह; गर्भधारणा उघड झाल्यानंतर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**



बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील १६ वर्षे ११ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीचा बालविवाह लावून दिल्याप्रकरणी तिच्या आई, सावत्र वडील आणि पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलीचे दि. ९ जुलै २०२५ ते १८ जुलै २०२६ या कालावधीत ती अल्पवयीन असतानाच एका तरुणासोबत लग्न लावून देण्यात आले. त्यानंतर संबंधित तरुणाने तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याने ती सध्या नऊ महिन्यांची गर्भवती आहे.

सोनोग्राफीसाठी धाराशिव येथील स्त्री रुग्णालयात गेल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी ती अल्पवयीन असल्याचे निदर्शनास आणून एमएलसीद्वारे पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पीडितेने २१ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

## विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ लोहारा बंद

### तहसीलदारांना निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२३ जुलै -**



दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध शैक्षणिक व सामाजिक मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने दिलेल्या राज्यव्यापी महाराष्ट्र बंदच्या हाकेला लोहारा शहर व तालुक्यात गुरुवार (दि. २३ जुलै) रोजी प्रतिसाद मिळाला.

व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून बंदमध्ये सहभाग नोंदवला. यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयात निवेदन सादर केले. निवेदनात लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे ही लोकशाही मूल्यांना बाधा आणणारी बाब असल्याचा उल्लेख करत दिल्लीतील घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला लोहाऱ्यात व्यापारी वर्गानेही पाठिंबा दिला.

या आंदोलनात तालुकाध्यक्ष नितीन सितापुरे, उपाध्यक्ष प्रवीण भालेराव, महासचिव पंकज सोनकांबळे, जिल्हा उपाध्यक्ष रविकिरण बनसोडे, आरपीआय रोजगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष उत्तम भालेराव, मुकेश सोनकांबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## नळदुर्ग जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची दोन पदे रिक्त; शाळा बंद करण्याचा इशारा

### शिक्षकांची तात्काळ नियुक्ती करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ जुलै -**

नळदुर्ग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गेल्या वर्षभरापासून प्राथमिक पदवीधर शिक्षकांची दोन पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होत असल्याची बाब समोर आली आहे. याबाबत शालेय व्यवस्थापन व विकास समितीने १८ जुलै २०२६ रोजी ठराव मंजूर करून जिल्हा परिषद धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे शिक्षकांची तात्काळ नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.

शाळेच्या मराठी माध्यमातील इयत्ता सहावी ते आठवीमध्ये ५९ विद्यार्थी शिक्षण घेत असून, एकही पदवीधर शिक्षक उपलब्ध नसल्याने अध्यापनाची जबाबदारी इतर कर्मचाऱ्यांकडून सांभाळली जात आहे. अनेक वेळा पाठपुरावा करूनही शिक्षकांची नियुक्ती न झाल्याने पालक व शालेय व्यवस्थापन समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

समायोजनातूनही शिक्षक उपलब्ध न झाल्यास ३१ जुलै २०२६ रोजी शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा शालेय व्यवस्थापन समितीने दिला आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी दोन प्राथमिक पदवीधर शिक्षक आणि एक परिचर यांची तातडीने नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन नगरसेविका जुलेखाबेगम इनामदार यांच्या स्वाक्षरीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांना सादर करण्यात आले असून, शिक्षण विभागाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## हरवलेली पर्स भाविक महिलेला सुखरूप परत

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या लातूर येथील एका महिला भाविकाची हरवलेली पर्स सुरक्षारक्षक सोमनाथ भोकरे यांनी प्रामाणिकपणे कंट्रोल रूममध्ये जमा केली.

पर्समध्ये रोख रक्कम, सोनेसदृश्य कानातले व इतर साहित्य होते. संबंधित महिला सौ. कुलकर्णी यांनी वस्तूंची ओळख पटवल्यानंतर त्यांना पर्स सुरक्षित परत करण्यात आली.

यावेळी त्यांनी मंदिर संस्थानाच्या सुरक्षा विभागाचे व सुरक्षारक्षक सोमनाथ भोकरे यांचे आभार मानले.

## परंडा येथे वंचितने पुकारलेल्या बंदला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ जुलै -**



दिल्ली येथे शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या लाठीचार्ज व बळाच्या वापराच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने दि.२३ जुलै रोजी वंचितचे सर्वेसर्वा मा.खासदार ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती.

त्या अनुषंगाने परंडा तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने परंडा शहर बंद करण्याचे व्यापारी वर्गाला आव्हान केले होते. त्या आव्हानाला व्यापाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला असून अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यापाऱ्यांनी आपआपली अस्थापना बंद ठेवली आणि परंडा शहर कडकडीत बंद ठेवण्यास वंचितच्या पदाधाकाऱ्यांना मदत केली बंद शांततेत पाळण्यात आला. विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारावर गदा आणणाऱ्या या घटनेचा वंचित बहुजन आघाडी परंडा शहर व तालुका यांच्यावतीने तीव्र निषेधही करण्यात आला आहे.

## 'अन्न भेसळ अधिकारी' असल्याची बतावणी करून दुधाचे कॅन लंपास

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ जुलै -**

अन्न भेसळ विभागाचे अधिकारी असल्याची खोटी बतावणी करून दुधवाहतूक करणाऱ्या वाहनचालकाची गाडी अडवून दुधासह दोन कॅन चोरून नेल्याप्रकरणी दोघांविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश संजय भगत (रा. नवलगाव, ता. भूम) आणि शशिकांत संदीपानराव डोके (रा. गोलेगाव, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी २० जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता चिंचपूर फाटा येथे दुधवाहतूक करणारे जनार्धन शिवाजी मस्के (वय ३८, रा. वालवड, ता. भूम) यांची गाडी अडवली.

यावेळी आरोपींनी स्वतःला अन्न भेसळ विभागाचे अधिकारी व कर्मचारी असल्याची बतावणी करत दुधासह दोन कॅन घेऊन पसार झाल्याची तक्रार फिर्यादी जनार्धन मस्के यांनी २१ जुलै रोजी परंडा पोलीस ठाण्यात दिली.

या फिर्यादीवरून आरोपींविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास परंडा पोलीस करीत आहेत.

## कोल्हापूर-सांगलीतील अतिरिक्त ५० टीएमसी पाणी मराठवाड्याकडे; डीपीआरसाठी २४.०५ कोटींची मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील पुराचे अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्याकडे वळविण्याच्या महत्त्वाकांक्षी योजनेला गती मिळाली आहे. प्रकल्पाचा व्यवहार्यता अहवाल (Feasibility Report) सकारात्मक आल्यानंतर राज्य सरकारने सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यास प्रशासकीय मान्यता दिली असून त्यासाठी २४ कोटी ५ लाख ६७ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे धाराशिव, लातूर, सोलापूरसह संपूर्ण मराठवाड्याच्या पाणीटंचाईच्या प्रश्नावर मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

या योजनेअंतर्गत कृष्णा खोऱ्यात पावसाळ्यात समुद्रात वाहून जाणारे ५० टीएमसी अतिरिक्त पाणी उपसा सिंचन योजनेद्वारे मराठवाड्याकडे वळविण्यात येणार आहे.

यामुळे कोल्हापूर-सांगली भागातील पुराचा ताण कमी होण्याबरोबरच दुष्काळी भागातील सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.

यापूर्वी जागतिक बँकेच्या तांत्रिक सल्लागार संस्थेने केलेल्या अभ्यासानंतर प्रकल्पाचा व्यवहार्यता अहवाल सकारात्मक आला होता. त्यानंतर आता डीपीआर तयार करण्यास प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने प्रकल्प प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने पुढे सरकला आहे. सुमारे १६ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे अंदाजे साडेतीन लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

आशियाई विकास बँकेच्या सहाय्याने तयार झालेल्या पूर्व संभाव्यता अहवालानुसार हा प्रकल्प दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात कृष्णा नदीवरील सापटेवाडी बंधाऱ्यापासून नीरा नदीवरील उद्धट बंधाऱ्यापर्यंत, तर दुसऱ्या टप्प्यात उद्धट बंधाऱ्यापासून उजनी धरणापर्यंत पाणी नेण्यात येणार आहे. या कामात आवश्यक तांत्रिक सर्वेक्षण, अन्वेषण, सुमारे १०० किलोमीटर लांबीच्या नवीन बोगद्याची उभारणी तसेच विद्यमान बोगद्यांची क्षमता वाढविण्याचा समावेश आहे.

दुष्काळग्रस्त मराठवाड्याला कायमस्वरूपी पाणी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची ठरणार असून, कृष्णा-मराठवाडा प्रकल्पासह या योजनेमुळे शेती, उद्योग आणि प्रादेशिक विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### दैठणा ग्रामपंचायतीत अजितदादा पवार यांची जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

दैठणा, दि. २३ जुलै : दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला.

यावेळी अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे सरपंच शेषेराव कांबळे, उपसरपंच आशिष बिरादार (योगेश), ग्रामसेविका तोटे मॅडम, समाजसेवक व ग्रामपंचायतीचे दीर्घकालीन माजी उपसरपंच सिताराम किसनराव पाटील, विजयकुमार सामनगावे, निळकंठ बिरादार, कृष्णा बिरादार तसेच ग्रामपंचायत कर्मचारी परमेश्र्वर बिरादार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी अजितदादा पवार यांच्या राज्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करत त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे आयोजन दैठणा ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले असून शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### औशात ५६ दिव्यांगांना इलेक्ट्रिक ट्रायसियकल, ३५० महिलांना मोफत शिवणयंत्रांचे वाटप

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त क्रिएटिव्ह फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम



तभा वृत्तसेवा

औसा दि. २३ जुलै : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा यज्ञाचा संकल्प' या उपक्रमांतर्गत औसा येथील विजय मंगल कार्यालयात क्रिएटिव्ह फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत ५६ दिव्यांगांना आधुनिक सोलार इलेक्ट्रिक ट्रायसियकल आणि ३५० महिलांना मोफत शिवणयंत्रांचे वाटप करण्यात आले.

आमदार अभिमन्यू पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, दिव्यांनी संघटनेचे सुरेश पाटील, तहसिलदार घनशाम आडसुळ,बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, पंचायत समितीच्या सभापती गंगाबाई कोदळीकर, उपसभापती अमोल पाटील, संतोष मुक्ता,किरण उटगे, सुभाष जाधव, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशिक्षित पवार,सौ.शोभाताई पवार, कल्पना डांगे, प्रवीण कोपरकर, संदीपान शेळके,शिवराज राठोड,अथर्व राऊत, योगेश माने उपस्थित होते.

आ. अभिमन्यू पवार लाभार्थ्यांना मार्गदर्शन म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हीच खरी लोकसेवा आहे. मतदारसंघातील गरजू दिव्यांगांना इलेक्ट्रिक ट्रायसायकल उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांच्या दैनंदिन प्रवासात मोठी सुलभता निर्माण होईल. शिक्षण, रोजगार, व्यवसाय तसेच अन्य कामांसाठी त्यांना आत्मविश्र्वासाने व स्वतंत्रपणे वावरता येईल. दिव्यांग बांधवांच्या सन्मानाने जगण्याचा अधिकार अधिक बळकट करण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला चालना देण्याच्या उद्देशाने ३५० महिलांना मोफत शिवणयंत्रांचे वितरण करण्यात आले. शिवणयंत्राच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होणार असून, त्या स्वतःचा छोटा व्यवसाय सुरू करून कुटुंबाच्या उत्पन्नात हातभार लावू शकतील. महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या उपक्रमामुळे दिव्यांग आणि महिलांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडून येईल, असा विश्र्वास उपस्थितांनी व्यक्त केला. लाभार्थ्यांनीही क्रिएटिव्ह फाउंडेशन आणि आमदार अभिमन्यू पवार यांचे आभार मानत या उपक्रमामुळे नव्या उमेदीने जीवन जगण्याची प्रेरणा मिळाल्याची भावनाआ. पवार यांनी व्यक्त केली.यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज परसणे यांनी केले.

## वरूण राजाला प्रसंन्न करण्यासाठी व्यापारी बांधवांकडून श्री मारोतीला साकडे



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २३ जुलै : वरूण राजाने अनेक दिवसांपासून पाठ फिरवल्याने शेतकरी, व्यापारी मोठ्या चिंतेत आहेत.त्यामुळे वरूणराजाला प्रसंन्न करण्यासाठी व्यापारी बांधवांनी श्री.मारोतीला साकडे घालून अनवानी पायाने गावातील दैवतांना पाणी घालून भंडार्याचे आयोजन करण्यात आले होते.

पावसाळा सुरू होऊन दोन महिने झाले पण पावसाने दडी मारल्यामुळे शेतकर्यांसह व्यापारी वर्गात चिंता व्यक्त केली जात असल्याने शहरातील व्यापारी एकत्र येऊन वरून राजाला प्रसन्न करण्यासाठी शहरातील छत्रपती संभाजीराजे चौक येथील श्री.भगवा मारुती मंदिर येथे मारुतीला अभिषेक घालण्यात आले,तसेच चाकूर वासियांचे ग्रामदैवत श्री.हनुमान मंदिर,कमानी जवळील श्री.संकट मोचक हनुमान मंदिरात श्री.मारुतीच्या मूर्तीला पाणी घालून आरती करण्यात आली,यावेळी व्यापारी बांधवांच्या वतीने पाऊस पडावे म्हणून सामूहिक प्रार्थना करण्यात आली,व्यापारी बांधवांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यापारी ओमप्रकाश लोया, बबलू फुलारी,कार्तिक सुर्यवंशी, साईप्रसाद हिप्पाळे,अशोक बेजगमवार,अतिष चिटबोने,सुमित होनकर,गणेश घाटे,सागर बेजगमवार,सुरज सोनटक्के,गुणवंत जानकर,हणमंत शेळके,गणेश मद्रेवार,नंदकुमार हाळे,विश्र्वप्रताप सुर्यवंशी,लक्ष्मण भातके,धनाजी धोंडगे, साईनाथ मद्रेवार,मुकुंद बेजगमवार,कल्याण वाघमारे,राजीव डिगोळे,नरसिंग धोंगडे, अभिजित व्होटे,मिथुन धोंडगे,आनंद बेजगमवार, संजय कस्तुरे, कौस्तुभ सुवर्णकार, शैलेश पाटील,लक्ष्मण भातके,अशोक शेळके,विशाल वंगाले,अमोल येरवे, आनंद लोया आदिंनी परिश्रम घेतले या भंडार्याच्या कार्यक्रमास बाजारपेठेतील व्यापार्यांसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## दिल्ली लाठीचार्जच्या निषेधार्थ निलंगा कडकडीत बंद

### महाराष्ट्र बंदला अभूतपूर्व प्रतिसाद. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी



तभा वृत्तसेवा

निलंगा,दि. २३ जुलै : देशाचे भविष्य घडविणार्या विद्यार्थ्यांच्या हातात पुस्तके असताना त्यांच्या हातावर लाठ्या चालत असतील, तर तो केवळ विद्यार्थ्यांवरील हल्ला नसून भारतीय लोकशाहीच्या संवेदनशील मनावर उमटलेला वेदनादायी घाव आहे, अशा तीव्र भावना व्यक्त करत दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणार्या विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या **'महाराष्ट्र बंद'**ला निलंगा शहरात अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

शहरातील मुख्य बाजारपेठ, व्यापारी प्रतिष्ठाने, भाजी मार्केट आणि अनेक व्यावसायिक आस्थापना दिवसभर बंद राहिल्या. रस्त्यांवर शांतता होती; मात्र नागरिकांच्या मनात विद्यार्थ्यांबाबत प्रचंड अस्वस्थता आणि संताप असल्याचे चित्र दिसून आले.

बंदनंतर राष्ट्रपती महोदया, भारत सरकार यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात आंदोलनकर्त्यांनी म्हटले की, लोकशाहीत विद्यार्थ्यांच्या प्रश्र्नांना उत्तर संवादाने मिळाले पाहिजे; दडपशाहीने नव्हे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कारवाईची स्वतंत्र, निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब (प्रकाश) आंबेडकर यांच्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला निलंग्यात विविध समविचारी पक्ष, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी पाठिंबा दिला. आंदोलनकर्त्यांनी संविधान, सामाजिक न्याय आणि लोकशाहीच्या संरक्षणासाठी घोषणाबाजी केली.

निवेदनात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणार्यांविरुद्ध कोणतीही दयामाया दाखवू नये, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली.

विद्यार्थ्यांचा आवाज दडपून देशाचे भविष्य घडत नाही. प्रश्र्न विचारणार्या तरुणांना शत्रू नव्हे, तर राष्ट्राची ताकद म्हणून पाहिले गेले पाहिजे, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांना न्याय न मिळाल्यास लोकशाही आणि संविधानाच्या चौकटीत राहून राज्यभर आणखी व्यापक आणि तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे विलास सूर्यवंशी, वंचित बहुजन आघाडीचे भाऊसाहेब बनसोडे, सूर्यकांत कांबळे, रजनीकांत कांबळे,छावा संघटनेचे तुळशीदास साळुंके,विजयकुमार सूर्यवंशी, दिगंबर सूर्यवंशी, अर्जुनाप्पा कटके, धनराज कांबळे, भगवान कांबळे, प्रदीप सोनकांबळे,मातंग चळवळीचे सतीश कांबळे ,सिराज शेख, साहेबराव कांबळे, प्रकाश गायकवाड, बालाजी कांबळे, गजेंद्र कांबळे, सोनेराव बनसोडे, नागनाथ नरहरे, सुनील आरेराव, रावबा शिंदे, दत्ता सूर्यवंशी (माळेगावकर), संदीप बनसोडे, एजाज सय्यद यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## दैठणा-उत्तर शेंद रस्ता बनला 'मृत्यूचा सापळा

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ, दि. २३ जुलै : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील दैठणा-उत्तर शेंद हा रस्ता अत्यंत धोकादायक बनला असून, स्थानिक नागरिकांकडून या रस्त्याला आता मृत्यूचा सापळा अशी उपमा दिली जात आहे. गुरुवारी पहाटे झालेल्या अल्प पावसानंतर सकाळी धावणारी एसटी बस रस्त्यावरून घसरून बाजूला सरकली. सुदैवाने चालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली आणि बसमधील प्रवासी सुखरूप बचावले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, बस आणखी थोडी पुढे सरकली असती तर ती पलटी होण्याची शक्यता होती. या घटनेनंतर बस चालकाने गावकर्यांना रस्त्याची तातडीने दुरुस्ती झाल्याशिवाय भविष्यात बससेवा सुरू ठेवणे कठीण असल्याचे सांगितल्याने उत्तर शेंद गावातील नागरिक, विशेषतः विद्यार्थ्यांचे पालक, चिंतेत पडले आहेत.

गावकर्यांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्यावर यापूर्वीही अनेक अपघात झाले असून काही जखमींवर अद्याप उपचार सुरू आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील प्रवास धोकादायक बनल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेमुळे विद्यार्थ्यांनी शाळेत कसे जावे, हा गंभीर प्रश्र्न गावासमोर उभा राहिला आहे. अनेक वेळा संबंधित प्रशासनाकडे तक्रारी करूनही रस्त्याच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष घालून दैठणा-उत्तर शेंद रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## संजय गांधी निराधार योजना समितीच्या बैठकीत ६५ प्रस्तावांना मंजुरी,७० प्रस्ताव प्रलंबित



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २३ जुलै : चाकूर तालुका संजय गांधी निराधार योजनेची बैठक कमिटीचे अध्यक्ष सिद्धेश्र्वर अंकलकोटे यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयामध्ये पार पडली.यावेळी बैठकीस तहसीलदार तथा कमिटीचे सचिव नरसिंग जाधव, नायब तहसीलदार शैलेश निकम ,नगरपंचायतचे मुख्याधिकारी प्रतीक लंबे यांच्यासह कमिटीचे सदस्य संतोष माने,ड.श्रीनाथ सावंत, खुदबुद्दीन घोरवाडे,विवेकानंद लवटे पाटील,केरबा शेळके, पांडुरंग धाडे, दत्तासाहेब पाटील आदी या बैठकीला उपस्थित होते. एकूण १३५ प्रस्ताव दाखल झाले होते यापैकी निकष पूर्ण करणार्या ६५ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली व ७० अर्ज कागदपत्रांच्या त्रुटीमुळे प्रलंबित ठेवण्यात आले.लाभार्थांनी आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर त्या प्रस्तावावर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे बैठकीत ठरविण्यात आले.लाभार्थ्यांना जन्मतारखेचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य केल्यामुळे निरक्षर लोकांना मोठी अडचण येत असून ते या लाभापासून वंचित राहत आहेत म्हणून शासनाने शाळा प्रमाणपत्राची अट शिथिल करून पूर्वीप्रमाणे आधार कार्ड वरील वय ग्राह्य धरावे असा ठराव या बैठकीत घेण्यात आला. सदर ठरावाची प्रत मतदार संघाचे आमदार तथा राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना देऊन ही अट शिथिल करण्यासाठी संबंधीत विभागांना सूचना द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त शिरूर अनंतपाळ येथे भव्य रक्तदान शिबीर



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २३ जुलै : महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आज शिरूर अनंतपाळ येथे आपल्या नेते मा. संभाजी भैय्या पाटील निलंगेकर व मा. अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपत गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरणार्या या उपक्रमात सहभाग नोंदविला. रक्तदान हेच श्रेष्ठदान असल्याचा संदेशही यावेळी देण्यात आला.

याप्रसंगी शिरूर अनंतपाळ कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सभापती गोविंदराव चिलकुरे, भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष माधवराव बिरादार (डिगोळकर), संतोष डोंगरे, लातूर जिल्हा भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष दैठणा येथील सदानंद पाटील, मंगेश पाटील, भाजप तालुका सरचिटणीस प्रशांत पाटील, प्रद्युम्न पाटील, गणेश खरडमोल, सतीश भिका, जिल्हा परिषद सदस्या तुळसाबाई लोंढे, जगदीप लोंढे, गणेश सलगरे, रतन शिवणे, गणेश धुमाळे, तुकाराम लांडगे, पंचायत समिती सदस्य सचिन सांगवे, आनंद काळे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरातून समाजोपयोगी कार्याचा आदर्श निर्माण झाला असून, उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत अशा उपक्रमांत युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

### विशेष गौरव पुरस्कारासाठी १५ सप्टेंबरपर्यंत माहिती सादर करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.२३ जुलैः विविध क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी करणार्या जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या पत्नी आणि पाल्यांना सैनिक कल्याण विभागातर्फे विशेष गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरूप एकल रक्कम २० हजार ते रुपये १ लाख रुपये असे आहे.

या पुरस्कारासाठी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरी, साहित्य, संगीत, गायन व नृत्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नैसर्गिक आपत्तीच्या काळात केलेली बहुमोल मदत, इयत्ता दहावीमध्ये ९० टक्के पेक्षा जास्त व बारावी परीक्षेत ८५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी, तसेच यशस्वी उद्योजक, सामाजिक कार्य आणि पर्यावरण विषयात उत्कृष्ट कामगिरी करणार्या व्यक्तींचा समावेश असणार आहे. तरी जिल्ह्यातील पात्र माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांनी विहित नमुन्यातील अर्ज १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे जमा करावेत, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान




तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि.२३ जुलै : महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अहमदपूर येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील रक्तदान शिबिरामध्ये १५१ रक्तदात्यानी रक्तदान केले. भारतीय जनता पक्षाच्या पुढाकाराने अहमदपूर शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर सदरील रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते फित कापुन सदरील रक्तदान शिबीराचे उदघाटन करण्यात आले. यावेळी माजी आमदार बब्रुवान खंदाडे, भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके, भाजपाचे माजी जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, माजी नगराध्यक्ष ॲड. भारत भाऊ चामे, राजकुमार मजगे , नगराध्यक्ष ॲड स्वप्नील व्हते, माजी जिल्हा परिषद सदस्य त्रंबक गुट्टे, माजी सभापती अशोक काका केंद्रे, जिल्हा परिषद सदस्य भागवत गुट्टे, जिल्हा परिषद सदस्य अजिंक्य देशमुख, उमाकांत कासनाळे,प्रा.विश्र्वाभंर स्वामी,किनगाव मंडळाचे अध्यक्ष चंद्रप्रकाश हंगे, शिरुर ता.मंडळाचे अध्यक्ष प्रताप पाटील,भाजपाचे गोविंद गिरी, नगरसेवक डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी,ॲड.अजिंक्य चामे,हणमंत देवकते, ॲड. निखिल कासनाळे, भाजप युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस रामानंद मुंडे, माजी पंचायत समितीचे सदस्य माणिक नरवटे, बालाजी मुंडे,चंदशेखर डांगे,ओम पुणे,सुशांत गुणिले, रामनाथ पलमटे,रामभाऊ बेल्लाळे,बबलू पठाण,परमेश्र्वर आढाव, अर्जुन गंगथडे, दत्ता खंदाडे ,रतन सौदागर,रविशंकर स्वामी, यांच्या सह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्तदान शिबीरात सहभाग घेतला, रक्तदान शिबीराचे विषेश वैशिष्ट्य म्हणजे सदरील रक्तदान शिबीरात अहमदपूर, हडोळती,किनगाव,कोपदेव हिप्परगा, वायगाव येथील कलीम शेख व सौ. तबसुन शेख यांनी सपत्नीक रक्तदान केले तसेचअरबाज पठाण,अनवर बागवान,आयुब शेख यांच्या सह अनेक मुस्लिम बांधवांनी रक्तदान करून सर्वधर्म समभाव जपुन लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना रक्तदानाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या.

या वेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## स्व. अजितदादा पवार जयंतीनिमित्त लोहाऱ्यात व्याख्यान व रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२३ जुलै -**

भानुदासराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि लोहारा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

यानिमित्त आयोजित व्याख्यानात प्रा. डॉ. संजय कोरेकर यांनी स्व. पवार यांच्या सामाजिक, राजकीय व प्रशासकीय कार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. सतीश इंगळे होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मल्लिकार्जुन रक्तपेढी, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले. शिबिरात प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि युवकांनी रक्तदान करून ३८ रक्तसंचांचे संकलन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विनोद तुंगे आणि पृथ्वीराज चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### तुळजाभवानी मंदिरात याज्ञवल्क्य उत्सवास प्रारंभ

**तुळजापूर, दि.२३ जुलै -**

श्री तुळजाभवानी मंदिरात आषाढ शुद्ध नवमीपासून सुरू होणाऱ्या पारंपरिक याज्ञवल्क्य उत्सवास बुधवारी उत्साहात प्रारंभ झाला. दुपारी गणेशपूजन व कलशपूजन करून विधिवत उत्सवाची सुरुवात करण्यात आली. याज्ञवल्क्य उत्सवाचे यजमान प्रतिक प्रयाग व अंजली प्रयाग तसेच गणेश अंबुलगे व राखी अंबुलगे यांच्या हस्ते पूजन संपन्न झाले. यावेळी उत्सव मंडळाचे अध्यक्ष ॲड. शैलेश पाठक यांच्यासह पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. आषाढ शुद्ध पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या या उत्सवादरम्यान तुळजाभवानी मंदिरात अखंड संहिता पठण करण्यात येणार आहे.



### डॉ. शाम होळकर यांना 'महा क्युपंक्चर रत्न' पुरस्कार

**तुळजापूर, दि.२३ जुलै -**

तुळजापूर येथील श्री तुळजाई आयुर्वेद, पंचकर्म व निसर्गोपचार केंद्राचे संचालक डॉ. शाम चंद्रकांत होळकर यांना वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'महा क्युपंक्चर रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन (एम आयएमए)च्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात हा सन्मान करण्यात आला. क्युपंक्चर, आयुर्वेद, पंचकर्म व निसर्गोपचाराच्या माध्यमातून प्रभावी आरोग्यसेवा दिल्याबद्दल डॉ. होळकर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या यशाबद्दल वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी, सामाजिक संस्था व नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले.

### हैदराबादचे वास्तु व ज्योतिष तज्ज्ञ राम शर्मा महाराष्ट्र दौऱ्यावर

**नळदुर्ग, दि.२३ जुलै -**

हैदराबाद येथील वैदिक वास्तु व ज्योतिष तज्ज्ञ राम शर्मा हे २६ ते ३० जुलैदरम्यान प्रथमच महाराष्ट्र दौऱ्यावर येत असून नळदुर्ग, उमरगा, सोलापूर, धाराशिव व परिसरातील नागरिकांना वास्तु मार्गदर्शन आणि वैदिक कुंडली विश्लेषणाबाबत सल्ला देणार आहेत. या भेटीदरम्यान घर, फ्लॅट, कार्यालय, उद्योग, कारखाना, प्लॉट निवड, बांधकामपूर्व वास्तु मार्गदर्शन तसेच कुंडली विश्लेषणाबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ही भेट पूर्वनोंदणी केलेल्या व्यक्तींसाठीच असून इच्छुकांनी ७०३२७३९५८९ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### महिलांसाठी मोफत श्रीमद्भगवद्गीता अध्ययन वर्ग २६ जुलैपासून

**तुळजापूर, दि.२३ जुलै -**

तुळजापूर येथील गीता परिवाराच्या वतीने महिलांसाठी मोफत श्रीमद्भगवद्गीता अध्ययन वर्ग २६ जुलै २०२६ पासून सुरू होत आहेत. गीता अभ्यासिका सौ. अश्विनीताई कोंडो यांच्या मार्गदर्शनाखाली हे वर्ग होणार असून १४ वर्षांवरील मुली व महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या वर्गामध्ये श्रीमद्भगवद्गीतेचे शुद्ध उच्चारण, श्लोकांचा अर्थ, विवेचन तसेच दैनंदिन जीवनातील उपयुक्ततेचा अभ्यास करून घेतला जाणार आहे. ज्ञान, भक्ती आणि वैराग्य या गीतेतील तत्त्वांवर मार्गदर्शनासह व्यक्तिमत्त्व विकासालाही प्राधान्य दिले जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.



### रांजणी येथे पंचायत समितीचा जनता दरबार

**नायगांव, दि.२३ जुलै -**

कळंब तालुक्यातील रांजणी येथे पंचायत समितीच्या वतीने जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. प्रारंभी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या सभापती प्राचार्य राजश्री वरपे होत्या. जनता दरबारात अंगणवाडी, शाळा, उपआरोग्य केंद्र, शेतरस्ते, महावितरण तसेच विविध विकासकामांशी संबंधित तक्रारी व मागण्यांवर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास जिल्हा परिषद सभापती विश्वासराव कोकणे, उपसभापती प्रणिता चव्हाण, जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ शितोळे, पंचायत समिती सदस्य योगेश्वरी पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सात गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उमरग्यात महाआरोग्य व महसूल समाधान शिबिर; ९,५८५ रुग्णांची मोफत तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ जुलै -**

सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न मार्गी लावणे, शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक लाभार्थ्यापर्यंत पोहोचविणे आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने उमरग्यात आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल व सम धान शिबिर अभियान' तसेच महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ९,५८५ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी व उपचार करण्यात आले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच लोकनेते अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हा आरोग्य विभाग, उमरगा-लोहारा महसूल विभाग आणि शरण पाटील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श महाविद्यालय, उमरगा येथे बुधवारी (दि. २२) या शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री तथा आमदार बसवराज पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, शरण पाटील, उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे, तहसीलदार गोविंद येरमे, रणजितसिंह कोळेकर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. बसवराज पाटील यांनी शासनाच्या विविध योजना प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी महसूल सम धान शिबिर प्रभावी माध्यम ठरत असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री बळीराजा पाणंद मुक्त योजनेअंतर्गत शेतरस्त्यांचे मजबुतीकरण सुरू असून त्याचा मोठा लाभ शेतकऱ्यांना होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच उमरगा तालुक्याला मराठवाड्यातील आदर्श तालुका बनविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

उमरग्यात जागतिक बँकेच्या सहाय्याने १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारण्यात आले असून भविष्यात ते २०० खाटांचे करण्याबरोबरच महिलांसाठी स्वतंत्र रुग्णालय उभारण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी शरण पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन लाख रुपयांपर्यंतच्या शेतकरी कर्जमाफीचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक असल्याचे सांगत त्यांचे अभिनंदन केले. तसेच विविध शासकीय योजनांतील पाच लाभार्थ्यांना मंजुरी आदेशांचे वितरण करण्यात आले.

महाआरोग्य शिबिरात लातूर, सोलापूर, धाराशिव आणि उमरगा येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी कर्करोग, हृदयरोग, मधुमेह, स्त्रीरोग, बालरोग, नेत्र, कान-नाक-घसा आदी विविध आजारांची मोफत तपासणी व उपचार केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी केले, तर आभार तहसीलदार गोविंद येरमे यांनी मानले.

## नळदुर्गमध्ये महाविकास आघाडीचे लक्षवेधी आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ जुलै -**

दिल्ली येथे नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत नळदुर्ग शहर महाविकास आघाडीच्या वतीने गुरुवार (दि. २३ जुलै) रोजी संविधान चौकात लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.



नळदुर्ग बसस्थानकासमोरील संविधान चौकात सकाळी १०.३० वाजता शांततापूर्ण मार्गाने झालेल्या या आंदोलनात विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांना पाठिंबा देत पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलनात काँग्रेसचे नगरसेवक इमाम शेख, शिवसेना (ठाकरे गट)चे माजी उपजिल्हाप्रमुख कमलाकर चव्हाण, शहरप्रमुख संतोष पुदाले, उपतालुकाप्रमुख सरदारसिंग ठाकूर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे ताजोद्दीन शेख, बशीर शेख, सामाजिक कार्यकर्ते अजहर जहागीरदार, शाम कनकधर, सोमनाथ म्हेत्रे, राजेंद्र जाधव, ओंकार कलशेट्टी तसेच वंचित बहुजन आघाडीचे अरुण लोखंडे, बाबासाहेब बनसोडे, एस.के. गायकवाड यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी कमलाकर चव्हाण, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकूर, ताजोद्दीन शेख, अरुण लोखंडे आदींनी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा निषेध व्यक्त केला. तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणारा अन्याय थांबवावा आणि शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता व विश्वास कायम राखण्यासाठी शासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

आंदोलनादरम्यान नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)कडून निषेध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

दिल्लीतील जंतर-मंतर परिसरात विविध मागण्यांसाठी शांततामय म ार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्ह्याच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे सहानुभूतीने पाहण्याऐवजी त्यांच्यावर बळाचा वापर करणे ही लोकशाही मूल्ये आणि संविधानिक अधिकारांना बाधा आणणारी बाब असल्याची भूमिका पक्षाने मांडली.

पक्षाच्या निवेदनात विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून शिक्षण, रोजगार, स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया आणि परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेसंदर्भातील त्यांच्या प्रश्नांवर शासनाने संवेदनशीलतेने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्याऐवजी त्यांच्यावर लाठीचार्ज करणे निषेधार्ह असल्याचेही नमूद करण्यात आले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करून तोडगा काढावा, आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीचार्जची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

याशिवाय केंद्र व राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्न गांभीर्याने हाताळून रोजगाराच्या संधी वाढवाव्यात, स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता कायम ठेवावी आणि भरती प्रक्रियेतील अडचणी दूर कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) कायम त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील, असा विश्वास डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सुरक्षा समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिवच्या सुरक्षा समितीची बैठक समितीचे अध्यक्ष तथा प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. विश्वजित गो. पवार यांच्या अध्यक्षतेखाली स्त्री रुग्णालयात पार पडली. बैठकीत रुग्णालय परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून रुग्ण, त्यांच्या नातेवाईक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. तसेच संबंधित विभागांनी परस्पर सम न्वयातून काम करून सुरक्षा व्यवस्थेत अधिक प्रभावी सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

बैठकीनंतर राजर्षी शाहू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, धाराशिव यांच्या वतीने स्त्री रुग्णालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी शासकीय जिल्हा रुग्णालयाचे अधिष्ठाता (डीन) डॉ. शैलेंद्र चौहान चव्हाण, वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी लाकाळ, डॉ. नोमान शेख, सुरक्षा समितीचे अध्यक्ष डॉ. विश्वजित पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता गवळी, समितीचे सदस्य अब्दुल लतीफ, गणेश वाघमारे, बाबासाहेब जावळे, मेट्रन पल्लवी चव्हाण, रिबेका भंडारी, श्रीमती भालेराव यांच्यासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तसेच राजर्षी शाहू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा उज्वला शिंदे, सचिव रमेश पाटील, सदस्य ज्योती राजेनिंबाळकर आणि संस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांनी विविध वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धन व हरित परिसर निर्मितीचा संदेश दिला.

## ३३ केव्ही वीजवाहिनीची ॲल्युमिनियम तार चोरी; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

बेंबळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आंबेवाडी शिवारात सिरेन्टीका कंपनीच्या ३३ केव्ही उपवाहिनीवरील सुमारे एक किलोम ीटर लांबीची ॲल्युमिनियम तार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

या चोरीत सुमारे ७० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी सोरिजन आर. ई. सर्व्हिसेस प्रा. लि.चे असिस्टंट जनरल मॅनेजर संतोष कृष्णराव पेरले यांच्या फिर्यादीवरून बेंबळी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) व ३२४(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## एसटी बस अडवून चालक-वाहकाला मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

एसटी बस आडवी म ोटारसायकल लावून चालक व वाहकाला शिवीगाळ, धक्काबुक्की व मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामा भुजंग ठवरे (रा. कौडगाव, ता. परंडा) यांनी २१ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजता पिंपरखेड पाटी येथे एमएच-२०-बीएल-४२३० क्रमांकाची एसटी बस विनाकारण अडवली. त्यांनी एमएच-४५-एक्स-२१७७ क्रमांकाची मोटारसायकल बससमोर उभी करून चालक तात्यासाहेब बापू पिंगळे यांच्याशी शिवीगाळ व धक्काबुक्की केली. यावेळी एसटी महामंडळाच्या परंडा आगारातील वाहक आण्णा माधव कोळी (वय ३८, रा. कावळेवाडी, ता. धाराशिव) यांनाही मारहाण करून तुला बघून घेतो अशी धमकी देत त्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी आण्णा माधव कोळी यांनी २२ जुलै २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियानात जिल्ह्यात विविध उपक्रम राबविणार : अर्चनाताई पाटील

**मुख्यमंत्री समृद्ध ग्राम अभियानांतर्गत धाराशिवमध्ये ७१० ग्रामपंचायतींमध्ये विकास उपक्रम... २७ जुलैला कार्यशाळा...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ जुलै -**

मुख्यमंत्री समृद्ध ग्राम अभियानांतर्गत धाराशिव जिल्ह्यात सर्वांगीण ग्रामविकासाला चालना देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असून, अभियानाच्या प्रभावी अंम लबजावणीसाठी २७ जुलै रोजी ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायत पदाधिकारी, सदस्य तसेच विविध विभागांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही माहिती जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

'आपला जीव - धाराशिव' या टॅगलाईनअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या अभियानात जिल्ह्यातील ७१० ग्रामपंचायतींचा सहभाग असणार आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत मोबाईल व टीव्ही बंद ठेवण्याचे जनजागृती अभियान, सिंगल युज प्लास्टिक बंदी, वृक्षारोपण, सौरऊर्जे वर आधारित विद्युत शवदाहिनी, ग्रामपंचायतींचे सौरऊर्जीकरण, शाळांमध्ये स्वच्छतागृह उभारणी, म नी बँक, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, ग्राम उद्यान, ओपन किंवा बंदिस्त जिम तसेच घरपट्टी व नळपट्टीची क्यूआर कोडद्वारे वसुली आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

अर्चनाताई पाटील यांनी सांगितले की, जिल्ह्यातील प्रत्येक अधिकाऱ्याला एक गाव दत्तक देण्यात येणार आहे. सिंगल युज प्लास्टिकच्या वापरावर कठोर निर्बंध घालण्यात येणार असून, नियम ांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना एक हजार रुपये, तर संबंधित ग्राम पंचायतीला दहा हजार रुपये दंडाची तरतूद करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेमार्फत १३ लाख वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, १६ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पंचायत समिती स्तरावर सौरऊर्जे वर चालणाऱ्या विद्युत शवदाहिन्या उभारण्याचे नियोजन आहे. तसेच जिल्ह्यात ७७० इलेक्ट्रिक घंटागाड्या



उपलब्ध करून देण्याचीही मानस व्यक्त करण्यात आला.

ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ८३ अभ्यासिका सुरू करण्यात येणार असून त्यासाठी सुमारे दोन लाख रुपयांची पुस्तके उपलब्ध करून दिली जाणार आहेत. याशिवाय १४० शाळांमध्ये इयत्ता पाचवी ते सातवीसाठी स्वच्छतागृह, सौरऊर्जा व्यवस्था, मनी बँक तसेच शेती, पर्यावरण आणि गणेशमूर्ती निर्मितीसारख्या कृतीयुक्त उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जाणार आहे.

अनुसूचित जाती-जमातींच्या कुटुंबांसाठी सौरऊर्जा सुविधा, गावागावांत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, ग्रामस्वच्छता अभियान, ग्राम उद्याने आणि व्यायामशाळा उभारण्याचीही योजना आहे. आरोग्य क्षेत्रात आशा स्वयंसेविकांना गावातील क्षयरोग व कर्करोगग्रस्त रुग्ण शोधण्याची जबाबदारी दिली जाणार असून, प्रत्येक टीबी रुग्ण शोधून देणाऱ्या आशा स्वयंसेविकेला १०० रुपयांचे प्रोत्साहनपर मानधन देण्यात येणार आहे. त्याचबरोबर त्यांना ५जी मोबाईल भेट देण्याची आणि गटप्रवर्तकांना स्कुटी उपलब्ध करून देण्याचाही मानस व्यक्त करण्यात आला.

ग्रामपंचायतींमध्ये घरपट्टी व नळपट्टीची वसुली अधिक पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी क्यूआर कोड प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

पत्रकार परिषदेला प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामविकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम भालके, अनंत कुंभार, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. रविंद्र खंदारे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य दयानंद जटनुरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २६ जुलै रोजी 'कारगिल विजय दिवस' सोहळ्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जुलै : जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयामार्फत रविवार, २६ जुलै २०२६ रोजी सकाळी ८ वाजता लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे २७ वा कारगिल विजय दिवस कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कारगिल युद्धात देशसेवेसाठी अभूतपूर्व शौर्य गाजवणाऱ्या आणि बलिदान देणाऱ्या वीर जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी व त्यांच्या परिवाराचा सन्मान करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी या कार्यक्रमास जिल्ह्यातील सर्व वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, शौर्यपदकप्राप्त माजी सैनिक तसेच माजी सैनिकांच्या विधवा भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.



# विविध वृत्त.....

## लातूर येथे २७ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जुलै : राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्यभरात २२ जुलै २०२६ ते ०२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत लातूर शहर विधानसभा मतदारसंघासाठी सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी लातूर येथील पार्वती मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये एकाच ठिकाणी नागरिकांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा 'एक खिडकी प्रणाली'द्वारे उपलब्ध करून दिल्या जाणार असून, यामध्ये सातबारा व फेरफार दुरुस्ती, डिजिटल सातबारा सेवा, विविध प्रकारची दाखले व प्रमाणपत्रे वितरण, महिलांना शेतकरी दर्जा प्रमाणपत्र, गावठाण स्वामित्व सनद, फार्मर आयडी, महिलांचे नाव अधिकार अभिलेखात समाविष्ट करणे, पात्र निवासी अतिक्रमणे नियमितीकरण, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, घरकुल योजनांबाबत मार्गदर्शन, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजना, शिधापत्रिका वितरण तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ व मार्गदर्शन प्रत्यक्ष उपलब्ध करून दिले जाईल.

महसूल सेवांबरोबरच नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यासाठी मोफत सर्वसमावेशक आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून, यामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत डोळ्यांची तपासणी, मधुमेह (शुगर), उच्च रक्तदाब, महिलांचे आरोग्य, हाडांचे आजार, कर्करोगाबाबत प्राथमिक तपासणी व मार्गदर्शन, रक्त तपासणी तसेच आवश्यक आरोग्यविषयक सल्ला मोफत दिला जाणार आहे. यासोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी शिबिरात हरितोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून विविध प्रकारच्या फळझाडांची व उपयुक्त वृक्षांची रोपे नागरिकांना उपलब्ध करून देऊन वृक्षलागवडीबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

तसेच महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिला व बालकल्याण योजनांची माहिती व लाभ आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून (एस.टी. महामंडळ) सवलत योजना व प्रवासी कल्याण योजनांबाबत मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. या शिबिरात विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करतील. तरी लातूर शहर मतदारसंघातील सर्व नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी लातूर, श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

## अजित पवार यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



लातूर, दि. २३ जुलै : दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, गणेश पवार, तहसीलदार राजभाऊ कदम, तहसीलदार संतोष बनकर यांच्यासह जिल्हाधिकारी अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ.कराड यांनी केले : पै. दिनानाथ सिंग



तभा वृत्तसेवा

लातूर , दि. २३ जुलै: लाल मातीतील कुस्तीला नवसंजीवनी देण्याचे कार्य डॉ. विश्र्वनाथ कराड यांनी केले आहे. त्यांनी शक्तिची पूजा केली आहे. येथे आलेल्या वारकरी पैलवानांमुळे या लाल मातीची शोभा वाढली आहे, त्यांच्यामुळे वाखरी फुलली आहे. असे विचार हिंद केसरी पै. दिनानाथ सिंग यांनी व्यक्त केले.

विश्र्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत, श्री क्षेत्र आळंदी-देहू-परिसर विकास समिती, पुणे यांच्यातर्फे वाखरी, पंढरपूर येथे पालखी तळाच्या शेजारी, विश्र्वशांती गुरुकुल परिसरात वारकरी भाविक भक्तांसाठी आषाढी वारीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या श्री समर्थ विष्णुदास वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. केंद्र (आळंदी),माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा.कराड यांच्या आशीर्वादाने व माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे व्यवस्थापकीय विश्र्वस्त आणि कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्र्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र केसरी पै. आप्पासाहेब कदम, नजरुद्दीन नायकवडी आणि महाराष्ट्र केसरी पै. विष्णूतात्या जोशीलकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.

त्याचप्रमाणे हभप तुळशीराम कराड, माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. मंगेश तु. कराड,डॉ. हनुमंत तुळशीराम कराड, राष्ट्रीय कुस्तीगीर महेश वरूटे, सुरजीत सिंग, श्रीकांत देशमुख, सामाजिक कार्यकर्ता सालगुडे पाटील, कदम पाटील, सरकार निंबाळकर, कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष राजाभाऊ जाधव, भीमराव आदलिंग, शिवाजीराव काळे, वारकरी कुस्ती महावीर स्पर्धेच्या संयोजन समितीचे सचिव प्रा.विलास कथुरे उपस्थित होते.

हिंदकेसरी पै. दिनानाथ सिंग म्हणाले, हा सोहळा मन आणि चित्त प्रसन्न करतो. त्यामुळे येथे येणार्या प्रत्येक भक्ताला तीर्थक्षेत्रात आल्याची अनुभूती मिळते. डॉ. कराड यांनी वैष्णवांच्या मेळाव्यात कुस्तीचा आखाडा भरविला आहे. येथे भक्ती आणि शक्तीचा आदर्श उभा राहिलेला दिसत आहे.

डॉ. मंगेश कराड म्हणाले, वारकरी संप्रदाय परंपरा ७५० वर्ष जुनी आहे. या परंपरेचे पाईक विश्र्वधर्मी डॉ. विश्र्वनाथ कराड यांनी समाज घडविण्यासाठी विश्र्वशांती केंद्राची स्थापना केली. या माध्यमातून सर्व संतांची शिकवण पुढे चालू ठेवली आहे. यातून आत्मचिंतनाची दिशा दाखवली आहे. वारकरी संप्रदाय जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल. आज येथे भक्ती आणि शक्तीचा संगम दिसून येत आहे. याच कार्याचा भाग म्हणजे ही कुस्ती स्पर्धा आहे. प्रा.विलास कथुरे यांनी प्रास्ताविक व कुस्ती स्पर्धाचे नियोजन केले. बाबा निम्हण यांनी धावते समालोचन केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले.

# चालक सीटवर प्रवासी बसवले; ३९ ऑटो रिक्षांवर कारवाई



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जुलै : जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे व प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली २२ जुलै रोजी लातूर येथील शिवाजी चौक परिसरात प्रादे शिक परिवहन कार्यालयाचे वायुवेग पथक आणि लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखा यांच्या वतीने संयुक्त विशेष तपासणी मोहीम राबवण्यात आली. लातूर शहरामध्ये ऑटोरिक्षा चालकांकडून वाहनांच्या आसन व्यवस्थेत अनाधिकृत बदल करून चालकाच्या शेजारी प्रवासी बसवणे तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरून नागरिकांची सुरक्षा घोक्यात आणली जात असल्याच्या पार्श्र्वभूमीवर ही मोहीम हाती घेण्यात आली होती.

या मोहिमेत मोटर वाहन निरीक्षक प्रकाश मुळे व अमोल कोकरे, तसेच सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक दिपाली जाधव, राहुल देवगुंड आणि प्रवीण दरेकर यांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली. या कारवाईदरम्यान वाहनांच्या रचनेत अनाधिकृत फेरफार करणाऱ्या आणि धोकादायक रीतीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या एकूण ३९ ऑटोरिक्षांवर मोटार वाहन कायद्यांतर्गत कडक कारवाई करत १ लाख ३० हजार रुपये इतका दंडात्मक महसूल वसूल करण्यात आला.

कारवाईदरम्यान लातूरचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंह गवारे आणि लातूर शहराचे पोलीस उपअधीक्षक समीरसिंह साळवे यांनी ऑटोरिक्षा चालकांशी संवाद साधला. त्यांनी चालकांना प्रवाशांच्या सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देत, भविष्यात प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण होईल, अशा प्रकारे नियमबाह्य वाहतूक केल्यास याहून अधिक कठोर कारवाई केली जाईल असा इशारा दिला, तसेच मोटार वाहन कायदे व रस्ता सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले.

## मध केंद्र योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २३ जुलै : उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या १८ जून २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत संपूर्ण राज्यात मध केंद्र योजना (मधमाशा पालन) कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील पात्र व्यक्ती व संस्थांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत असल्याचे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी केले आहे.

## लोकमान्य टिळक यांचे स्मारक वर्षभरामध्ये उभारणार : महापौर जयश्री सोनकांबळे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जुलै : लातूर शहरांमध्ये बहुतांश सर्व समाज सुधारकांची स्मारके उभारली गेली आहेत परंतु लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे स्मारक गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहे या स्मारकाच्या उभारणीसाठी ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या सर्व समस्यांची सोडवणूक माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळामध्ये पूर्ण करून त्याची उभारणी आगामी वर्षभरामध्ये करण्याची हमी महापौर जयश्री सोनकांबळे यांनी दिली आहे.

लातूर शहरात लोकमान्य टिळक चौक येथे आज गुरुवार दिनांक २३ जुलै रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी त्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा स्थानावरून बोलत होत्या.

लातूर शहरात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची १७० वी जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी महापौर जयश्री सोनकांबळे, तर लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त राहुल कुलकर्णी, लातूर शहर महानगरपालिकेतील काँग्रेसचे गटनेते, विजयकुमार साबदे, नगरसेवक प्रवीण कस्तुरे, प्रेरणा होनराव, ड. दीपक मठपती, यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्या पुढे म्हणाल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे ज्येष्ठ समाज सुधारक होते त्यांच्या विचाराची आणि कार्याची जपणूक प्रत्येक लातूरकराकडून झाली पाहिजे. त्यांचे विचार अंगीकारले गेले पाहिजेत. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे तो मी मिळविणारच यातून त्यांनी प्रेरणा दिली. तर गणेश उत्सवासारखा लोकसहभाग निर्माण होणारा उत्सव सुरू केला. धार्मिक उत्सव साजरा करण्याची परंपरा त्यांनी निर्माण केली त्यांची ही प्रेरणा लातूरकरांसाठी सदैव प्रेरणादायी ठरणार आहे त्यामुळे त्यांच्या विचाराची जपणूक होण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून त्यांचे स्मारक प्रलंबित आहे त्याची पूर्तता मी माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळामध्ये नक्कीच करेन यासाठी मी लातूर शहर महानगरपालिका प्रशासन आणि शासन यांच्याकडे नक्कीच पाठपुरावा करेन अशी हमी त्यांनी यावेळी दिली.

## जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांचे स्वागत



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २३ जुलै : धाराशिवचे जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे यांची लातूर येथे त्याच पदावर बदली झाली आहे. नुकताच त्यांनी पदभार स्वीकारला असता राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी अधीक्षक व्ही. आर. काळे, ज्ञानेश्र्वर गोसावी, विजयकुमार धनशेट्टी, वासंती काळे, पूजा भोसले, सतीश श्रीमंगले, गोविंद गुट्टे, प्रभाकर सूर्यवंशी, उमाकांत गायकवाड, शिवकांत वाडीकर, अनिल वाघमारे आदि उपस्थित होते.यावेळी औताडे व प्राचार्य केंद्रे यांनी जिल्ह्यातील शासकीय आणि खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), तांत्रिक शाळा आणि अल्प मुदतीचे प्रशिक्षण देणार्या संस्थांबाबत चर्चा झाली.

# रेणापूर येथील समाधान शिबिरात विविध योजनेतील अनेकांना प्रत्यक्ष लाभाचे वितरण

# शासकीय योजनेतून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये : आ. कराड



तभा वृत्तसेवा

लातूर दि.२३ जुलै : देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री विकासपुरुष देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने अठरापगड जाती धर्मांना, गोरगरीब सर्वसामान्य माणसांला केंद्रबिंदू मानून अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. या योजने पासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये त्यांना प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या समाधान शिबिराचे आयोजन केले असून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जनतेच्या अडीअडचणी, तक्रारी, प्रश्र्नांची सोडवणूक करून विविध योजनेचा लाभ देऊन सर्वसामान्य जनतेचे समाधान करावे असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार साहेब यांच्या जयंती निमित्ताने शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे रेणापूर येथे आयोजित समाधान शिबिराचे उद्घाटन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, भुमीअभिलेख जिल्हा अधीक्षक नसीम पटेल, रेणापूरचे तहसीलदार प्रशांत थोरात, लातूरचे सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे, जिपच्या महिला व बालकल्याण सभापती शिवकन्याताई गोडभरले, रेणापूर पंस सभापती मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, जिप सदस्य महादेव साळुंके, सौ. आशाताई भिसे, पद्माकर चिंचोलकर, मुख्यमंत्री बळीराजा शेत रस्ता समिती सहअध्यक्ष सुरज शिंदे, संगायो समितीचे रेणापूर तालुका अध्यक्ष सतीश आंबेकर, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, भागवत सोट, अभिषेक आकनगिरे, अनिल भिसे, बालाजी गोटके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या समाधान शिबिर प्रसंगी विविध गावचे लोकप्रतिनिधी, लाभार्थी, महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शुभेच्छा देऊन स्वर्गीय अजितदादा पवार यांना आदरांजली अर्पण करून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदीजीच्या नेतृत्वात देशाने आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्याने विकास कामात एक वेगळी उंची गाठली असून त्यांनी सुरू केलेल्या विविध जनकल्याणकारी योजना पात्र आणि गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ घेण्यासाठी समाधान शिबिराचा निश्र्चितपणे फायदा होईल.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आत्तापर्यंतची सर्वात मोठी ऐतिहासिक कर्जमाफी जाहीर केली असून याचा ५६ लाख शेतकऱ्यांना लाभ होणार आहे. तर महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांनी क्रांतिकारी निर्णय घेऊन मुख्यमंत्री बळीराजा पाणंद शेत रस्ता योजना सुरू केली या योजनेतून लातूर ग्रामीण मतदार संघात येत्या दोन वर्षात एकही शेत रस्ता शिल्लक राहणार नाही प्रत्येक शेतकऱ्यांना मजबूत आणि पक्का रस्ता देण्याचे काम शासनाच्या वतीने हाती घेण्यात आले असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

गावागावात शिव रस्त्याची कामे करताना कोणीही कोणाचीही आडवणूक करू नये असे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी आडवणूक करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याने एकही शेतरस्ता अतिक्रमित राहणार नाही सर्व रस्ते मोकळे होतील. कबाले नसल्यामुळे अनेकांना घरकुल योजनेचा लाभ मिळत नव्हता या पुढील काळात एकही पात्र लाभार्थी कबाल्यापासून वंचित राहणार नाही अशी माहिती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही. पात्र लाभार्थ्याचे जोपर्यंत समाधान होणार नाही तोपर्यंत हे काम थांबणार नाही असेही त्यांनी बोलून दाखविले.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे आणि संदीप कुलकर्णी यांनी एकाच छताखाली शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शेतकरी सन्मान निधी, मोफत वीज पुरवठा, सोलर पंप, लाडकी बहीण, मोफत राशन, घरकुल, विहिरी, लखपती दीदी योजना यासह सर्व योजनाचा पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची समाधान शिबिराच्या माध्यमातून सोय करण्यात आली असल्याची माहिती दिली. प्रारंभी तहसीलदार सौदागर तांदळे यांनी समाधान शिबिर आयोजनामागची भूमिका विषद करून या शिबिरात उभारण्यात आलेल्या विविध स्टॉलवर आपल्या अडीअडचणी मांडून त्या सोडवून घ्याव्यात असे बोलून दाखविले.

रेणापूर येथील समाधान शिबिरात महिला शेतकरी प्रमाणपत्र, रहिवासी आणि उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत सातबारा, डिजिटल सातबारा, प्रलंबित फेरफार, आयुष्यमान भारत कार्ड, गाव नकाशे, ट्रॅक्टर वाटप, संगायो पात्र लाभार्थ्यांना मंजुरीपत्र, डिजिटल शिधापत्रिका, लेक लाडकी योजनेचा हप्ता, लखपती दीदी योजनेचे पत्र, बचत गटांना कर्जमुक्ती प्रमाणपत्र, बेबी केअर किट यासह विविध योजनेतील पात्र लाभार्थ्यांना आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे व प्रत्यक्ष लाभाचे वाटप करण्यात आले. शेवटी तहसीलदार प्रशांत थोरात यांनी आभार मानले.